पुणे, शनिवार, ४ जानेवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 39 • वर्ष ४ थे, अंक ३९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News







# वारकऱ्यांच्या विचाराने आम्ही महाराष्ट्र चालवू!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी** : पांडुरंगाच्या आशीर्वादाने आम्हाला मोठा विजय मिळाला आहे. त्यानंतर आळंदीत येऊन माऊलींच दर्शन घेण्यासाठी आलो आहे. हा क्षण अत्यंत सुखाचा असतो. तो क्षण मला अनुभवायला मिळाला आहे, महाराष्ट्र हा नेहमीच वारकरी विचाराने पुढे गेलेला आहे. तो भविष्यातही पुढे जाईल. या विचारांची आठवण सतत राहावी म्हणून आज संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच दर्शन घेण्यासाठी आळंदीत आल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे आळंदीत टाळ मृदुंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी स्वतः देवेंद्र फडणवीस यांनी हातात टाळ घेऊन माऊलींचा गजर केला. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पंकजा मुंडे, राम शिंदे, आ. अमित, गोरखे आणि आ. शंकर जगताप आदी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, वारकरी विचाराने महाराष्ट्र पुढे गेलेला आहे. भविष्यात ही पुढे जात राहील. या विचारांची आठवण सतत होत राहावी » पान ७ वर



## भारतीय लष्कर हे कोणत्याही प्रकारचा हल्ला परतविण्यास सक्षम !

- १५ जानेवारी रोजीचा लष्कर दिन यंदा पहिल्यांदाच पुणयात साजरा होणार आहे. त्यानिमित्ताने लष्करातर्फे रेसकोर्स मैदानावर 'नो युवर आर्मी' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. फडणवीस म्हणाले की, भारतीय लष्कराची क्षमता दर्शवण्यासाठी हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. उद्‌घाटन कार्यक्रमाल लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, खासदार मेधा कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले, " या प्रदर्शनाच्या निमित्ताने
- लष्कराने केलेले नवीन संशोधन, संरक्षण क्षेत्रातील स्टार्ट अप पाहण्याची संधी आपल्याला या प्रदर्शनातून मिळते. या प्रदर्शनाचा मुळ हेतू हा जनतेला लष्कराची ओळख करून देणे, जवळ आणणे आहे. तसेच आपल्या देशातील युवकानांना लष्करासोबत काम करणे आणि सैन्यात भरती होण्यासाठी प्रोत्साहन देणे हाच आहे."
- देशातील अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा व्यवस्था मजबुत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, " भारताचे सैन्य दल हे जगातील उत्तम सैन्य दलांपैकी एक आहे.

# मी सुद्धा शीशमहल बांधू शकलो असतो !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मी सुद्धा शीशमहल (काचेचा बंगला) बांधू शकलो असतो, पण मोदींने स्वत:साठी कधीही घर बांधले नाही हे देशाला चांगल्या प्रकारे माहित आहे. मी गरिबांसाठी ४ कोटींहून अधिक घरे बांधली आहेत.गेल्या १० वर्षात दिल्लीला आपत्तीने वेढले आहे. अण्णा हजारे यांना पुढे करत काही अत्यंत बेईमान लोकांनी दिल्लीला आपत्तीत ढकलले आहे. आप आपदा बनकर दिल्ली पर टूट पडी है", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

येत्या काही आठवड्यांतच दिल्लीत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आम आदमी पार्टीसह प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपाने यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. दोन्ही पक्षांनी आक्रमक होत ऐकमेकांवर जोरदार टीका सुरू केली आहे. अशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील 'झुग्गी-झोपरी' क्लस्टरमधील १६०० फ्लॅट्स आणि दोन शहरी पुनर्विकास प्रकल्पांचे उद्‌घाटन केले. उद्‌घाटनावेळी पंतप्रधानांनी माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांना लक्ष्य करत दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानावर जोरदार टीका केली.

**राजकीय**

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये दिल्ली सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने, दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानी कोटींहून अधिक किमतीची उच्च दर्जाची उपकरणे आणि गॅझेट्स बसवले असल्याची माहिती दिली होती.त्यामुळे भाजपाने आप सरकारवर सडकून टीका केली होती. यानंतर आप सरकारने दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानावर प्रमाणापेक्षा खर्च केल्याच्या आरोप झाले होते. हाच धागा पकडत पंतप्रधानांनी » पान ७ वर

## At a Glance


### अखेर वाहनधारकांना मिळाला दिलासा!

**मुंबई**- मुंबईतील वाहनचालकांना मोठा दिलासा देणारी माहिती समोर आली आहे. यापुढे डिजिटल कागदपत्रे ग्राह्य धरले जाणार आहेत. याबाबत मुंबईतील सर्व वाहतूक पोलिसांना आदेश देण्यात आले आहेत. बहुतेक लोक कागदपत्रे सोबत बाळगण्याऐवजी मोबाईलवर डिजिलॉकर किंवा एम परिवहन यांसारख्या ॲपवर डिजिटल स्वरुपात ठेवतात. मात्र, वाहतूक पोलीस ही कागदपत्रे ग्राह्य न धरता वाहनधारकांवर कारवाई करायचे. यासंदर्भात वाहनधारकांनी पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली. त्यानंतर वाहतूक सहपोलीस आयुक्तांनी डिजिटल कागदपत्रे ग्राह्य धरण्याचे लेखी आदेश दिले आहेत. सहपोलीस आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की, 'वाहनधारक डिजिटल कागजपत्रे » पान ७ वर

# महापालिकेची प्रत्येक जागा लढवण्याचे राष्ट्रवादीचे ध्येय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : पीएमसी निवडणुकीसाठी अजून काही कालावधी शिल्लक आहे, पण पक्ष निवडणूक लढवण्यास सदैव तयार आहे. आगामी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस एकट्याने लढू शकते, तसेच अंतिम निर्णय सर्वोच्च नेतृत्व घेईल, असे संकेत अजित पवार यांनी दिले आहे.



महापालिकेची प्रत्येक जागा लढवण्याचे राष्ट्रवादीचे ध्येय आहे. असे पुणे शहर अजीत पवार गटाचे अध्यक्ष दीपक मानकर माध्यमांशी बोलताना म्हणाले.

महाराष्ट्रातील महायुती आघाडीचे संपूर्ण लक्ष आता महापालिका निवडणुकीकडे लागले आहे. यादरम्यान पुण्यात महापालिका निवडणूक एकट्याने लढवण्याचा आग्रह शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका आणि सरकार स्थापनेनंतरची धुरळा उडत असताना, महायुतीने आपले लक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे वळवले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जागावाटपाचा फॉर्म्युला लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असायला हवा, असे प्रमुख मित्रपक्ष शिवसेनेचे म्हणणे आहे. जागावाटप उमेदवारांच्या गुणवत्तेवर आधारित असावे, विद्यमान जागा संबंधित पक्षाकडे शिल्लक राहिल्या पाहिजेत, यावर त्यांनी भर दिला.

शिवसेनेने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे आणि पुणे महानगरपालिका निवडणुकीतील अनेक जागांचा आढावा घेत आहे ज्या त्यांना जिंकता येतील.तसेच कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन लोकांशी संपर्क साधून राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. संभाव्य उमेदवारांचाही आढावा घेतला जात आहे. पीएमसी महासभेच्या एकूण 162 जागांपैकी किमान 35-40 जागा मिळवण्याचे शिवसेनेचे लक्ष्य आहे.

### कॉपीमुक्तसाठी शिक्षण विभाग अलर्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्तपणे राबविण्यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाकडून तयारी सुरू झाली आहे. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही आहेत, त्यांनाच परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिली आहे. याशिवाय केंद्रावरील हालचाली टिपण्यासाठी शूटिंग केले जाणार असून, त्यासाठी शिक्षण विभागात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी विशेष काळजी माध्यमिक शिक्षण विभागाकडून घेतली जात आहे. त्या अनुषंगाने परीक्षेदरम्यान मोबाइलद्वारे किंवा अन्य माध्यमातून पेपरफुटी रोखण्यासाठी विविध पर्याय अवलंबिले जात आहेत.

परीक्षेच्या केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक आहेत. यासह सहायक परीक्षकांच्या मोबाइलवरून प्रत्येक केंद्रावरील » पान ७ वर

# पंकजा-धनंजय मुंडेंचा पत्ता कट अजित पवार हे बीडचे पालकमंत्री?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड**- बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मुंडे बहीण भावाला चागलंच भोवण्याची चिन्हे आहेत. देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यासह राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. हत्या प्रकरणासह पवनचक्की खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याला अटक केल्यानंतर आता धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून हटवण्याची मागणी जोर धरत आहे. त्यातच बीडमध्ये फोफावलेली गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मुंडे बहीण-भावाला न देता महायुतीच्या प्रमुख नेत्यांपैकी कोणीही घ्यावे, अशी मागणी जिल्ह्यातील



सर्वपक्षीय आमदारांकडून केली जात आहे. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांनी धक्कातंत्र वापरत बीडच्या पालकमंत्रीपदाचा निर्णय जवळपास निश्चित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीडचे पालकमंत्री होण्याची शक्यता आहे.

मंत्रिमंडळ विस्तार होऊन दोन आठवडे उलटल्यानंतरही राज्यात अद्याप पालकमंत्र्यांची घोषणा झालेली नाही. सत्ताधारी महायुतीत तीन पक्ष असल्याने कोणत्या पक्षाकडे कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्रीपद द्यायचं, याबाबत बैठकी सुरू असून अनेक जिल्ह्यात पालकमंत्रीपदावरून वाद सुरू असल्याचे वृत्त आहे. यामुळे पालकमंत्रीपदाची घोषणा लांबणीवर पडली आहे. मात्र येत्या एक दोन दिवसांत याबाबतची घोषणा होण्याची शक्यता आहे.

वाल्मीक कराड प्रकरणावरून मुंडे कुटुंब गोत्यात आले असून बीडच्या पालकमंत्री पदावरून धनंजय मुंडे यांचा पत्ता कट झाला असून पंकजा मुंडे यांनादेखील संधी नाकारण्यात आल्याची माहिती आहे. बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावी, अशी मागणी सर्वपक्षीय आमदारांकडून करण्यात येत होती. मात्र देवेंद्र फडणवीस व अजित » पान ७ वर

### नागपुरात कुख्यात गुंडाची हत्या

**नागपुर**- नागपुरात दिवसाढवळ्या कुख्यात गुंडाची हत्या करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ माजली आहे. मृत व्यक्ती आपल्या पाच मित्रांसह देवदर्शन करून परत असताना दुचाकीने आलेल्या दोन गुंडांनी त्यांना वाटेतच अडवले आणि त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, कारमधील इतर तीन जण शेतात पळून गेल्याने त्यांचा जीव वाचला. याप्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना घडली. पवन धीरज हिरणवार (वय, २८) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. पवन हा नागपूर येथील काचीपुरा येथे वास्तव्यास होता. तर, शैलेश उर्फ बंटी हिरणवार (वय, ३१) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**अभिवादन:** भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या 193 व्या जयंती निमित्त खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत समता भूमी , महात्मा फुले वाडा पुणे येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले .

### रागाच्या भरात मुलीने आईलाच संपवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : मुंबईमध्ये मुलीनेच आईची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कुर्ल्यातील कुरेशनगरमध्ये ही घटना घडली आहे. मोठ्या बहिणीवर प्रेम आणि माझा तिरस्कार करते म्हणून संतापलेल्या मुलीने आईलाच संपवले. मुलीने आपल्या आईवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चुनाभट्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मुलीला अटक केली. पोलिस अधिक तपास करत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, कुर्ल्याच्या करेशीनगरमध्ये आई फक्त मोठ्या बहिणीवर प्रेम करते आणि माझा तिरस्कार करते या रागातून मुलीनेच आपल्या वयस्कर आईची हत्या केल्याची घटना घडली. सबिरा बानो आझगर शेख (६२ वर्षे) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे.

# साखर कारखान्यांकडून गळीत हंगामाला वेग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : साखर कारखान्यांचा गाळप हंगाम वेगात सुरू आहे. पुणे जिल्ह्यातील सहकारी आणि खासगी अशा एकूण १४ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम वेगाने सुरू आहे. आतापर्यंत ४४ लाख २४ हजार ५१६ टन उसाचे गाळप केले आहे. त्यातून ३७ लाख ९१ हजार ८९९ क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. साखर उतारा सरासरी ८.५५ टक्के एवढा आहे.

विधानसभेच्या निवडणुकीमुळे चालू वर्षी साखर कारखान्यांचा गाळप हंगाम उशिराने सुरू झाला आहे. १५ नोव्हेंबरपासून साखर कारखान्यांनी गळीत हंगामास सुरुवात केली असली तरी हळहळू साखर कारखाने सुरू झाले आहेत. पुणे जिल्ह्यातील सहकारी आणि खासगी अशा एकूण १४ साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरु झाला आहे. यंदा जिह्यात परतीच्या पावसाने चांगलाच दणका दिला होता. त्यातच विधानसभेच्या निवडणुका सुरू झाल्याने साखर कारखान्याच्या गळीत हंगामात काही प्रमाणात अडचणी आल्या होत्या.

शासनाने १५ नोव्हेंबरपासून साखर कारखाने सुरू करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे साखर कारखान्याचा गळीत हंगाम धीम्यागतीने सुरू झाला. चालू गळीत हंगामात मोठ्या प्रमाणात ऊसाचे गाळप करण्याचे नियोजन कारखान्यांनी केले आहे. मात्र, ऊस शेतात जुलैपासून पाणी राहिल्याने ऊसाची फारशी वाढ झाली नसल्याने उसाच्या उत्पादनात घट होत असल्याचे चित्र आहे.

# द्रुतगती मार्ग सलग आठ पदरी होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरून दिवसेंदिवस वाहन संख्या वाढत आहे. द्रुतगती मार्गावरून दररोज सुमारे दीड लाख वाहने धावतात. या मार्गावर वाहनांची वाढती वर्दळ आणि आता अपुरा पडणारा रस्ता यामुळे या महामार्गाचे रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव "एमएसआरडीसी'ने तयार केला आहे. त्याला मान्यता मिळाल्यानंतर तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे महामंडळाचे नियोजन आहे. हे काम पूर्ण झाल्यावर द्रुतगती मार्ग सलग आठ पदरी होऊन विनाअडथळा वेगवान प्रवास होणार आहे.

» पान ७ वर

### असा प्रस्ताव...

- सध्याचा मार्ग पुणे आणि मुंबईच्या दिशेने प्रत्येकी तीन पदरी
- दोन्ही बाजूंना आणखी एक-एक लेन करण्यात येणार
- खालापूर टोल नाका ते खोपोली एक्झिटपर्यंत आठ पदरी रस्ता
- उर्से टोलनाक्यापासून पुढे द्रुतगती मार्ग आठ पदरी करण्याचा निर्णय

# आता ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू होणार... !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा परिषदांमध्ये मुख्यालयाच्या ठिकाणी बायोमेट्रिक फिंगरप्रिंट तसेच फेसरिडिंग प्रणालीतून कर्मचाऱ्यांची हजेरी नोंदविली जाते. शहरांच्या जवळ असलेल्या ग्रामपंचायती देखील ग्रामसेवकांच्या हजेरीसाठी बायोमेट्रिक पद्धत वापरतात. त्यामुळे दूरसंचारचे जाळे (नेटवर्क कनेक्टिव्हिटी) असलेल्या ग्रामपंचायतींनी हजेरीसाठी ही पद्धत स्वीकारावी, असे शासनाचे म्हणणे आहे. महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेने शासनाच्या या भूमिकेचे स्वागत केले आहे.ग्रामपंचायतीच्या कामाला शिस्त लावण्यासाठी ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू करण्याच्या सूचना राज्य शासनाने पुन्हा जारी केल्या आहेत.

ग्रामविकास विभागाच्या उपसचिव सीमा जाधव यांनी अलीकडेच राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना एक पत्र पाठवले आहे. यात ग्रामसेवकांची हजेरी जीपीएस आणि बायोमेट्रिक प्रणालीच्या माध्यमातून घेण्याचा आग्रह धरण्यात आला आहे. विधिमंडळात ग्रामविकासाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने जिल्हा परिषदांकडून ग्रामसेवकांच्या हजेरीबाबत माहिती मागविण्यात आली होती.



ग्रामसेवकांना मात्र दूरसंचारचे जाळे सर्वत्र नसल्याने बायोमेट्रिक हजेरी गैरसोयीची वाटते आहे. यावर शासनाचे असे म्हणणे आहे, की अतिदुर्गम व डोंगराळ भागात दूरसंचारचे जाळे नसल्याने एकवेळ तेथे बायोमेट्रिक प्रणालीने हजेरी प्रक्रिया राबविण्यास अडचणी येऊ शकतात. परंतु सध्या बहुतांश भागांमध्ये दूरसंचारचे जाळे तयार झालेले आहे.

> बायोमेट्रिक हजेरीला आमचा विरोध नाही. नव्या हजेरी पद्धतीचे आम्ही स्वागत करू. मात्र ग्रामसेवकाच्या कामकाजाची व्याप्ती समजावून घ्यावी. त्याची नेमकी भूमिका काय आणि त्याला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते हेदेखील विचारात घेतले जावे.दत्ता काकडे, अध्यक्ष, सरपंच परिषदग्रामसेवक हा गावाच्या विकासातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे बायोमेट्रिक हजेरीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो."
>
> **— संजीव निकम, राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन**

त्यामुळे किमान शहरालगतच्या ग्रामपंचायतींमध्ये बायोमेट्रिक पद्धत लागू करणे शक्य आहे. मात्र या बाबत आपल्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा. त्यामुळे बायोमेट्रिक सरसकट सक्ती न करता ग्रामविकास विभागाने हजेरीचा मुद्दा पुन्हा जिल्हा परिषदांकडे टोलवला आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

हजेरीच्या सध्याच्या पद्धतीत बदल करण्यास काही » पान ७ वर

#रा

# शंभरावे साहित्य संमेलन पुण्यात व्हावे

## राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली अपेक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याने देशामध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. पुणे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी आणि साहित्याची भूमी समजली जाते. विचारांची-इतिहासाची वारसा असलेली ही भूमी आहे. संमेलनाच्या सरकार्यवाहपदाची जबाबदारी सांभाळताना मी कुणी साहित्यिक अथवा अभ्यासक या भूमिकेतून कार्य करणार नसून मी एक कार्यकर्ता या भूमिकेतून जबाबदारीच्या जाणीवेने, आत्मियता जपत पुणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करेन, अशी ग्वाही केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

सरहद, पुणेतर्फे दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे पुण्यातील संपर्क कार्यालय साहित्य परिषदेत सुरू करण्यात आले असून त्याचे उद्घाटन गुरुवारी मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. संमेलनाच्या सरकार्यवाहपदी नेमणूक केल्याबद्दलचे पत्र मंत्री मोहोळ यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, सरहद पुणेचे अध्यक्ष संजय नहार, डॉ. सतिश देसाई, शैलेश पगारिया, सचिन ईटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले. पुणे शहरातील सांस्कृतिक घडामोडींचे नियमित वृत्तांकन करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींचा, साहित्य सेवकांचा सत्कार या प्रसंगी मंत्री मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आला. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि ग्रंथ असे सन्मानाचे स्वरूप होते.

साहित्य क्षेत्रातील वृत्तांकन करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींच्या कार्याचा गौरव करून मंत्री मोहोळ पुढे म्हणाले, दिल्लीत होणाऱ्या साहित्य संमेलनाचे महत्त्व मोठे असून प्रत्येकाच्या मनात असलेली कार्यकर्त्यांची भूमिका माझ्याही मनात आहे. यातूनच आत्मविश्वासपूर्णतेने साहित्य संमेलनाच्या यशस्वीततेसाठी मी बांधील आहे. पुण्याचा प्रतिनिधी आणि पुण्याविषयी आदरभाव जपत प्रामाणिकपणे चांगले काम करून माझ्या शहराचे नाव जपेन.



**स्वागत :** ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सरकार्यवाह पदाची जबाबदारी मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सोपविताना प्रा. मिलिंद जोशी. समवेत सचिन ईटकर, सुनिताराजे पवार, संजय नहार, डॉ. सतिश देसाई, शैलेश पगारिया.



"साहित्य संमेलन हा भाषिक उत्सव, भाषेची जत्र असते. हा उत्सव अधिक देखणा करण्यासाठी प्रत्येकाच्या मनात आदरभाव असून त्या दृष्टीने आम्ही कार्यरत आहोत. दिल्ली येथे होणारे साहित्य संमेलन प्रयोगशीलता आणि नाविन्यतेचा वापर करून संयोजक संजय नहार आणि त्यांचे सहकारी अधिक देखणे करतील." — **प्रा. मिलिंद जोशी**



"अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे असे व्यासपीठ आहे जेथे महाराष्ट्राची व्यापक भूमिका मांडली जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर दिल्लीत होणारे हे पहिले संमेलन आहे. दिल्लीत संमेलन आयोजित करण्याची संधी सरहद पुणेला मिळाली आहे, याचा आनंद आहे. दिल्लीत होणाऱ्या संमेलनामागे मराठी माणूस एक होत आहे ही संकल्पना जपली जात आहे."
**— संजय नहार**

## ? पुण्यात काय घडतंय...

### अभिष्टचिंतन सोहळा



- **विषय :** मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष युगपुरुष मा. पुरुषोत्तम खेडेकर यांचा अमृतमहोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळा...
- **कुठे : बालगंधर्व रंगमंदिर पुणे.**
- **कधी : शनिवार, ४ जानेवारी २०२५, सकाळी ११ वा**
- **आयोजक : : मराठा सेवा संघ व युगनायक मा. पुरुषोत्तम खेडेकर अमृत महोत्सव गौरव समिती**

### रोटरी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन



- **विषय :** सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या रोटरी क्लबतर्फे पहिल्या रोटरी मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील संमेलनाध्यक्ष तर सावा हेल्थकेअरचे संचालक विनोद जाधव स्वागताध्यक्ष. पुण्यातील १५ रोटरी क्लब सहयजमान आहेत.
- **हस्ते :** प्रसिद्ध क्रिकेटपटू पद्मभूषण चंदू बोर्डे.
- **प्रमुख उपस्थिती :** खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, नॅशनल बुक ट्रस्टचे विश्वस्त राजेश पांडे, नगरसेवक जयंत भावे, प्रांतपाल शितल शहा, उपप्रांतपाल मोहन पालेशा, सूर्यकांत वझे, डि. लर्निंग जिल्हा प्रशिक्षक पंकज शहा, संतोष मराठे, नितीन ढमाले.
- सकाळी ९.१५ वाजता ग्रंथदिंडी
- सकाळी १० वाजता उद्घाटन समारंभ
- **कुठे : यशवंतराव चव्हाण नाट्यगृह**
- **कधी : शनिवार ४ जानेवारी २०२५, सकाळी ९.१५ वा.**

### मुंबई ग्राहक पंचायत पेठ २०२५



- **ग्राहक पंचायत पेठा :** मुंबई ग्राहक पंचायत संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दिनांक ४ जानेवारी ते ८ जानेवारी २०२५ या कालावधीत "ग्राहक पंचायत पेठा" हा मुंबई ग्राहक पंचायतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण असा उपक्रम होणार आहे.
- **शुभहस्ते** - माजी केंद्रीय मंत्री श्री. प्रकाश जावडेकर
- **प्रमुख उपस्थिती** - ग्राहक पंचायत पेठ समिती, अनुराधा देशपांडे
- **कुठे : हर्षल हॉल, कोथरूड**
- **कधी : शनिवार, ४ जानेवारी ते ८ जानेवारी २०२५**

# 'भीमरूग्ण सेवा'मधून हजारोंना औषधोपचार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरेगाव भीमा येथे २०७ व्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी आलेल्या लाखो भीमसैनिकांना आरोग्यसेवा पुरविण्यात आली. सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठ व ' शीला राज साळवे मेमोरिअल ट्रस्ट' यांच्यातर्फे कोरेगाव भीमा येथे 'भीमरुग्ण सेवा' आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

सिम्बायोसिस'चे संस्थापक पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजुमदार व साळवे मेमोरियल ट्रस्टचे प्रमुख ॲड. अविनाश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित आरोग्य शिबिरात हजारो भीमसैनिकांनी औषधोपचाराचा लाभ घेतला.

**आरोग्यसेवा**


गेल्या सहा वर्षांपासून आरोग्यसेवेतून विजयस्तंभास मानवंदना देण्याचा उपक्रम या दोन्ही संस्थांकडून राबविण्यात येत आहे. आरोग्य शिबिराचे उद्घाटन पुण्याचे नगरविकास अभियंता प्रशांत वाघमारे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी पाणी पुरवठा विभागाचे अभियंता सुरेश साखरे, सुशील मोहिते, ॲड. अतुल राज साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

आरोग्य तपासणी, गोळ्या-औषधांचे वाटप, वेदनाशामक औषधे वाटप करण्यात आली. ॲड. अविनाश राज साळवे म्हणाले, याप्रसंगी अनेकजण पायी चालत येतात. अशा सर्वांना आरोग्य सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने या 'भीमरूग्ण सेवा' आरोग्य शिबिर असते.

"देशभरातून आलेल्या भीमसैनिकांना सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आरोग्य सेवा पुरविण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. सिम्बायोसिस विद्यापीठ आणि साळवे मेमोरियल ट्रस्टने नेहमीच अशा उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला आहे. या उपक्रमामुळे हजारो लोकांची सेवा झाली आहे. विजयस्तंभाला अनोख्या पद्धतीने केलेले अभिवादनच आहे."
**— प्रशांत वाघमारे**

# 'कृती-शुन्य' कारभाराची पुणेकरांना प्रचिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महायुतीच्या महागोंधळाच्या' कारभाराची प्रचिती राज्यातील जनते बरोबर पुणेकरांना येऊ लागली आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे प्रशासकीय कामकाजात लक्ष देण्याऐवजी 'राजकीय धुळवडीत' अधिक मग्न असून; डॉ बाबासाहेब आंबेडकर व डॉ. मनमोहनसिंग यांचा काँग्रेसने 'कथित अवमान (?) करण्याची कथानके' रचण्याचे निष्फळ प्रयत्न करीत, ७५ वर्षां पुर्वीच्या 'गांधी - नेहरूंच्या नावे बोटे मोडण्याचा राजधर्माचा पुरषार्थ निभावत असल्याची प्रखर टीका काँग्रेस नेते व राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात केली.

ते पुढे म्हणाले की, फडणवीसांनी मुख्यमंत्री पदाचा केवळ राजकीय धुळवडीसाठी वापर करू नये. तर प्रशासकीय कामासाठी देखील वापर करावा व पुणे मनपा'तील २ अतिरिक्त आयुक्त पदांच्या रिक्त जागा त्वरित भराव्यात.

### गोपाळदादा तिवारींचा संतप्त सवाल

- केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करून देखील पुणे महापालिके'साठी अति आयुक्त मिळत नाहीत ही केवळ नामुष्की समजायची का 'पुणे शहरास' (नागपूर मेट्रो प्रमाणे प्राधान्य देणारा पुर्वीचा) आकसच् समजायचा (?) असा संतप्त सवाल ही काँग्रेस प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला.

आरोग्य, स्वच्छता, अतिक्रमण विभाग, पाणीपुरवठा व सांडपाणी- ड्रेनेज लाईन सह अनेक अत्यावशक कामे खोळंबून असल्याने नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. महापालिकेतील महत्त्वाची संविधानिक पदे रिक्त ठेवण्यामागे व अधिकारांचे केंद्रीकरण करण्यामागे, काही आर्थिक गणिते आहेत काय (?) वा कोणत्या ऑफर'ची वाट पाहिली जात आहे काय(?) असा उपहासात्मक सवाल केला.

राज्यभरात IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या सुरू आहेत पुण्याची जिल्हाधिकारी देखील बदलले पण पुणे महापालिकेला २ अतिरिक्त आयुक्त काही मिळायला तयार नाहीत.

## ईलेक्ट्रिक व्हेईकल्ससाठी दिलासा

# चार्जिंग पायाभूत नेटवर्क अधिक सुसज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** देशातील इलेक्ट्रिक व्हेइकल्सची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यासाठी लागणारी चार्जिंग पायाभूत सुविधा अधिक सुसज्ज करण्यावर टाटा मोटर्स ईव्ही विभागाने पुढाकार घेतला आहे. या योजनेचा फायदा प्रामुख्याने देशातील टिअर २ आणि टिअर ३ शहरांना होणार आहे.

अवजड उद्योग मंत्रालयानुसार, गेल्या आर्थिक वर्षात टियर २ आणि टियर 3 शहरांत चार्जिंग नेटवर्कचे प्रमाण ९६ टक्क्यांनी वाढले आहे. देशातील सर्वात फास्ट चार्जिंग पॉइंट्सपैकी ५९ टक्के पॉइंट याच क्षेत्रात आहेत. या शहरांमध्ये चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर विकासाला वेग देण्यासाठी आपल्या खुल्या सहयोगाअंतर्गत कंपनीने महत्त्वाच्या भागधारकांशी धोरणात्मक भागीदारी केली आहे.

यात प्रामुख्याने टाटा मोटर्स कंपनीने सहा चार्ज पॉइंट ऑपरेटर्स (CPOs) आणि दोन ऑइल मार्केटिंग कंपन्यांशी (OMCs) भागीदारी केली आहे आणि त्यांच्या सहकार्याने येत्या १२-१८ महिन्यांत भारतभरात २२ हजार इलेक्ट्रिक वेहिकल चार्जिंग स्टेशन्स उभी करण्याचा त्यांचा विचार आहे.

महाराष्ट्रात चार्जिंग स्टेशन्सची संख्या सर्वात जास्त आहे आणि राज्यात चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.



आर्थिक वर्ष २०२२ मध्ये राज्यात चार्जिंग स्टेशन्सची संख्या फक्त १३९ होती, जी आत्तापर्यंत ३९५८ वर पोहोचली आहे.

आर्थिक वर्ष २०२३ मध्ये टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये ४९% चार-चाकी ईव्हींची नोंदणी झाली. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये हा ट्रेंड आणखी वाढला आणि हे प्रमाण ५८ टक्क्यांवर पोहोचले आणि आर्थिक वर्ष २०२५ मध्ये आत्तापर्यंत हे प्रमाण तब्बल ६६ टक्के इतके आहे.

## ✓ Selected

# गीतांचा मैफिलीतून मोहम्मद रफींच्या आठवणींना उजाळा



**पुणे :** प्रख्यात गायक मोहंमद रफ़ी यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे, याचेच औचित्य साधून पुण्यातील प्रयोगशील आयोजक झळकी नागण्णा यांनी "मूड्स ऑफ रफ़ी" हा मोहम्मद रफ़ी विशेष सुमधूर गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन बालगंधर्व रंगमंदिर या ठिकाणी केले होते. या ठिकाणी रफी यांनी गायलेली अजरामर गीते सादर करण्यात आली. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण सुप्रसिद्ध गायक "गफार जी मोमीन" हे होते. ज्यांना आपण "व्हॉइस ऑफ रफ़ी" म्हणून देखील ओळखतो. या कार्यक्रमात त्यांनी युगल गीते सादर करण्यात आली होती. कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. झळकी नागण्णा म्हणाले की " स्वर्गीय रफ़ीनीं एकूण २८ हजार गीते गायली आहेत. एखाद्या व्यक्तीला लोकांनी शंभर वर्ष लक्षात ठेवणे ही फार मोठी गोष्ट आहे.

# अर्थशास्त्राचे शिल्पकार डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली



**बावधन :** भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग नव्या पिढीसाठी आदर्श मार्गदर्शक आहेत. अर्थतज्ज्ञ असलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्री, पंतप्रधान म्हणून देशाला समृद्धीच्या दिशेने नेले. भारतीय अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी, तसेच प्रगतीपथावर नेण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान प्रत्येक भारतीय नागरिकाच्या मनात सदैव राहील, यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी असून ते सर्वांनी आचरणात आणणे काळाची गरज आहे " अशी भावना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांनी व्यक्त केली. सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## अभिनेता पुष्कर जोग आणि अभिनेत्री पूजा राठोड यांचा बायडी

# 'बायडी', गाण्याच्या पोस्टरने प्रेक्षकांचे लक्ष वेधले..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मराठी व हिंदी चित्रपट सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा अभिनेता पुष्कर जोग आणि अल्याड पल्याड चित्रपट तसेच बंजारा गाण्यांमध्ये दिसणारी सुंदर अभिनेत्री पूजा राठोड यांचे नवीन वर्षात 'वी आर म्युझिक स्टेशन' प्रस्तुत 'बायडी' हे गावरान प्रेम गीत प्रेक्षकांच्या भेटीला लवकरच येत आहे. नुकतचं त्या दोघांनी आपल्या सोशल मीडियावर बायडी गाण्याचा पोस्टर आणि प्रोमो शेयर केला आहे. बायडी या गाण्याच्या पोस्टरमध्ये अभिनेता पुष्कर जोग रिक्षावाल्याच्या गेटअपमध्ये दिसत आहे. तर




अभिनेत्री पूजा राठोड ही सालस रूपात गावाकडच्या मुलीच्या गेटअप मध्ये दिसली आहे. त्यामुळे गाण्याच्या पोस्टरने प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे.

'वी आर म्युझिक स्टेशन' प्रस्तुत 'बायडी' हे गावरान प्रेम गीताचे निर्माते विशाल राठोड हे आहेत. तर गाण्याचे दिग्दर्शक अभिजीत दाणी हे आहेत. प्रसिद्ध गायक हर्षवर्धन वावरे आणि गायिका कस्तुरी तांबट यांनी हे गाणे गायले आहे. या गाण्याच संगीत प्रितेश मावळे याने केले आहे. बायडी गाण्याचा प्रोमो नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित झाला आहे. तर आता प्रेक्षकांमध्ये या गाण्याची उत्सुकता पाहायला मिळत आहे.




# फुले दाम्पत्यांना भारतरत्न द्या : परशुराम वाडेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा भिडे वाडा येथे काढली. या शाळेच्या स्मारकासाठी रिपब्लिकन पक्षाने पहिले आंदोलन पुकारले. आंबेडकरी चळवळीच्या वतीने अनेक आंदोलने करण्यात आली. यानंतर अनेक पक्ष, संघटना सहभागी झाल्या. या संदर्भात आम्ही कोर्टात सुद्धा गेलो. आज येथे स्मारक होत आहे; यामध्ये आंबेडकरी चळवळीचा मोठा वाटा आहे.

**मागणी**

सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी या देशांमध्ये गोरगरीब जनतेसाठी प्रचंड मोठे काम केले आहे. त्यांनी शोषित पीडित व स्त्रिमुक्तिच्या लढ्यासाठी व कल्याणासाठी स्त्रियांना सन्मान देऊन त्यांना सन्मानाने उभे करण्यामध्ये फुले दापत्यांचा खूप मोठा वाटा आहे. अशा महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारत सरकारने भारतरत्न किताबाने सन्मानित करावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षापासून रिपब्लिकन पक्ष आंबेडकरी चळवळ समाज करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमची विनंती आहे की महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना भारतरत्नाने सन्मानित करावे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सह्यांचे पत्र देखील पाठवण्यात येईल, असे ही परशुराम वाडेकर यांनी सांगितले.

## राष्ट्रीय सुरक्षिततेच्याबाबत भारतीय सैन्यदल सक्षम : मुख्यमंत्री

# 'नो युवर आर्मी' मेळाव्याचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारत देश राष्ट्रीय सुरक्षिततेच्या अनुषंगाने अंतर्गत आणि बाह्यबाजूने मजबूत आहे; भारतीय सेना जगातील उत्तम सेनेपैकी एक असून भू, जल व वायू अशा कोणत्याही मार्गाने होणाऱ्या हल्ल्यास प्रतिकार करण्यास सैन्यदल सक्षम आहे, असे गौरवोउद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

'समर्थ भारत सक्षम सेना' या प्रेरक संकल्पनेअंतर्गत दक्षिण कमांडच्यावतीने रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब येथे आयोजित 'नो युवर आर्मी' मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी खासदार प्रा. मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, दक्षिण कमांडचे आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे महानगर पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, राज्य राखीव पोलीस दलाच्या समादेशक आंचल दलाल, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले.कर्नल सतीश हंगे, माजी राज्य मंत्री दिलीप कांबळे, माजी आमदार विलास लांडे,आदी उपस्थित होते.



"या मेळाव्यात भारतीय सैन्यदलाच्या क्षमता आणि संरक्षण क्षेत्रात चाललेल्या स्टार्टअप आणि नवोन्मेषाचे सुरू असलेले प्रचंड काम पाहायला मिळत आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून नागरिकांना भारतीय सैनिकांशी संवाद साधता येणार आहे, शिवाय युवकांना भारतीय सैन्यदलात भरती होण्याच्यादृष्टीने प्रेरणा मिळे."
**— देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

#रा

# क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्त्री शिक्षणाची कवाडं उघडणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त फुलेवाडा राष्ट्रीय स्मारक येथे केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी शहराध्यक्ष धीरज घाटे, कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून सावित्रीमाईंनी देशाला क्रांतीची नवी वाट दाखवली. त्यांनी रचलेल्या पायाचा आज कळस झाला आहे. त्यांचं संघर्षमय जीवन सदैव प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.





## नानाचा टांग! बहुमताचे साईड इफेक्ट !

खरंतर एप्रिल - मे हा बदल्यांचा खरा काळ ! पण यंदा नियमित पावसापेक्षा अवकाळी पावसाचाच नियम जास्त लागू पडतोय . त्यामुळे नियमित बदल्यापेक्षा अशा डिसेंबर जानेवारी मध्ये झालेल्या ' आमनधपक्या ' बदल्याचाच सुकाळ आहे. त्यात पुन्हा नव्याने सत्तारूढ झालेल्या ' महायुतीची सुगी ' असल्यामुळे या अवकाळी बदल्या बरसणारच !

असो , तर मूळ मुद्दा बदल्यांचा ! यंदा या प्रशासकीय बदलांचा धसका भल्या - भल्यानी घेतला. ' पुन्हा आलेले ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उर्फ लाडके देवाभाऊ हे यंदा एका वेगळ्याच मुड मध्ये असल्याचे दिसून येत आहे. एखाद्या हेडमास्तर ने शाळेला शिस्त लावावी तशा पद्धतीने ते सरकारमधील मंत्र्यांना आणि आमदारांना शिस्त लावण्याचा प्रयत्न चालवला आहे . परंतु त्यांच्या हातात असलेली छडी कोणाच्या पाठीवर किती आसूड ओढते ? हे मात्र कळायला काही वेळ जावा लागणार आहे.

पूर्वी नाही का त्यांनी एकदा भर कार्यक्रमातच ( मुख्यमंत्री ) एकनाथ शिंदे यांना सुनावले होते . म्हणाले , एकनाथ शिंदे तसे खूप लोकप्रिय पण त्यांच्या आजूबाजूला गराडा खूप पडतो. ते गर्दीत राहतात . पण आता ते मुख्यमंत्री झाले तर त्यांना थोडं रिझर्व व्हावं लागेल . ' स्पेसिफाईड ' की असं काहीतरी शब्द त्यांनी वापरला होता. म्हणजे कोणी - कुठे - कसं वागाव याकडे त्यांचा ( तिरका ) कटाक्ष असतोच .

तर मूळ मुद्दा बदल्यांचा ! स्वीय सहायक यांच्या बदल्या नेमणुकांमध्ये हस्तक्षेप करत देवा भाऊंनी थेट मंत्र्यांच्या दिवाणखान्यातच हात घातला. सर्व मंत्र्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरी च्या बदल्या देखील देवा भाऊंच्याच नजरेतूनच होत असल्याचे समजते. किंबहुना त्यांनी तसे जाहीरच केले आहे म्हणा .

त्यामुळे मंत्री कितीही स्वैर झाला तरी त्याला लगाम घालण्याची एक दोरी भाऊंनी स्वतःच्या हातात ठेवली आहे. अनेकांना हा निर्णय पसंत पडला नाही म्हणे .... परंतु आले देवाजींच्या मना, तेथे कोणाचे चालेना ..... अशी अवस्था सर्वच मंत्र्यांची आहे . कदाचित पाशवी बहुमताचे आणि त्यामुळे आलेल्या एकाधिकारशाहीचे हे ' साईड इफेक्ट ' आहेत , असे काही मंत्री खाजगीत बोलून दाखवतात बरं .

खाजगी सचिवांच्या बदल्या झाल्यानंतर देवा भाऊंनी गेल्या दोन दिवसात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा हंगाम पार पाडला. यापूर्वी त्यांनी एक पूर्व हंगाम चाचणी पार पाडली होती . अश्विनी भिडे , श्रीकर परदेशी वगैरे आपल्या मर्जीतील वजीर त्यांनी मंत्रालयात पूर्वीच बसवले. आता दुसऱ्या फळीचाही हंगाम त्यांनी पार पाडला.

या बदल्या - बढत्यांच्या विंगेत कुठल्याही मंत्र्याचे काहीही चालेना , पण पुण्याच्या ( खऱ्या खुऱ्या ) दादांचा दरारा मोठा . त्यांनी आपल्या लाडक्या गजाभाऊला थेट पुणे झेडपीचा सीईओज करून टाकला... म्हणजे पुण्यावर पुढेही दादांचीच दादागिरी चालणार हे दिसून आलं. असो . या गजा भाऊंच्या नियुक्तीमुळे सतत देवाभाऊंना खो घालू पाहणाऱ्या अनेकांना उगाचच हायसं वाटलं. त्यात आमचे लाडके दादा देखील आलेच ! आता या पंचवार्षिक मध्ये ते देखील खरेखुरे पुण्याचे (फक्त कोथरूड चे नव्हे ) देखील झाले आहेत यावरही शिक्कामोर्तब झालय हं !

# आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे उद्घाटन





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** महात्मा फुलें, ज्ञानज्योती सावित्रीबाई व फातिमाबी शेख यांच्या वेशभूषेतील कवी-कवयित्रीनी सादर केलेल्या काव्यरचना, फुले दाम्पत्याचा गौरवपूर्ण उल्लेख, विचारांचा जागर, सावित्री-ज्योति यांच्यासह आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करीत पहिल्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलचे उद्घाटन गुरुवारी झाले. अंगावर हिरवे इरकल, कपाळी आडवा गंध, हाती पुस्तक, ओठी सावित्री-ज्योतिचा जागर अशा स्वरूपात शेकडो महिला सावित्रीबाईंच्या पेहरावात अवतरल्या! डोक्यावर फुले फेटा, अंगात कोट घालून आयोजक महात्मा फुलेंच्या पेहरावात आल्याने सभागृहात जणू सावित्रीबाई, ज्योतिराव आल्याची भावना उपस्थितांच्या मनात होती. भिडेवाडाकार कवी विजय वडवेराव यांच्या संकल्पनेतून देशातील मुलींची पहिली शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत पहिला आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल २ ते ५ जानेवारी या कालावधीत होत आहे. नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात महाराष्ट्रासह देशविदेशातून ६०० कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत.

# गोळवलकर शाळेत भरला 'आधुनिक सावित्रींचा वर्ग'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त टिळक रस्त्यावरील मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालयात 'आधुनिक सावित्रींचा वर्ग' भरविण्यात आला होता सावित्रीची वेशभूषा करून विद्यार्थिनी आणि शिक्षक शाळेत आले होते. या विद्यार्थिनींनी वर्गात विज्ञान व माहिती तंत्रज्ञान याविषयीचा धडा शिकला. पारंपरिक वेशभूषेतील सावित्रीच्या लेकी अभ्यासासाठी लॅपटॉप, मोबाईल, टॅब, मोबाईल फोन अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. या कार्यक्रमातून सावित्रीबाई फुले यांना आगळ्यावेगळ्या पद्धतीने आदरांजली वाहण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून भारतीय ज्ञान परंपरेला माहिती तंत्रज्ञानाची जोड देऊन जगात भारताला विश्वगुरू बनविण्याचा संदेश देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे मुख्याध्यापिका वासंती बनकर यांनी सांगितले. सोनल एरंडे, प्रिया जोशी, श्रद्धा सावळेकर या शिक्षकांनी संयोजन केले.

# शिवसेना पुणे शहराच्या वतीने अभिवादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सारसबाग येथील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादनासाठी शिवसेना शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, माजी नगरसेवक अशोक हरणावळ, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत, युवासेना शहर संघटक राम थरकुडे, शहर संघटक किशोर रजपूत, बाळासाहेब भांडे, परेश खांडके, विधानसभाप्रमुख उत्तम भुजबळ आदी उपस्थित होते.

# मानवी मूल्य रुजविण्याचे काम फुले दाम्पत्यांनी केले - डॉ. गोऱ्हे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिलांचे अधिकार म्हणजेच मानवी अधिकार आणि मानवी अधिकार म्हणजेच महिलांचे अधिकार आहेत आणि याची स्थापना महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी त्याकाळी केली. संयुक्त राष्ट्रसंघ आज जगामध्ये हेच मानवी मूल्य रुजवण्याचे काम करतोय ते काम या दाम्पत्यांनी त्याकाळी केले,असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका असलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अथिति म्हणून उपस्थित होत्या. यावेळी विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोरील सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रविंद्र शिंगणापुरकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. सागर वैद्य, ज्योत्स्ना एकबोटे, अधिष्ठाता प्रा. (डॉ.) विजय खरे, विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य, अधिसभा सदस्य आदींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## सर्व धर्मियांसाठी मोफत आरोग्य शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अखिल भारतीय समता सैनिक दल पुणे यांच्यामार्फत आरोग्यसेवा शिबिराचे आयोजन केले होते. भीमाकोरेगाव विजय स्तंभास मानवंदना देण्याकरीता नागपूर, मुंबई, ठाणे, अहमदनगर, येथून आलेले सर्व पदाधिकारी व सैनिकांचे मदर टेरीसा हॉल, येरवडा, पुणे येथे स्वागत करून रहाण्याची सोय अ.भा समता सैनिक दलाच्या वतीने करण्यात आली होती.

या मोफत आरोग्य सेवेचा सर्व जाती धर्मातील शेकडो बांधवांनी लाभ घेतला. यामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला व बालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. एम्पॉवर चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांच्यामार्फत डॉ.सुरेश कठाणे, डॉ ज्योती दवे यांनी आरोग्य तपासणी व उपचार केले. कार्यक्रमासाठी विनय दवे यांनी विशेष सहकार्य केले.

## सेवादान..

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




पुणे आरोग्य तपासणी: अखिल भारतीय समता सैनिक दल पुणे यांच्यामार्फत दिलेल्या मोफत आरोग्य सेवेचा सर्व जाती धर्मातील शेकडो बांधवांनी लाभ घेतला. यामधे अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला व बालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

# प्राध्यापकांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फतच व्हावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राध्यापकांची भरती विद्यापीठ स्तरावर करण्याचा विचार महायुती सरकार करत असून, हे धोरण काँग्रेसला मान्य नाही. प्राध्यापकांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फतच व्हावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, माजी आमदार मोहन जोशी यांनी राज्यपालांकडे केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष यांनाही याबाबत पत्र पाठवण्यात आले आहे. विद्यापीठात रिक्त जागा तयार झाल्यानंतर त्या राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाला कळवून मुख्यमंत्र्यांच्या संमतीने आयोगाला कळवल्या जातात. त्यानंतर आयोगामार्फत भरतीची प्रक्रिया राबविली जाते. ही पद्धत पारदर्शी आहे.

तसेच कायद्यानुसारही ही प्रक्रिया विशिष्ट कालावधीत करणे आयोगाला बंधनकारक आहे, असे निवेदनात म्हटले आहे. विद्यापीठ स्तरावर भरती केल्यास ही प्रक्रिया पारदर्शी न रहाता, त्यात भ्रष्टाचाराला वाव राहील. असे जोशी यांनी म्हटले.

### विद्यार्थ्यांचे नुकसान नको

- राज्य व केंद्र सरकार उच्च शिक्षणाला महत्त्व देत असताना दर्जेदार उच्च शिक्षणासाठी अत्यावश्यक असलेली प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मात्र नुकसान होत आहे. भरती प्रक्रियांना अद्याप मुहूर्त न सापडल्याने प्राध्यापक भरती प्रक्रियाही 'एमपीएससी' मार्फत राबवली, तर ती लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिणामी विद्यार्थ्यांचे व विद्यापीठांचे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर ही भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फतच व्हावी अशी मागणी झाली आहे.

# 'मी धनकवडीचा भाई' म्हणत दहशत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**धनकवडी :** कोयते उगारुन टोळक्याने चार मोटारी, तसेच दुचाकींची तोडफोड केल्याची घटना घडली. याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तोडफोड प्रकरणात साहिल दुधाणे याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पियुष मोहन चव्हाण (वय २०, रा. ओम शिवशंभो हाईट्स, मोहननगर, धनकवडी) याने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दुधाणे याच्याशी चव्हाण याचा वाद झाला होता.

चव्हाण आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांना कोयत्याचा धाक दाखविला. मला धनकवडीचा भाई म्हणतात, असे सांगून त्याने त्यांच्यावर कोयते उगारले. त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपींनी धनकवडीतील बसथांब्याजवळ रस्त्यावर लावलेल्या चार मोटारींच्या काचा फोडल्या, तसेच दोन दुचाकींची तोडफोड केली. चव्हाण याला धमकावून आरोपी मोटारीतून पसार झाले. या घटनेची माहिती मिळतात वरिष्ठ पोलीस निरीक्षक छगन कापसे यांनी घटनास्थळी भेट दिली. हवालदार चव्हाण तपास करत आहेत.

# डायबेटिक न्यूरोपॅथी रुग्णांसाठी प्रथमच रिजनरेटिव्ह थेरपी

आरोग्य

**पुण्याच्या पेनेक्स क्लिनिकने डायबेटिक न्यूरोपॅथी रुग्णांसाठी प्रथमच रीजनरेटिव्ह थेरपी सुरू केली आहे. या उपचाराने शारीरिक वेदनांच्या व्यवस्थापनात महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. डायबेटिक न्यूरोपॅथी ह्या प्रगत थेरपीमध्ये प्लेटलेट-रिच प्लाझ्मा (पीआरपी) थेरपीसारख्या अत्याधुनिक पद्धतीचा वापर केला जातो.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वेदना व्यवस्थापनात अग्रगण्य असलेल्या पेनेक्स क्लिनिकने डायबेटिक न्यूरोपॅथी रुग्णांना रिजनरेटिव्ह थेरपी उपलब्ध केली असून, शारिरीक वेदनांवरील उपचार पर्यायांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. डायबेटिक न्यूरोपॅथी ही मधुमेहातील एक सामान्य वेदनादायी स्थिती आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने हात आणि पायांच्या मज्जातंतूंना इजा पोहोचून वेदना होणे, मुंग्या येणे, सुन्नपणा जाणवणे आणि संवेदना कमी होणे अशाप्रकारचा त्रास जाणवतो. पारंपरिक उपचार पद्धतींमधून ह्या समस्येवर मात करणे आव्हात्मक असते.



डायबेटिक न्यूरोपॅथी ह्या प्रगत थेरपीमध्ये प्लेटलेट-रिच प्लाझ्मा (पीआरपी) थेरपीसारख्या अत्याधुनिक पद्धतीचा वापर केला जातो. ज्यामध्ये इजा झालेल्या मज्जातंतूंच्या टिश्यूवर उपचार करणे आणि त्यांचे पुनरुत्पादन करणे अशा पद्धतींचा समावेश आहे. ह्या थेरपीने इजा नैसर्गिकरित्या बरी होते, जळजळ कमी होते आणि मज्जातंतूचे कार्य चांगले होते, तसेच रुग्णांना शस्त्रक्रिया किंवा तीव्र वेदनांच्या औषधांवर अवलंबून न ठेवता दीर्घकालीन आराम मिळतो.

> "डायबेटिक न्यूरोपॅथी लाखो रुग्णांच्या जीवनावर गंभीर परिणाम असून, रिजनरेटिव्ह थेरपी च्या माध्यमातून आम्ही त्याच्या मूळ कारणांवर योग्य उपचार करण्यावर भर देत आहोत. ही अभिनव उपचार पद्धती पुण्यात आणल्याचा आम्हाला अभिमान आहे." —डॉ. निवेदिता पागे, संस्थापक आणि संचालक, पेनेक्स क्लिनिक

- इजा झालेल्या मज्जातंतूंवर थेट उपचार करून, ही थेरपी केवळ वेदना कमी करत नाही तर मज्जातंतूंचे कार्य पूर्वीसारखे सुरू करते.
- रुग्णांची शारीरिक हालचाल आणि जीवनमान लक्षणीयरित्या सुधारते.
- ही थेरपी घेत असलेल्या रुग्णांनी उल्लेखनीय प्रगती नोंदवली आहे, ज्यामध्ये वेदना कमी होणे, मज्जातंतूचा उत्तम प्रतिसाद आणि पूर्वी न्यूरोपॅथिक लक्षणांमुळे अडथळा येत असलेली दैनंदिन काम पूर्वीसारखी करणे यांचा समावेश आहे.

## At a Glance

### विश्व गुजराती समाजच्या महासमितीवर राजेश शहा



**पुणे :** आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या विश्व गुजराती समाजच्या अहमदाबाद येथील मुख्यालयात नुकतीच संस्थेचे निवडणूक अधिकारी डॉ. प्रफुल्ल ठाकूर व ॲड. ए. एस. सय्यद यांच्या उपस्थितीमध्ये विश्व् गुजराती समाजच्या महासमितीची निवडणूक पार पडली. त्या निवडणुकीचे निकाल मा. निवडणूक अधिकारी यांनी नुकतेच जाहीर केले आहेत. त्याद्वारे पुणे येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक, सामाजिक क्षेत्रातील आघाडीचे व्यक्तिमत्व, जयराज ग्रुपचे संचालक राजेश शहा यांची महासमितीच्या सभासद पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड म्हणजे पुण्यातील विशेषतः गुजराती समाजासाठी अभिमानाची बाब आहे. तसेच या निवडीने राजेश शहा यांच्या अनेक वर्षांच्या सामाजिक कार्याचा यथोचित गौरव करण्यात आला आहे.

### शपथ घेऊन स्वच्छतेसाठी संकल्प

**कोथरूड :** बावधन क्षेत्रिय, पुणे महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रभाग क्रमांक १२, डहाणूकर कॉलनी व कोथरूड गावठाण आरोग्य कोठीच्या "स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण मिशन - २०२५" व " सफाई सैनिकांच्या वतीने स्वच्छतेचा संकल्प केला. यावेळी संकल्पनेचा निर्धार करून शहराला स्वच्छ, सुंदर, हरितकचरा मुक्त करण्याचा निर्धार केला.

# नव्या दुचाकीसोबत २ हेल्मेटची सक्ती

## शोरूम मालकांना आरटीओचे आदेश; नव्या वर्षी खिश्याला कात्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात वाहन वितरकांना दुचाकीची विक्री करताना ग्राहकांना दोन हेल्मेट देणे अनिवार्य असणार आहे. पुण्यासह परिसरात होणाऱ्या अपघातात होणारी जीवितहानी टाळण्यासाठी सरकारद्वारे हा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने या संबंधित आदेश दिले आहेत. नवीन दुचाकी खरेदी करताना शोरुमकडून दोन हेल्मेट दिले जाणार आहेत. याबाबतची सक्ती पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केली आहे. रस्त्यांवर वाहनांचे त्यातही दुचाकीचे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. अपघात जीवितहानी होऊ नये यासाठी हेल्मेट वापरणे आवश्यक असते. यावरुनही पुणे आरटीओने ही सक्ती केली आहे. त्यांनी यासंबंधित पत्रक देखील प्रसिद्ध केली आहे.

पुणे आरटीओच्या पत्रकामध्ये "रस्ते अपघातात दुचाकी वाहनचालकांची बळींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच दुचाकी अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूंची संख्या लक्षणीय आहे. दुचाकीस्वारांनी जर हेल्मेटचा वापर केला तर अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येमध्ये निश्चित घट होवू शकते. त्यामुळे वाहनचालकाने स्वत: आणि सोबत बसलेल्या व्यक्तीने रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणाऱ्या हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक आहे. तसेच केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १३८ नुसार नविन दुचाकी वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना, खरेदीवेळी वाहन वितरकाने दोन हेल्मेट पुरविणे आवश्यक आहे. याबाबत दुचाकी वितरकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. नविन दुचाकी खरेदी करणाऱ्या सर्व नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहन ताब्यात घेतेवेळी वाहन वितरकाकडून दोन हेल्मेट प्राप्त करुन घ्यावीत", असे नमूद करण्यात आली आहे.



### अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येमध्ये निश्चित घट होवू शकते

- एक्स्प्रेसवेसह अन्य महामार्गांवर दुचाकीवर बसलेल्या दोघांनाही हेल्मेट घालण्याची सक्ती करण्यात आली आहे. पुणे परिवहन कार्यालयाच्या ग्राहकांना दोन हेल्मेट देण्याच्या निर्णयामुळे महामार्गावर दुचाकीस्वार हेल्मेट वापरणाऱ्यांची संख्या वाढील अशी आशा व्यक्त केली जात आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १९८ अन्वये नवीन दुचाकी वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना खरेदीच्यावेळी वाहन वितरकाने दोन हेल्मेट पुरविण्याबाबत दुचाकी वाहन वितरकांना सुचना देण्यात आल्या आहेत; ग्राहकांनी नवीन दुचाकी वाहन खरेदी करतांना वितरकांकडून हेल्मेट घ्यावेत. दुचाकीस्वारांनी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर केल्यास अपघातामध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे वाहनचालक आणि सोबत बसलेल्या व्यक्तीनेही रस्ता सुरक्षा मानकांची पूर्तता करणाऱ्या हेल्मेटचा वापर करणे अत्यावश्यक आहे,
**— स्वप्निल भोसले,** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

पाच वर्षांच्या रस्ते अपघाताचा आढावा बघितल्यास अपघातग्रस्तांमध्ये विना हेल्मेट दुचाकी चालक आणि त्याच्या मागे बसलेल्यांची संख्या अधिक आहे. यात अनेकांचा जीवही गेलेला आहे. अशा पार्श्वभूमीवर दुचाकीवरील दोघांना हेल्मेट अनिवार्य हा निर्णय स्वागतार्ह आहे.
**— अमित नाईक** (प्रवासी, )

# फलकासमोरच कचरा टाकताय सावधान !

## प्रशासन दंडात्मक कारवाईला गती देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकीकडे शहरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई वाढली असल्याचा दावा महापालिका प्रशासन करीत असले तरी, उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकार सुरु आहे. महापालिकेने दंडात्मक कारवाईचा इशारा दिलेल्या फलकासमोरच कचरा टाकण्यात येत असल्याचे चित्र शहरात दिसत आहे. शहर स्वच्छ करण्यासाठी महापालिकेच्या घन कचरा विभागाकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश येत असले तरी अद्यापही नागरीकांकडून उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होत नाही. गेल्यावर्षभरात ५२ हजार ४०५ जणांवर कारवाई करुन सुमारे ३ कोटी २८ लाख १८७ रुपये इतका दंड महापालिकेने वसुल केला आहे. पुढील काळात दंडात्मक कारवाईला गती देणार असल्याची माहीती उपायुक्त संदीप कदम यांनी दिली.

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेच्या घन कचरा विभागाने कचरा जमा होणारे सुमारे ९२३ क्रॉनिक स्पॉट शोधून काढले होते. या क्रॉनिक स्पॉटची संख्या कमी करण्यासाठी विविध उपाय केले जात आहे. सुमारे ८० टक्के क्रॉनिक स्पॉट हे कचरा मुक्त झाल्याचा दावा घन कचरा विभागाकडून केला जात असला तरी, अद्याप शहरात नवीन क्रॉनिक स्पॉट निर्माण होत आहे. नागरीकांकडून कचरा वर्गीकरण करून न देणे, मोकळ्या जागेत, रस्त्याच्या कडेला कचरा फेकून देणे असे प्रकार सुरु आहेत. महापालिकेने शहरातील क्रॉनिक स्पॉटच्या ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देण्याचे फलक लावले आहे. या फलकासमोरच कचरा टाकला जात असल्याने कारवाई विषयी शंका उपस्थित होत आहे.

**अठरा पथकांमुळे कारवाईला गती मिळेल**

महापालिकेच्या घन कचरा विभागाला अठरा जीप उपलब्ध करून दिल्या आहेत. या वाहनातील पथक हे शहरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करीत आहे. सर्व गाड्या आता उपलब्ध झाल्याने कारवाईला गती मिळेल असा विश्वास उपायुक्त कदम यांनी व्यक्त केला.

### गेल्या वर्षभरात केलेल्या कारवाईचा आढावा

- **सार्वजनिक ठिकाणी थुंकणे** : १ हजार ४२ जणांकडून एकुण साडे दहा लाख रुपये दंड वसुल
- **सार्वजनिक ठिकाणी लघवी करणे :** ५ हजार ७९७ जणांकडून एकुण ११ लाख ७० हजार रुपये दंड वसुल
- **कचरा जाळणे :** ५६४ जणांकडून ५ लाख साडे १३ हजार रुपये दंड वसुल
- **कचरा वर्गीकरण करून न देणे :** ३ हजार ७८४ जणांकडून ८ लाख ३१ हजार ८१० रुपये दंड वसुल
- **सार्वजनिक ठिकाणी कचरा करणे :** ३८ हजार ५४७ जणांकडून १ कोटी ९४ लाख ६७ हजार १८९ रुपये दंड वसुल

# एकाच कुटुंबातील तीन व्यक्ती सांभाळणार पुण्याचा कार्यभार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी सातारा जिल्ह्याचे जितेंद्र डुडी यांना पदस्थापना दिलीय. त्यांच्याजागी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सीईओ संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली. दरम्यान जितेंद्र डुडी यांची पुणे जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली. तर त्यांची पत्नी आंचल दलाल ह्या भारतीय पोलीस सेवेत आयपीएस आहेत. तर शेखर सिंह डुडी हे जितेंद्र डुडी यांचे मेहुणे असून ते आयुक्त पदावर कार्यरत आहे. त्यामुळे एकाच कुटुंबातील तीन व्यक्ती पुण्याचा वेगवेगळा कारभार संभाळणार आहेत. जितेंद्र डुडी पुणे जिल्हाधिकारी पदावर असून त्यांच्या पत्नी आंचल दलाल भारतीय पोलीस सेवेत (आयपीएस) असून पुणे जिल्ह्यातील राज्य राखीव दलात (एसआरपीएफ आहेत, तर शेखर सिंह डुडी यांचे मेहुणे असून ते काही महिन्यांपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत आयुक्त पदावर कार्यरत आहेत.



# मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीराला सुरुवात

## विश्वविख्यात प्लॅस्टिक सर्जन स्वर्गीय डॉ. शरदकुमार दिक्षीत (अमेरिका) स्मरणार्थ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय जैन संघटना, संचेती हॉस्पिटल, पुणे व चांदमल मुनोत ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने "३१ वे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर" गुरुवार दिनांक २ जानेवारी रोजी यशस्वीरित्या संचेती हॉस्पिटल, शिवाजीनगर, पुणे येथे सुरु झाले.

स्वर्गीय पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या समरणार्थ हे शिबीर मागील ३० वर्षांपासून संचेती हॉस्पिटलमध्ये घेतले जाते, असे संचेती हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. पराग संचेती यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले. डॉ. लॅरी वेनस्टाईन हे अमेरिकेमधून येतात आणि सेवा करतात, ही खूप मोठी गोष्ट आहे. पद्मभूषण डॉ. के.एच. संचेती आणि शांतिलाल मुथ्था हे कॅम्पचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या प्रेरणेने हे काम मागील ३० वर्षांपासून निरंतर चालू आहे. उद्घाटन प्रसंगी अभय मुनोत, चेअरमन चांदमल मुनोत ट्रस्ट उपस्थित होते.




असे कॅम्प मोठ्या संख्येने करावेत, तसेच वर्षांमध्ये ६ महिने हे कॅम्प राबवावेत. प्लास्टिक सर्जरी आणि ऑर्थोपेडिक कॅम्प एकत्र करावेत, त्यातून मोठी सेवा होऊ शकते." ते स्वतः जास्तीत जास्त वेळ सामाजिक कार्याला देणार आहे.
**— डॉ. पराग संचेती**

### शिबिरातील वैशिष्ट्ये

- या शिबिरामध्ये मुख्यत्वे करून दुभंगलेले ओठ, चेहऱ्यावरील विद्रूप वर्ण व डाग, नाक व कान यावरील बाह्यव्यंग, पापण्यातील विकृती अशा प्रकारच्या सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असणाऱ्या महागड्या शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार आहेत.
- "आपण सर्व या कॅम्पचा फायदा घेऊ शकता असे आवाहन केले आहे.

# १३ फेब्रुवारीपासून 'पिफ्फ' महोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २३वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५ यंदा १३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत पीव्हीआर, पॅव्हिलियन मॉल, आयनॉक्स - बंडगार्डन आणि सिनेपोलीस-औंध येथे ११ स्क्रीनस मध्ये आयोजित करण्यात आला आहे. या चित्रपट महोत्सवात जागतिक व मराठी चित्रपट स्पर्धात्मक विभाग आणि अन्य विभाग यांमध्ये सुमारे १५० हून अधिक देशी विदेशी चित्रपट रसिक प्रेक्षकांना बघता येतील. शोमैन राज कपूर यांची १००वी जयंती ही या वर्षीची थीम असणार आहे. नाव नोंदणी www.piffindia.com यावर दि. १५ जानेवारी पासून सुरु होत आहे, अशी माहिती ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक व पुणे फिल्म फाउंडेशनचे चेअरमन डॉ. जब्बार पटेल यांनी दिली.

### निवडण्यात आलेल्या १४ चित्रपटांची यादी




- **डार्केस्ट मीरियम,** दिग्दर्शक - नाओमी जये, कॅनडा
- **ऑन द इन्वेंशन ऑफ स्पीशीज़,** दिग्दर्शक - तानिया हरमीड, इक्वाडोर, क्यूबा
- **टू अ लँड अननोन,** दिग्दर्शक - महदी फ्लेफेल, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड, ग्रीस, कतार, सौदी अरेबिया, पॅलेस्टाईन
- **ग्रैंड टूर,** दिग्दर्शक - मिगुएल गोम्स, पोर्तुगाल, इटली, फ्रान्स
- **अरमंड,** दिग्दर्शक - हलफदान उल्लमांन तोंडेल, नॉर्वे, नेदरलँड, जर्मनी, स्वीडन
- **सेक्स,** दिग्दर्शक - डॅग जोहान हाउगेरूड, नॉर्वे
- **इलेक्ट्रिक फील्ड्स,** दिग्दर्शक - लिसा गेर्ट्सच, स्वित्झर्लंड
- **अंडर द वोल्केनो,** दिग्दर्शक - डेमियन कोकूर, पोलंड
- **ए ट्रॉवेलर्स नीड्स,** दिग्दर्शक - हॉंग सांगसू, दक्षिण कोरिया
- **ब्लैक टी,** दिग्दर्शक - अब्दर्रहमान सिसाको, फ्रान्स, मॉरिटानिया, लक्झेंबर्ग, तैवान, आयव्हरी कोस्ट
- **सम रेन मस्ट फॉल,** दिग्दर्शक - यांग क्यू, चीन, अमेरिका, फ्रान्स, सिंगापूर
- **एप्रिल,** दिग्दर्शक - डी कुलुंबेगश्वील, फ्रान्स, इटली, जॉर्जिया
- **थ्री किलोमीटर्स टू द एंड ऑफ द वर्ल्ड्स,** दिग्दर्शक - एमानुअल पर्वू, रोमानिया
- **इन रिट्रीट,** दिग्दर्शक - मैसम अली, इंडिया

### पाचवी-आठवीच्या परीक्षेसंदर्भात संभ्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारने इयत्ता पाचवी आणि आठवीच्या मुलांच्या वार्षिक परीक्षा घेऊन उत्तीर्ण मुलांना पुढच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल, असा निर्णय जाहीर केला. तर राज्य सरकारने हे धोरण यापूर्वीच स्वीकारले आहे. या धोरणामुळे शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेतलेला विद्यार्थी वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याला मोफत शिक्षणाची सवलत मिळणार का? आणि शाळांकडून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्काची विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या पालकांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शिक्षण विभागाने याबाबत मार्गदर्शन करणारे परिपत्रक प्रसिद्ध करावे, अशी मागणी अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेने केली आहे.

## जर्मन नाटकात ध्रुव ग्लोबल प्रथम

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**पुणे** उल्लेखनीय यश! 'शाश्वत' या विषयाला अनुसरून ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावले आहे. या नाटकास सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गोएथे इन्स्टिट्यूट मॅक्स म्यूलर भवन, पुणे आणि एमईएस सिनियर कॉलेज, पुणे यांच्या तर्फे आयोजित आंतरशालेय जर्मन नाट्य स्पर्धेत नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलने 'शाश्वततेबद्दल टॉक शो' (पथनाट्या) चे सादरीकरण करून प्रथम क्रमांक पटाकावले. पुणे, कोल्हापूर आणि आष्टा येथील ९ शाळांमधील १५० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. यामध्ये ध्रुव ग्लोबल स्कूल, नांदे येथील ८ वीं ते १० वर्गातील १० विद्यार्थ्यांनी 'शाश्वततेबद्दल टॉक शो' चे सादरीकरण केले. या नाटकाचे सादरीकरण सई कुलकर्णी, शांभवी काळे, तनिश कांसारा, इशानवी बरपांडा,अचल गुप्ता, म्रिधीनी गुप्ता, खुशी देशमुख, ओवी सोंज, त्रिषा कोतलवाल आणि महिका पटवर्धन यांनी केले. अहीर यांनी रंगमंचासाठी मदत केली आहे. जर्मन विभाग प्रमुख धनश्री महाजनी यांनी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या शाश्वततेबद्दल टॉक शो चे विद्यार्थ्यांनी अप्रतिम सादरीकरण केले. प्राचार्या संगीता राऊत यांनी उल्लेखनीय यशासाठी टीम आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन केले



# पालकमंत्री पदावरुन महायुतीत कोणताही वाद नाही : मोहोळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या पालकमंत्रीपदावरून सत्ताधारी महायुतीत कोणताही वाद नसल्याची स्पष्टोक्ती केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शुक्रवारी दिली.

आम्ही निवडणुक एकत्रित लढलो असून महायुतीच्या नेत्यात चांगल्याप्रकारे समन्वय आहे. कार्यकर्त्यांत समज देखील आहे. त्यामुळे ते पक्ष नेतृत्व जो निर्णय घेतो त्याची अंमलबजावणी करतात. पक्ष नेतृत्व जे सांगतो ते ऐकणे ही आमच्या पक्षात शिस्त आहे.



मनपा निवडणुकीच्या जागांबाबत त्यावेळी निर्णय घेतला जाईल. मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश विकासाच्या वाटेवर जात आहे. जगात देखील देशाची पत वाढली आहे. मोदी यांच्यावर विश्वास ठेऊन अनेक नेते भाजपात येत आहेत. पुण्यात देखील शिवसेनेचे काही माजी नगरसेवक भाजपात येत आहेत. आम्ही कोणाला त्रास देत नाही किंवा या म्हणून सांगत नाही, आमचे चांगले काम सुरु असल्याने लोक सोबत येत आहेत. जागा लढणे व जागा जिंकणे यात फरक असतो, असे मुरलीधर मोहोळ म्हणाले. पुण्यातील भिडेवाडा येथे फुले दाम्पत्यास अभिवादन केल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

# 'विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती' योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे, भारततर्फे १०वींच्या (एसएससी व सीबीएसई) हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड शिष्यवृत्ती' ही अभिनव योजना जाहीर करण्यात आली आहे. या वर्षी ही परीक्षा सोमवार २७ जानेवारी रोजी घेण्यात येईल,. अशी माहिती नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण आणि माईर संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांनी दिली.

**अभिनव योजना**

आयोजित परीक्षा दोन भागामध्ये म्हणजे पहिला पेपर स. ११ ते दुपारी १ आणि दुसरा पेपर दुपारी ३ ते ५ या दरम्यान होईल. या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ३ फेब्रुवारी रोजी जाहीर होईल. परीक्षा इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या १०वीं च्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणार आहे. महाराष्ट्रातील कोकण (मुंबईसह), उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या पाच विभागात २७ जानेवारी रोजी परीक्षा घेतली जाईल. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक विभागातून गुणानुक्रमे पहिल्या नऊ विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती स्कॉलरशिप २ वर्षासाठी (११वीं आणि १२वीं साठी) असेल.

या संदर्भातील विस्तृत माहिती या https://wpcvalue-education.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# महापालिका प्रशासनाला ३ हजार रिक्षांच्या अर्जाचे उद्दिष्ट्य

## 'पिंक-ई रिक्षा' योजनेसाठी १३५ अर्ज

**राज्य शासन २० टक्के निधी देणार आहे तर लाभार्थी महिला, मुली यांना १० टक्के रक्कम भरावी लागणार आहे. या रिक्षासाठी देण्यात येणारे ७० टक्के कर्ज लाभार्थी महिलांना ५ वर्षांत परतफेड करावे लागणार आहे.**


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महिलांना स्वयंरोजगार मिळण्यासाठी सरकारद्वारे प्रयत्न केले जात आहे. यासाठी सरकारने अजून एक विशेष निर्णय घेतला आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने 'पिंक-ई रिक्षा' योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत तीन लाखांच्या आत उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना ही रिक्षा घेण्यासाठी कर्ज तसेच अनुदान देण्यात येणार आहे. त्याची जबाबदारी महापालिका प्रशासनावर देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३ हजार रिक्षांसाठीचे अर्ज भरून घेण्याचे उद्दिष्ट महापालिका प्रशासनास देण्यात आले असून, आतापर्यंत १३५ अर्ज आले आहेत. या बाबतची माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाने दिली.



### योजनेच्या अटी

- लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्राचे रहिवासी असावे.
- अर्जदार महिलेचे वय २० ते ४० वर्षे आवश्यक
- लाभार्थीचे बँक खाते असणे आवश्यक आहे.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम तीन लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.
- विधवा, कायद्याने घटस्फोटित, दारिद्र्य रेषेखालील महिलांना प्राधान्य



जिल्हाधिकारी कार्यालय आणि महिला बालकल्याण विभाग यांच्यासोबत महापालिकेच्या समन्वयाने ही योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार शासनकडून ई- रिक्षासाठी नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राष्ट्रीयकृत बँका तसेच या योजनेअंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या खासगी बँकाकडून ई-रिक्षा किमतीच्या ७० % कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ती, राज्य शासन २० टक्के निधी देणार आहे तर लाभार्थी महिला, मुली यांना १० टक्के रक्कम भरावी लागणार आहे. या रिक्षासाठी देण्यात येणारे ७० टक्के कर्ज लाभार्थी महिलांना ५ वर्षांत परतफेड करावे लागणार आहे. योजनेचे अर्ज क्षेत्रीय कार्यालयामधील समाज विकास विभागामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. भरलेले अर्ज कागदपत्रांसह या ठिकाणीच जमा करावे लागणार आहेत.

Selected

## किरकोळ कारणावरून मोशी येथे दोन गटांत हाणामारी


**मोशी :** किरकोळ कारणावरून मोशी येथे दोन गटांत हाणामारी झाली. त्याबाबत परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



ही घटना ३१ डिसेंबरला रात्री घडली. विकास ज्ञानेश्वर सस्ते (वय ४४, रा. मोशी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गोल्या ऊर्फ साहिल कांबळे, अजिंक्य काशीराम नलवाड (१९, रा. मोशी), चंद्रकांत नलवाड, रोहन हळकुंटे, केपी आणि इतर दोन ते तीनजणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विकास यांचा भाऊ विलास यांनी त्यांच्या बंगल्यासमोर थांबलेल्या तरुणांना 'तुम्ही रस्त्यात का गोंधळ घालता' असे विचारले. त्या कारणावरून संशयित आरोपींनी विलास यांना कोयत्याने, काठीने, विटांनी मारून गंभीर जखमी केले.फिर्यादी यांची आई भांडण सोडविण्यासाठी गेली असता त्यांनाही मारहाण केली. याच्या परस्पर विरोधात चंद्रकांत मनोहर नलवाड (वय ४६, रा. मोशी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार विलास ऊर्फ भाऊ ज्ञानेश्वर सस्ते, विकास ज्ञानेश्वर सस्ते यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादी यांचा पुतण्या, त्यांच्या मित्राला आणि फिर्यादी यांना मारहाण केली. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

## वाकडमध्ये पान टपरीतून विकला जात होता गांजा

**वाकड :** पिंपरी- चिंचवडमध्ये पान टपरीत गांजा विक्री करणाऱ्या पान टपरी चालकाला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून




पाच किलो शंभर ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. पुनीतकुमार विवेक शेट्टी असं अटक करण्यात आलेल्या गांजा विक्रेत्याचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नूतन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अमली पदार्थ विक्रेत्यांवर करडी नजर ठेवली होती. नूतन वर्षाच्या पार्श्वभूमीवर अनेक जण नशा करतात हे पोलिसांना माहीत होतं. यामुळेच पुनीत कुमार हा त्याच्या साई श्री पान शॉप मधून गांजा विक्री करत असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली होती. याबाबत पोलिसांनी सविस्तर माहिती घेऊन खात्री करून छापा टाकला आणि गांजा विक्रेता पुनीतकुमारला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून पाच किलो शंभर ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात बेकायदेशीररित्या गांजा बाळगल्या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८(क), २०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले एकविरा देवीचे दर्शन



**पिंपरी :** येथील श्री एकविरा देवी ही आदिशक्ती म्हणून प्रसिद्ध आहे. नवीन वर्षाची सुरूवात करीत असताना शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एकविरा देवीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या भगिनी जेहलम जोशी याही उपस्थित होत्या. नवीन वर्ष महाराष्ट्रासह देशाला सुख समाधानाचे, शेतकऱ्यांना न्याय देणारे असावे. त्यासोबतच सर्वांना आरोग्य, सौख्य, यश आणि विजयलक्ष्मी प्राप्त व्हावी, अशी प्रार्थना डॉ. गोऱ्हे यांनी देवीच्या चरणी केली. त्यानंतर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला जे यश मिळाले त्याबद्दल एकविरा देवीला केलेला नवस त्यांनी फेडला. डोंगरावरील देवी माता आणि पायथा मंदिर या दोन्ही ठिकाणी देवीला साडी-ओटीचा नैवेद्य अर्पण केला.

## दारू पिण्यास नकार दिल्याने तरुणावर तलवारीने वार

**पिंपरी :** दारू पिण्यासाठी नकार दिल्याने तरुणावर तलवारीने वार केले. ही घटना गुळवे वस्ती भोसरी येथे घडली. अनुज फेबियन केओ



(वय २८, रा. दापोडी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांनी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार नवप्रीत अजित सिंग (२९, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी नवप्रीत याचे गुळवे वस्ती भोसरी येथे वर्कशॉप आहे. वर्कशॉपमध्ये नवप्रीत हा दारू पीत असताना त्याने अनुज यांना दारू पिण्याचा आग्रह केला. त्यासाठी अनुज यांनी नकार दिला असता नवप्रीत याने अनुज यांच्यावर तलवारीने वार केले. यामध्ये अनुज गंभीर जखमी झाले आहेत.

# शहरातील पेव्हींग ब्लॉकचे काम निकृष्ट

### चांगले रस्ते खोदले : नागरिकातून प्रचंड होतेय संतापाची लाट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** संत तुकारामनगर परिसरात सुव्यवस्थित असलेले पेव्हींग काढून पुन्हा नव्याने पेव्हींग ब्लॉक त्याच ठिकाणी बसविण्यात आले. मात्र, नव्याने बसविण्यात आलेले पेव्हींग ब्लॉकचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याबाबत नागरिकांनी महापालिकेकडे तक्रार केली आहे.

चांगले रस्ते खोदणे, सुस्थितीत असलेले पदपथावरील पेव्हींग बदलणे, चांगले पथदिवे काढून त्या ठिकाणी नवीन पथदिवे व खांब टाकणे असे प्रकार नवीन नाहीत. ठेकेदारांचे खिसे भरण्यासाठी असे प्रकार शहरात सर्रास सुरु असतात. याबाबत महापालिका सभागृहात अनेकदा काही लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला. मात्र, त्याचा काहीही उपयोग झाला नाही. असाच प्रकार संत तुकारामनगर येथे उघडकीस आला आहे. संत तुकाराम नगरमधील काही भाग दाटीवाटीचा आहे.

या छोट्याशा बोळीत डांबरीकरण करता येत नसल्याने महापालिकेच्या वतीने पेव्हींग ब्लॉक टाकण्यात आले आहेत. मागील काही वर्षापासून हे पेव्हींग ब्लॉक चांगल्या स्थितीत आहेत. तेथे कोणत्याही प्रकारची दुरुस्तीची आवश्यक्ता नसताना महापालिकेने देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली येथील पेव्हींग ब्लॉक उखडून तेच ब्लॉक पुन्हा बसविले. यामध्ये नागरिकांची मोठी गैरसोय झाली, तसेच नव्याने झालेले काम दर्जाहीन असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

> प्रभाग क्रमांक २०, संत तुकाराम नगर भागात चांगल्या स्थितीत असलेल्या पेव्हिंग ब्लॉक उखडून त्याच ठिकाणी नव्याने ब्लॉक बसविण्याचे काम एका ठेकेदाराला देण्यात आले. हे काम कोणत्याही आवश्यकतेशिवाय करण्यात आले आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर शासकीय निधीचा गैरवापर झाला आहे. चांगल्या स्थितीत असलेल्या ब्लॉकचे पुनर्वसन करणे ही एकमेव उद्दिष्टे असल्याचे दिसून येते आहे. याबाबत महापालिका प्रशासनाला पत्र दिले आहे.
>
> **— ॲड. प्रज्वल दुबे,** स्थानिक नागरिक

## पवन शिनगारे यांची प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** लोणावळा महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. पवन रामू शिनगारे यांची २६ जानेवारी २०२५ रोजी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या पथसंचालनाकरिता महाराष्ट्र संघनायक म्हणून निवड झाली आहे. डॉ. पवन शिनगारे हे मागील १० वर्षांपासून लोणावळा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाचे युनिट यशस्वीपणे चालवित आहेत. डॉ. शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कु. जयवंत दळवी या विद्यार्थ्याची २६ जानेवारी २०२३ मध्ये कर्तव्य पथावरील संचालानामध्ये निवड झाली होती. यानंतर आता डॉ. शिनगारे यांची संघनायक म्हणून निवड झाल्यामुळे लोणावळा महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. लोणावळा एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्त, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर तसेच महाविद्यालायचे आजी-माजी विद्यार्थी यांनी डॉ. पवन शिनगारे यांना कर्तव्य पथावरील संचलानाकरिता शुभेच्छा दिल्या.

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वाढ?

### चार पोलीस ठाणे-पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला जोडण्याचा प्रस्ताव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या अखत्यारित असलेल्या मावळ तालुक्यातील वडगाव, कामशेत, लोणावळा शहर आणि ग्रामीण ही चार पोलीस ठाणी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला जोडण्याचा प्रस्ताव गृह विभागास पाठविण्यात आला आहे. तो मंजूर झाल्यास आयुक्तालयाच्या हद्दीत वाढ होणार आहे. पुणे शहर व पुणे ग्रामीण दलाची विभागणी करून १५ ऑगस्ट २०१८ रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यान्वित झाले. त्या वेळी आयुक्तालयाच्या हद्दीत १४ पोलीस ठाणी होती. त्यानंतर चिखली पोलीस ठाणे कार्यान्वित झाले. रावेत, शिरगाव आणि म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे मंजूर झाले. त्यामुळे १८ पोलीस ठाणी होती. दोन महिन्यांपूर्वी वाकड, हिंजवडी, पिंपरी आणि भोसरी या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून नव्याने अनुक्रमे काळेवाडी, बावधन, संत तुकारामनगर आणि दापोडी पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात आली आहे. आयुक्तालयांतर्गत आता २२ पोलीस ठाणी आहेत. आयुक्तालयाचे एकूण क्षेत्रफळ ११५ चौरस किमी इतके असून, अंदाजे ४० लाख इतकी लोकसंख्या येते. आळंदी-मरकळ, तळवडे, भोसरी, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्रे आयुक्तालयाच्या अखत्यारित येतात. मावळ तालुका हा निसर्गरम्य आणि वेगाने विकसित होणारा भाग म्हणून ओळखला जातो. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या लोणावळा, कामशेत यांसारख्या ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. वडगाव आणि तळेगाव दाभाडे परिसरातील औद्योगिक विकासामुळे या भागाचा शहरीकरणाकडे झपाट्याने प्रवास सुरू आहे. मात्र, सद्य:स्थितीत कायदा-सुव्यवस्थेसाठी आवश्यक त्या सुविधा कमी पडत असल्याचे दिसते.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हे आधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, वेगवान आणि प्रभावी पोलीस सेवा देण्यात पुढारलेले मानले जाते.

> **मावळ तालुक्यातील वडगाव, कामशेत आणि लोणावळा हा परिसर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाला पाठविण्यात आला आहे. शहर पोलीस दलात अतिरिक्त मनुष्यबळ, अधिकारी-कर्मचारी, आवश्यक साधनसामग्री उपलब्ध असल्याने हा परिसर जोडल्यानंतर येथील नागरिकांना तातडीने पोलीस मदत मिळण्यास फायदा होईल.**
>
> **-विनयकुमार चौबे,** पोलीस आयुक्त

# पोलीस असल्याचे भासवून १५ लाखांची फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** टेलिकॉम डिपार्टमेंट मधील प्रतिनिधी आणि पोलीस असल्याचे भासवून एका महिलेच्या नावाने मनी लॉन्डरिंग झाल्याचे सांगत महिलेची १५ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना २ डिसेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत वाकड येथे घडली.

याप्रकरणी ३४ वर्षीय महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार 87072656855 क्रमांक धारक आणि पोलीस उपनिरीक्षक हेमराज कोळी नाव सांगणाऱ्या व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनोळखी व्यक्तीने फिर्यादी महिलेला फोन करून ती टेलिकॉम डिपार्टमेंट ऑफ इंडिया मधून बोलत असल्याचे खोटे सांगितले. फिर्यादी यांच्या नावाने सिमकार्ड खरेदी करून १५ ते २० लोकांना बेकायदेशीर मेसेज पाठवण्यात आले आहेत. तसेच त्या सिमकार्डचा वापर मनी लॉन्डरिंग साठी केला आहे. त्याबाबत टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई आणि अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे सांगितले.

पोलीस उपनिरीक्षक हेमराज कोळी असे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने फिर्यादी यांच्या खात्यावरून २५ कोटींचे व्यवहार झाले असल्याचे खोटे सांगितले. फिर्यादीकडून १५ लाख २५ हजार रुपये पाठवण्यास सांगून त्यांची फसवणूक केली.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त इंदलकरांनी पुष्पहार अर्पण करून केले अभिवादन!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** स्त्रीमुक्तीसाठी अभूतपूर्व लढा देऊन सावित्रीबाई फुले यांनी सक्षमीकरण, स्वावलंबन आणि स्वाभिमानाची ज्योत महिलांमध्ये प्रज्वलित केली, त्यातून प्रेरणा घेऊन कर्तबगार महिला देश विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहेत. हे सावित्रीबाई फुले यांच्या समर्पित लढ्याचे यश आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त शुभेच्छा देताना ते बोलत होते.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महिला शिक्षण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिकेतील कार्यक्रमास उपआयुक्त अण्णा बोदडे, माजी नगरसेवक मारुती भापकर, महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. वर्षा दांडगे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी उज्वला गोडसे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल पुराणिक, उपअभियंता कविता माने, कार्यालय अधीक्षक मीनाक्षी गरुड, उपलेखापाल गीता धंगेकर, दीप्ती हांडे, वैशाली कलापुरे , दिपाली कर्णे, माया वाकडे, विजया कांबळे, संतोषी चोरगे, वनिता फुले, सुरेखा साळुंखे, सुरेखा सूर्यवंशी, कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष मनोज माछरे , बालाजी अय्यंगार, नितीन समगीर, यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मोशी येथील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, उपआयुक्त राजेश आगळे, मोशी येथील महापालिका शाळेच्या मुख्याद्यापिका सुरेखा दांडगे, पोर्णिमा देवरे, उज्वला मरळे, सामाजिक कार्यकर्ते मनीषा आल्हाट, सायली शिंदे, पल्लवी सुरवसे आदी उपस्थित होत्या. सावित्रीबाई फुले स्मारक येथील सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी पुष्पहार अर्पण करून प्रबोधन पर्वाचे उद्घाटन केले. यावेळी माजी नगरसेवक संतोष लोंढे, अभिमन्यू दहितुले, मारुती भापकर, माजी नगरसदस्या अनुराधा गोरखे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, संभाजी गायकवाड, आनंदा कुदळे, विशाल जाधव, हिरामण भुजबळ, प्रल्हाद कांबळे, रामभाऊ दराडे, हनुमंत लोंढे, दत्ता लोंढे, प्रदीप पवार, विलास गावाडे, तुकाराम गायकवाड, वंदना जाधव आदी उपस्थित होते.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)**
**अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**
**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.९४/२०२४. ४०७७

**अर्जदार**
नियो.प्रभा अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.८५/२ब/४/५ (पैकी) व स.नं. ८५/२/४/६, गांव- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०६१.
तर्फ
मुख्य प्रवर्तक, श्री. अनिकेत दिलीप बांगर.
**विरुद्ध**
**जाब देणार**
१. मे. दितेश कन्स्ट्रक्शन, भागीदारी संस्था तर्फे भागीदार, श्री. दिपक किसन जवळकर,
पत्ता:-जवळकरनगर,पिंपळे गुरव, पुणे- ४११ ०२७.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. प्रभा अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. ८५/२/४/५ (पैकी) व स.नं. ८५/२/४/६, गांव- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०६१ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. ९४/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. जाब देणार क्र. गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १४/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: १८/१२/२०२४.
शिक्का
**संजय राऊत**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे.**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)**
**अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**
**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.९९/२०२४.१४००८

**अर्जदार**
नियो. दुर्गा सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:- स.नं.६६२,हिस्सा नं. १ + २ (पार्ट), सिटीएस नं. ८२५,
श्री महालक्ष्मी नगर, बिबवेवाडी, ता.हवेली, जि.पुणे- ४११ ०३७.
तर्फ
मुख्य प्रवर्तक, श्री. योगेश्वर लक्ष्मण टकले.
**विरुद्ध**
**जाब देणार**
१. मे. महालक्ष्मी एंटरप्रायझेस, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफीस पत्ता:-कमल मनोहर, डेक्कन जिमखाना,प्लॉट नं.७५९/३८,पुणे- ०४.
तर्फे अधिकृत मुखत्यार,
श्री. जितेंद्र राजाराम सावंत,
रा.११८९/१७,कर्वेनगर, पुणे- ४११ ०५७.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. दुर्गा सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. ६६२, हिस्सा नं. १ + २ (पार्ट), सिटीएस नं. ८२५, श्री महालक्ष्मी नगर, बिबवेवाडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०३७ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. ९९/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १७/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड.समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १६/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: १८/१२/२०२४.
शिक्का
**संजय राऊत**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे.**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)**
**अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**
**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.१०८/२०२४. ४००६

**अर्जदार**
नियो.महालक्ष्मी विहार सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.१७/१/१०अ १,उंड्री, ता. हवेली, जि.पुणे- ४११ ०६०.
तर्फ
मुख्य प्रवर्तक, सौ. दर्शना रोहन भन्साळी.
**विरुद्ध**
**जाब देणार**
मे.महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार,
अ. श्री. सचिन सुभाष घुले.
ब. श्री. नितीन सुभाष घुले.
अ व ब पत्ता:-उंड्री,ता.हवेली, जि. पुणे- ४११ ०६०.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. महालक्ष्मी विहार सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:-स.नं.१७/१/१०अ १,उंड्री, ता. हवेली, जि.पुणे- ४११ ०६० या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.१०८/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/१२/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. जाब देणार क्र. १अ व १ब गैरहजर. सबब जाब देणार क्र. १अ व १ब यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १४/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १अ व १ब यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: १८/१२/२०२४.
शिक्का
**संजय राऊत**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे.**


# ...आता डिजिटलच्या युगात पत्र होत चालले दुर्मिळ!

**संदेशवहन अथवा दळणवळणाच्या क्षेत्रात झालेले बदल लक्षणीय आहेत. टेलिफोन, मोबाइल, इंटरनेट, ई-मेल यासारख्या सुविधा उपलब्ध झाल्याने जग झटपट जवळ येत आहे. संदेशवहन जलदगतीने होऊ लागले आहे. परिणामी, भारतीय टपाल सेवेचे पत्र हा प्रकार दुर्मीळ होऊ लागला आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**मावळ :** सध्याचे युग हे गतिमान युग आहे. या गतिमान युगात फोन, मोबाइल यासारख्या संपर्क यंत्रणा मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याने गावोगावी, चौकाचौकांत टांगलेल्या लाल रंगाच्या टपालपेट्या आता शोपीस बनल्या आहेत. प्रत्येकाचे नातेवाईक, परिचित माणसे वेगवेगळ्या गावी राहतात. या नातेवाईकांना निरोप देणे, आमंत्रण देणे यासाठी आता सर्रास मोबाइल फोनचा वापर होतो. फार पूर्वी निरोप पाठविणारा माणूस पायी जात असे. कधी तो घोड्यावरून अथवा उंटावरून जात असे. परंतु इंग्रजांच्या काळात भारतात प्रथम टपाल व्यवस्था सुरू झाली. यामध्ये साध्या ५० पैशाच्या कार्डवर मजकूर लिहून ते पोस्टाच्या पेटीत टाकले जात. २ ते ३ दिवसांनी तो निरोप त्या व्यक्तीला मिळत असे.


शिवकालीन काळात छ. शिवाजी महाराजांनी प्रत्येक कामाच्यासंदर्भात आठ खाती तयार केली होती. त्याला अष्टप्रधान मंडळ असे नाव होते. यामध्ये पत्रव्यवहार सांभाळणे हेही काम एका व्यक्तीला नेमून दिले होते. तो व्यक्ती आलेली पत्रे, आज्ञा, हुकूम इ. जपून ठेवणे किंवा एखाद्या राज्यात पत्र, आज्ञा किंवा आदेश घेऊन जाणे हे काम करीत असे. यासाठी मोठे मनुष्यबळ त्या खात्यात कार्यकरत होते.

इंग्रजांनी व्यापाराच्या निमित्ताने भारतात पाय रोवले. हळूहळू आपला देश ताब्यात घेतला. यावेळी इंग्रजांनी काही गोष्टी त्यांच्या सोयीसाठी सुरु केल्या. त्यात टपाल ही यंत्रणाही होती. टपालची भारतात असलेली गरज लक्षात घेवून त्यांनी टपालसेवा सुरू केली. टपालसेवेने पाठविलेल्या संदेशाला लगेच उत्तर मिळत नव्हते. परंतु संदेशवहनाची यंत्रणा यामुळे उपलब्ध झाली. अगदी गेल्या काही वर्षांपर्यंत भारतात संदेशवहनासाठी टपाल पत्र हाच प्रमुख पर्याय होता.

संपादकीय विशेष

# साहित्यसेवेचा सन्मान

प्रा. डॉ. सुधीर रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षात्मक ग्रंथाला यंदाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला. एका ज्ञानपीठ विजेच्या कवीवर लिहिलेल्या समीक्षणात्मक ग्रंथाला पुरस्कार मिळावा, यासारखा दुसरा चांगला योगायोग नाही. कोकणी साहित्यातील योगदानाबद्दल मुकेश थळी यांनाही पुरस्कार जाहीर झाला. दोघांच्या सन्मानाने मराठी आणि कोकणी भाषेच्या शिरात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. रसाळ यांना आतापर्यंत 28 नामवंत पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीज कॉलेज'चे अर्थात मिलिंद महाविद्यालयाच्या पहिल्या फळीचे ते विद्यार्थी होते. अध्ययनानंतर छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयात तीन वर्षे अधिव्याख्याता पदावर त्यांनी अध्यापनकार्य केले. 1959 मध्ये मराठवाडा विद्यापीठात मराठी विभाग सुरू झाला, तेव्हा पहिल्याच वर्षी सुप्रसिद्ध समीक्षक वा. ल. कुलकर्णी व डॉ. यु. म. पठाण यांच्यासमवेत त्या विभागात रसाळ हे अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले.त्यानंतर निवृत्त होईपर्यंत ऑगस्ट 1994 पर्यंत याच विभागात अधिव्याख्याता- प्रपाठक- प्राध्यापक अशा पदांवर ते 34 वर्षे ते कार्यरत होते.



भारतीय आणि पाश्चात्त्य मतांतरांचा परामर्श घेत, अनेक गुंतागुंतींची उकल करत, कठीण विषय सुगम पद्धतीने समजावून सांगण्याची रसाळ यांची समीक्षाशैली या ग्रंथरूपाने आदर्श म्हणून स्थापित झाली. याशिवाय त्यांचे 'काही मराठी कवी: जाणिवा आणि शैली' (1984) हे काव्यसमीक्षेचे पुस्तक प्रसिद्ध आहे. प्रमुख संपादित ग्रंथांमध्ये 'साहित्य: अध्यापन आणि प्रकार' (वा.ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ, सहकार्याने संपादन, 1987), 'गंगाधर गाडगीळ: निवडक समीक्षा' (1996), 'दासोपंत: गीतार्णव' (मराठवाडा विद्यापीठ) याशिवाय जवळ जवळ दीडशेवर समीक्षालेख विविध वाङ्मयीन नियतकालिकांमधून आणि काही संपादित ग्रंथांमधून प्रसिद्ध आहेत. बहुतेक प्रमुख आणि गाजलेल्या चर्चासत्रांमधून त्यांनी महत्त्वपूर्ण वाङ्मयीन विषयांवर निबंधलेखन केले आहे. विविध ललित साहित्यकृतींच्या समीक्षणांप्रमाणेच मराठी भाषेची सद्यस्थिती, मराठी साहित्याचे अध्यापन, वाचनसंस्कृती, मराठीच्या पीछेहाटीची कारणमीमांसा इत्यादी विषयांवर त्यांनी महाराष्ट्रभरातील विविध व्यासपीठांवरून मौलिक चिंतन मांडले आहे. डॉ. रसाळ यांनी दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. 1956 पासून मराठी वाङ्मयाची समीक्षा करताना साहित्यविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे.

91 वर्षीय सुधीर रसाळ म्हणजे मराठीतील अग्रगण्य समीक्षक. हजारो प्रतिभावान विद्यार्थी घडवणारे मराठी भाषेचे शिक्षक. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून त्यांची प्रदीर्घ कारकीर्द संस्मरणीय आहे. ते अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते. मराठवाडा साहित्य परिषद, विश्वकोश निर्मिती मंडळ, साहित्य अकादमी अशा विविध संस्थांवर त्यांनी काम केले. त्यांचा 'कविता आणि प्रतिमा' हा काव्यविषयक मीमांसा ग्रंथ गाजला. राज्य शासनाचा मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. मराठीमध्ये वाङ्मयाच्या सैध्दांतिक समीक्षेचा अभाव आहे. वाङ्मयविषयक सर्व जटिल प्रश्नांची समर्पक उत्तरे देणाऱ्या आणि वाङ्मयकृतीच्या अस्तित्वाचा आणि तिच्या मूल्यमापनासंबंधीचे योग्य निकष देणाऱ्या भूमिकेचा नव्याने शोध घ्यावा, ही प्रेरणा मराठी समीक्षेत दिसून येत नाही. दीडशे वर्षांच्या मराठी समीक्षेच्या इतिहासात असे दोनच प्रयत्न झाले. बा. सी. मर्ढेकरांनी सर्व ललित कलांच्या आंतररचनेसंबंधीचा आपला लयसिद्धांत मांडला. त्यानंतर लगेचच विंदा करंदीकरांनी सर्व ललित कलांमधून वाङ्मयकला बाजूला काढणारा आणि वाङ्मयकलेचे वेगळे स्वरूप अधोरेखित करणारा जीवनवेधी कलेचा सिद्धांत मांडला.

मराठीत मर्ढेकरांच्या लयसिद्धांताची घेतली गेली तशी दखल करंदीकरांच्या जीवनवेधी कलेच्या सिध्दांताची घेतली गेली नाही. किंबहुना, त्यांच्या वाङ्मयविषयक सैद्धांतिक भूमिकेची उपेक्षाच झाली. खरे म्हणजे करंदीकर यांनी केवळ जीवनवेधी कलेचा सिद्धांत मांडला नाही, तर हा सिद्धांत केंद्रस्थानी ठेवून समग्र काव्यशास्त्रच उभे केले. शिकवण्यासोबत रसाळ सर रमले ते समीक्षा आणि साहित्य संस्थात्मक कामात. मराठवाडा साहित्य परिषद, अखिल भारतीय महामंडळ, साहित्य संमेलनात ते वावरले.

अनंतराव भालेराव, भगवंतराव देशमुख, पाध्ये, नानासाहेब चपळगावकर यांच्यात ते रमले. मराठी साहित्य प्रांतीचा 1960 नंतरच्या पडद्याआडही घडलेल्या घटनांचा बिनचूक संदर्भ म्हणजे सुधीर रसाळ सर. नव्वदीतही ते व्यासंगमग्न आहेत. सकाळी साडेआठ ते साडेबारा, दुपारी दोन ते साडेचार आणि संध्याकाळी साडेसहा ते रात्री साडेआठ ही त्यांची साधारणपणे दररोजची लेखनाची वेळ असते. लेखन म्हणजे टाईप करणे. रसाळ सर संगणकावर लेखन करण्याची कला वयाच्या साठीत शिकले. त्यांची कॉपी एकदम नेटकी. मुद्रणासाठी अंतिम कॉपी कशी बिनचूक असावी, याचा आदर्श म्हणजे रसाळ सरांची कॉपी. लेखनासोबत वाचनही सुरू असतेच. ते अतिशय परखड. आपल्या बोलण्याने, समीक्षेने कुणी दुखावले जाते, म्हणून बोलायचेच नाही, समीक्षा करायचीच नाही का, असे ते थेट विचारतात.

डोंबिवलीतील एकदिवसीय साहित्य संमेलनामध्ये त्यांनी केलेले भाषण असेच लक्षवेधी आणि मर्मभेदी होते. समीक्षा या प्रकाराकडे लक्ष दिले जात नाही. साहित्याच्या झाडावर बांडगूळ उगवते, त्या दृष्टीने लेखक समीक्षकाकडे पाहतात. मराठी साहित्य वाचले जात नसल्याने साहित्याची समीक्षा कोण वाचणार, असा प्रश्न आहे. मराठी साहित्यात समीक्षकांची वानवा आहे. मराठी साहित्याची समीक्षा ही पाश्चात्यांच्या समीक्षेवर अवलंबून राहिली आहे. आपल्या समीक्षकांनी ती परंपरेशी जोडून घेऊन केलेली नाही. मध्ययुगीन समीक्षक नवे लिहिणाऱ्याचे काही वाचत नाहीत. नवे लिहिणारे मध्ययुगीन साहित्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या साहित्याची समीक्षा योग्य प्रकारे झालेली नाही, असे मत व्यक्त करताना आपल्याकडे दीडशे वर्षांच्या कार्यकाळात मराठीतील एकही ग्रंथ अन्य भाषेत भाषांतरीत झालेला नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# कोपनहेगन पहिली 'कार्बन न्यूट्रल' राजधानी

**हवामानबदलावर चर्चा होते, जागतिक परिषदा होतात. जग 2050 पर्यंत कार्बनमुक्त करण्याची भाषा होते. ठराव होतात. परिषद संपली की पुढच्या वर्षापर्यंत यासंदर्भातील धूळ झटकली जात नाही. याला काही शहरे, काही देश अपवाद आहेत. जगाने ठरवून दिलेल्या मुदतीच्या 25 वर्षे अगोदरच कोपनहेगन ही जगातील पहिली 'कार्बन न्यूट्रल' राजधानी बनणार आहे. या शहराने हे कसे साध्य केले?**

डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन ही जगातील पहिली कार्बन न्यूट्रल राजधानी बनणार आहे. इतर राजधान्यांनी 2050 पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट ठेवले आहे, तर कोपनहेगन हे लक्ष्य 2025 पर्यंत साध्य करण्यासाठी गेल्या दीड दशकापासून काम करत आहे. 2009 मध्ये, तेथे नवीन योजना लागू करण्यात आली. तिचा मुख्य उद्देश 2025 पर्यंत जगातील पहिले कार्बनमुक्त राजधानी, महानगर तयार करणे हा आहे. पॉवर प्लांटमध्ये कृत्रिम स्कीइंग स्लोप तयार करण्याची कल्पना कोपनहेगनचे माजी महापौर बो अस्मस केजेलगार्ड यांनी मांडली होती. 1990 च्या दशकात त्यांनी कोपनहेगनला युरोपची पर्यावरणीय राजधानी बनवण्याची कल्पना सुचवली. गुणवत्तेबरोबरच सातत्यपूर्ण विकासाला (सस्टेनेबिलिटी) जिवंतपणा म्हणता येईल, असे ते म्हणतात. हवामानबदल थांबवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून त्यांनी स्वतःची 'ग्रीन इनोव्हेशन' ही कंपनी स्थापन केली. स्कँडेनेव्हियन देशांमधील सर्वात मोठी बांधकाम कंपनी 'एनसीसी'चे व्यवसाय विकास आणि सार्वजनिक व्यवहार संचालक मार्टिन मँथॉर्प म्हणतात की जगातील अनेक देश व्यावसायिक फायद्यासाठी निसर्ग आणि पर्यावरणाची काळजी घेत नाहीत; परंतु डेन्मार्कमध्ये तसे नाही. आज आपण काय करतो आहोत आणि येणाऱ्या पिढीसाठी काय सोडणार आहोत, यावर गंभीर विचार करण्याची डॅनिश लोकांची मानसिकता आहे. डेन्मार्कच्या मोठ्या कंपन्या दीर्घ मुदतीचा विचार करून काम करतात.' जगातील सर्वोत्कृष्ट शहरांमध्ये गणले जाणारे कोपनहेगन शहर झीलँड आणि अमागेर बेटांवर वसले आहे. हे शहर जगभरातील पर्यटकांसाठी स्वर्गापेक्षा कमी नाही.

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी कोपनहेगनमधील प्रत्येकजण दैनंदिन कामासाठी चालणे, सायकल किंवा सार्वजनिक वाहतूक निवडतो. फार कमी लोक रस्त्यावर गाड्या घेऊन दिसतात. एवढेच नाही, तर 2005 पासून शहराचे कार्बन उत्सर्जन 42 टक्के कमी झाले आहे. हवामानबदलाचा वेग रोखण्यासाठी कोपनहेगन वेगाने पुढे जात आहे. हे जगातील इतर लोकांसाठी एक चांगले उदाहरण आहे. शहरात 100 नवीन विंड टर्बाइन बसवून विजेचा वापर 20 टक्के कमी करण्यात आला आहे. 60 हजार चौरस मीटर नवीन सौर पॅनेल आणि घरे गरम ठेवण्यासाठी लागणारी ऊर्जा अक्षय ऊर्जेद्वारे साध्य करण्याचे शंभर टक्के उद्दिष्ट साध्य केले आहे. पायी चालून, सायकल किंवा सार्वजनिक वाहतुकीने जास्तीत जास्त ये-जा केली जाते. सध्या हा आकडा 35 टक्क्यांच्या जवळ आहे. बायोगॅस बनवण्यासाठी शहरातून निर्माण होणाऱ्या सेंद्रिय कचऱ्याचा वापर केला जातो. यामुळे स्वच्छता आणि पर्यावरण या दोन्हींचे संरक्षण होते.

कोपनहेगन 'कार्बन न्यूट्रल' शहर म्हणून जागतिक आदर्श निर्माण करत आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, हरित अर्थव्यवस्थेला चालना देणे, ऊर्जा पुरवठ्याचे शाश्वत स्रोतांपर्यंत संक्रमण करणे, इमारतींमध्ये हरित तंत्रज्ञानाचा समावेश करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि वाहतूक आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा मजबूत करणे याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. त्यामुळे हवामानबदलाचा सामना करण्याकामी या शहराचा पूर्ण सहभाग आहे. शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यावर प्रत्येकाचा भर आहे. कोपनहेगनचे 'हीटिंग नेटवर्क' ही जगातील सर्वात मोठी एकात्मिक जिल्हा 'हीटिंग सिस्टम' आहे, जी या शहरातील 98 टक्के इमारतींना गरम करते. ही यंत्रणा चालवण्यासाठी कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायूवरील अवलंबित्व पूर्णपणे नाहीसे करून बायोमास (जैवइंधन) वापरण्यात येत आहे. दुसरीकडे, तेथील इमारतींना थंड करण्यासाठी बंदरातून पाणी घेतले जाते. त्यासाठी पाइपलाइनचे विस्तृत जाळे उभारण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, 100 पवन टर्बाइन, हजारो चौरस मीटर सौर पॅनेल आणि सेंद्रिय कचऱ्याचे बायोगॅसिफिकेशन यासारखे टप्पे हे लक्ष्य साध्य करत आहेत. त्याच वेळी, कोपनहेगनने 2025 पर्यंत शंभर टक्के अक्षय ऊर्जा वापरण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

कोपनहेगनमध्ये पवन आणि भू-औष्णिक ऊर्जेच्या वापरावरही विशेष भर दिला जात आहे. इतकेच नाही, तर तिथला 75 टक्के प्रवास पायी किंवा सार्वजनिक वाहतुकीने केला जातो. 2025 पर्यंत शहरातील बहुतांश कार वीज, हायड्रोजन किंवा जैवइंधनावर चालतील. हे शहर सायकलने प्रवास करण्यासाठी पूरक बनवण्यात आले आहे. यामुळे बहुतेक लोक सायकलप्रवासाला प्राधान्य देतात. शहराची हवामान योजना हरित शिक्षण आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देत आहे. पर्यावरणपूरक कामासाठी कर्मचारी आणि कामगारांनाही प्रशिक्षण दिले जात आहे. बालवाडी आणि रुग्णालये यासारख्या सार्वजनिक ठिकाणी कमी मांस देण्यासारखी धोरणे लागू करण्यात आली आहेत. त्याचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होत आहे. या सर्वसमावेशक प्रयत्नांद्वारे कोपनहेगन केवळ हरित आणि 'स्मार्ट शहर' बनण्याच्या दिशेने वाटचाल करत नाही, तर शाश्वत विकासासाठी जागतिक प्रेरणा बनत आहे. 'कोपनहेगन मॉडेल' स्पष्ट करते की, शहरीकरण आणि शाश्वत विकास परस्परविरोधी नाहीत, तर योग्य दृष्टीकोन आणि नियोजित प्रयत्नांद्वारे एकमेकांना पूरक ठरू शकतात. 2025 पर्यंत निव्वळ शून्य कार्बन शहर आणि जगातील पहिले 'कार्बन न्यूट्रल' शहर बनण्याची या डॅनिश राजधानीची महत्वाकांक्षा आहे. हे शहर शांतता, जीवनशैलीचा दर्जा, प्रादेशिक संघटना, हिरव्यागार जागा, सायकल लेन आदींसाठी ओळखले जाते. जुन्या आणि आधुनिक जीवनशैलीचा मेळ घालणारी वास्तुकला आणि एक 'स्मार्ट सिटी' म्हणून स्थान देणारा तांत्रिक विकास यामुळे कोपनहेगन जगातील सर्वोत्तम शहरांपैकी एक मानले जाते.

रा
मिलिंद बेंडाळे
पर्यावरण अभ्यासक

आर्थिक स्थैर्य देणारे, चांगल्या पायाभूत सुविधा देणारे शहर म्हणून कोपनहेगनची ओळख आहे. डेन्मार्कची लोकसंख्या 13 लाख असून सतत वाढत आहे. त्यात जीवनाचा दर्जा आणि आर्थिक वाढ राखण्यासाठी मोठे बदल आवश्यक आहेत. कोपनहेगन नगरपालिका 2009 पासून कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हे शहर सतत ऊर्जा वापरावर लक्ष केंद्रित करत आहे. उर्जेच्या वापरात कपातीसह हरित ऊर्जेचे उत्पादन वाढवण्यावर या शहराचा भर आहे. म्हणजे येथे नूतनीकरणयोग्य स्रोतांपासून स्वच्छ ऊर्जेची निर्मिती केली जात आहे. 2025 पर्यंत वीज आणि उष्णता उत्पादन पवन आणि भू-औष्णिक उर्जेवर आधारित असेल. वीज आणि उष्णतेसाठी गुंतवणुकीचा काही भाग ऊर्जा कंपन्यांकडून उचलला जाईल आणि कोपनहेगन नगरपालिका कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य प्रदान करेल. उदाहरणार्थ, पवन टर्बाइन किंवा भू-औष्णिक ऊर्जा संयंत्रांच्या बांधकामासाठी ही मदत असेल. वाहतुकीच्या बाबतीत शहराने हिरवी गतिशीलता अंगीकारली आहे. हे शहर लोकांना सायकलवरून फिरण्यासाठी उत्तम प्रकारे डिझाइन केले आहे. कारण त्याचे सायकल मार्ग लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जास्तीत जास्त 20 मिनिटांमध्ये पोहोचवू शकतात. सार्वजनिक वाहतूक हुशारीने कार्य करते. तिथे डिजिटल चिन्हांद्वारे लोकांना ते वापरू इच्छीत असलेल्या वाहतुकीबद्दल त्वरीत माहिती मिळते.

इथे इलेक्ट्रिक बस आहेत, सबवे स्वयंचलित आहेत आणि ड्रायव्हरशिवाय चालतात. येथे 'एस ट्रेन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रवासी गाड्या इलेक्ट्रिक आहेत आणि प्रत्येकाला विनामूल्य सायकल चालवण्याची सुविधा देतात. शहर आणि आसपासच्या कोणत्याही ठिकाणी सार्वजनिक वाहतूक सहज आणि जलद पोहोचवते. येथिल लोक मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक कार वापरत असून नगरपालिका याला प्रोत्साहन देते. 2025 पर्यंत शहरातील बहुतांश कार वीज, हायड्रोजन किंवा जैवइंधनावर चालतील अशी अपेक्षा आहे. 2025 पर्यंत शहरातील 75 टक्के प्रवास सायकल, पायी किंवा सार्वजनिक वाहतुकीने केला जाईल. सध्या या शहराच्या विविध भागांमध्ये दिवसाच्या ठराविक वेळेत सायकलींची संख्या खूप जास्त असल्याचे दिसून येते. कोपनहेगन नगरपालिका कंपन्या, पथदिवे, इमारत बांधकाम आणि कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांचे नियमन करण्यासाठीही मोठी बांधिलकी मानून काम करत आहे. कोपनहेगन नगरपालिका स्वतःला 'हवामान कंपनी' म्हणवते. या वचनबद्धतेमध्ये केवळ गुंतवणूक, समर्थन आणि वचनबद्धता नाही, तर पर्यावरणशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि पर्यावरणपूरक कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी कर्मचारी आणि कामगारांना प्रशिक्षण दिले जाते. या योजनेत असलेली मोठी गुंतवणूक स्वच्छ, शाश्वत, बुद्धिमान शहरामध्ये दिसून येईल. त्यात जीवनाचा दर्जा सतत वाढत जाईल. शहराच्या विविध भागांमध्ये मोठे हिरवे क्षेत्र पसरले आहे. ते मनोरंजन, विश्रांती आणि निसर्गाशी जोडण्यासाठी वापरले जाते.




## राशीभविष्य

- **मेष** : खेळाडू, कलाकारांना उत्तम संधी लाभतील. नोकरीत अडचणी येतील. थोरांचा सहवास लाभेल.
- **वृषभ** : स्मृतींना उजाळा मिळेल. संसारात जोडीदाराचं मनाजोगं सहकार्य राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : आजचा दिवस अत्यंत व्यस्त राहील. किंमती वस्तुंची काळजी घ्यावी. प्रेम प्रकरणात यश लाभेल.
- **कर्क** : धनलाभाचे योग आहेत. कामाचा व्याप वाढता राहील. गैरसमज दूर झाल्यानं ताण–तणाव दूर होईल.
- **सिंह** : मौजमजेवर खर्च करू शकाल. कार्यक्षेत्रात उत्तम फलप्राप्ती होईल. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **कन्या** : सुसंवाद साधता येईल. आजची कामं आजच पूर्ण करा. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **तूळ** : कार्यक्षेत्रात कामाचा ताण वाढेल. अनपेक्षितपणे पाहुण्यांच्या भेटी होतील. आर्थिक समस्या सुटतील.
- **वृश्चिक** : मुलाखतीत चांगलं यश मिळेल. हितचिंतकांच्या सल्ल्याकडे लक्ष द्या. वैवाहिक सौख्य प्राप्त होईल.
- **धनु** : आनंदी क्षणांची अनुभूती मिळेल. कामावर वरिष्ठ खूष होतील. नवे करार विचारपूर्वक व्हायला हवे.
- **मकर** : वरिष्ठांकडून कामाचं कौतुक होईल. स्वत:साठी वेळ काढून आत्मचिंतन करा. सुखद वार्ता समजेल.
- **कुंभ** : गुंतवणूक लाभदायक ठरेल. वैयक्तिक मार्गदर्शनातून प्रगती साधता येईल. निष्काळजीपणा टाळावा.ह्न
- **मीन** : मानसिक ताण–तणाव वाढेल. रिकाच्या वेळेचा सदुपयोग करावा. जोडीदाराचं सहकार्य लाभेल.

सल्ला मोलाचा

## डाएट इन बजेट

वजन अगदी सहजतेनं वाढत जातं पण हे वाढतं वजन कमी करण्यासाठी पर्सवर बराच भार पडतो. त्यापेक्षा वजन कमी न केलेलंच बरं असं वाटतं. पण, असा विचार करू नका. आरोग्य सर्वात महत्त्वाचं. पण बजेटचाही विचार करायला हवा. ✻ घरचं अन्न खा. घरी खाल्यामुळे तुमचे पैसे वाचतील. बाहेरून हेल्दी फूड मागवलं तर जास्त पैसे द्यावे लागतील. त्यामुळे घरातलेच पदार्थ वापरून छान हेल्दी रेसिपी बनवा आणि मस्तपैकी खा. ✻ आजकाल बाजारात फ्रोजन भाज्या मिळतात. फ्रोजन मटार तुम्हाला माहीत असतील. तशाच मिक्स व्हेज भाज्याही मिळतात. या भाज्या बरेच दिवस टिकतात. ताज्या भाज्यांपेक्षा त्या स्वस्तही पडतात. त्यामुळे बजेटींगसाठी तुम्ही हा पर्याय निवडू शकता. ✻ पाणी मुबकल प्रमाणात पिण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे भरपूर पाणी प्या. पाणी पिताना कंजूसपणा नको. ✻ चालणे, धावणे यासारख्या व्यायामांसाठी कोणताही खर्च येत नाही. तुम्ही घरच्या घरी सीडी लावून एरोबिक्स करू शकता. बागेतही हास्यक्लब किंवा मोफत व्यायामप्रकार घेतले जातात, त्याची माहिती मिळवा.

## ४ जानेवारी

दिनविशेष

१८०९ : अंधांसाठीच्या ब्रेललिपीचा संशोधक लुई ब्रेल यांचा जन्म.
१९१४ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या इंदिरा संत यांचा जन्म.
१९२५ : हिंदी आणि बंगाली अभिनेते प्रदीप कुमार यांचा जन्म.
१९४८ : ब्रिटिशांच्या ताब्यातून ब्रह्मदेश मुक्त.
१९९४ : हिंदी चित्रपट संगीतकार राहूल देवबर्मन यांचं निधन.
२०१० : जगातील सर्वात उंच इमारतींपैकी एक असणाऱ्या दुबईतील बुर्ज खलिफाचं उद्घाटन.

महत्त्वपूर्ण काही...

## पोलादाची निर्मिती

एखाद्या देशात दरवर्षी किती पोलाद निर्माण होतं यावर त्या देशाची औद्योगिक प्रगती मोजली जाते असं म्हणतात. त्यादृष्टीने भारतात पोलाद उत्पादनाच्या दृष्टीने जमशेदपूर आणि भिलाई या दोन शहरांचा आवर्जून उल्लेख केला जातो. अर्थात, पोलाद बनवण्याचं काम अत्यंत जोखमीचं असतं. प्रथम खनिज लोहापासून लोहरस बनवण्याचं काम प्रचंड आकाराच्या उंच भट्ट्यांमध्ये पार पाडलं जातं. विशिष्ट पध्दतीनं बांधलेल्या या भट्ट्यांमध्ये खनिज लोह वितळवून शुध्द लोखंडाच्या रसाचा थर वेगळा बाहेर काढला जातो. यानंतर खजिन, लोह, कोक, चुनखडी यांचं बारीक केलेलं मिश्रण तप्त वायुंच्या झोताने भट्टीत तापवून त्यापासून लोखंड तयार केलं जातं. अर्थात, याला काठिण्य नसतं. हा तप्त रसच अनेकदा पोलाद बनवण्यासाठी वापरला जातो. दुसऱ्या भट्टीत शुध्द लोखंडाचा रस घेऊन त्यात चुनकळी मिसळली जाते. त्यानंतर लगेच या भट्टीत शुध्द प्राणवायू सोडला जातो. यावेळी त्यात सर्व प्रकारच्या अशुध्द कणांचं ज्वलन होऊन कार्बन आणि लोखंडाचं मिश्रण असलेलं कणखर पोलाद द्रवरूपात शिल्लक राहतं.

आरोग्यमंत्र

## लाभ ब्लॅक कॉफीचे

आपल्याकडे आवडीनं चहा पिणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यात चहाचे काही दुष्परिणाम लक्षात घेऊन कॉफीचा पर्याय सुचवला जातो. चहाऐवजी कॉफी पिणं केव्हाही चांगलं असा सल्ला दिला जातो. अर्थात, कॉफी हेसुध्दा अनेकांचं आवडतं पेय आहे. उत्साहवर्धनासाठी अनेकांना कॉफीचा वाफाळता कप लागतो. मात्र त्यातही ब्लॅक कॉफीचं सेवन आरोग्यास लाभकारक असल्याचं तज्ज्ञ सांगतात. साखर न घातलेली ब्लॅक कॉफी दिवसातून दोन वेळा घेण्याचे अनेक लाभ आहे. पहिली बाब म्हणजे कॉफीत पोटॅशियम आणि कॅल्शियमची प्रमाणशीर मात्रा असते. त्यामुळेच या कॉफीच्या सेवनानं शरीराला या महत्त्वपूर्ण घटकांचा पुरवठा होतो. ब्लॅक कॉफीच्या नियमीत सेवनानं शरीराचं बिघडलेलं स्नायुतंत्र सुस्थितीत येण्यास मदत होते. या कॉफीच्या सेवनानं मनातील निराशादायी, आत्महत्येस प्रवृत्त करणारे विचार दूर होतात आणि चांगल्या परिणामांकडे मनाची धाव वाढते. म्हणजेच सकारात्मक विचारांचं प्राबल्य वाढण्यासाठी ब्लॅक कॉफीच्या सेवनाला प्राधान्य द्यायला हवं. ब्लॅक कॉफीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते आणि ऊर्जा मिळते. म्हणूनच वर्कआऊटनंतर एक कप ब्लॅक कॉफी घेणं लाभकारक ठरतं. कॉफीतील कॅफिन नामक तत्त्वाचा शरीराला काही प्रमाणात फायदा होतो.



## पंचांग

**शनिवार, ४ जानेवारी २०२४**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. ५, नक्षत्र : शततारका
चंद्रराशी : कुंभ, सिद्धी योग
सूर्योदय : ७.१२, सूर्यास्त : ६.१४

## फॉरवर्डस

मैत्रीच्या नात्याचं महत्त्व कवीनं समर्पकपणे मांडलं आहे.

**दोस्ती वो नहीं जो जान देती है, ... सच्ची दोस्ती वो है जो पानी में गिरा हुआ आंसू भी पहचान लेती है...**


## वाचा तर खरं

सौंदर्यसाधनेत नखांची रंगरंगोटी विशेष महत्त्वाची असते. नेलपेंट लावून, नेलआर्ट करुन तुम्ही नखं रंगवू शकता. मात्र निकृष्ट दर्जाच्या नेलपॉलिशमुळे नखांचं अपरिमित नुकसान होतं. एका संशोधनानुसार नेलपेंटमधील जेल सूर्यप्रकाशातील अतीनील किरणं शोषून घेतं ज्यामुळे त्वचेच्या कर्करोगाची शक्यता बळावते. नेलपॉलिशच्या स्मूथ फिनिशिंगसाठी टालूईन नामक रसायनाचा वापर केला जातो. कारमध्ये इंधनाबरोबर मिसळल्या जाणाऱ्या गॅसोलिनमध्ये याच रसायनाचा वापर होतो. नखांसाठी ते अत्यंत धोकादायक ठरु शकतं. म्हणूनच नेलपेंट वापरताना दर्जेदार असल्याची खात्री करावी.

समुपदेशन

## स्वयंरोजगाराची वाट

दोस्तांनो, आजकाल चांगलं शिक्षण घेऊनही तुटपुंज्या पगाराची नोकरी स्वीकारावी लागते, असं अनेकांबाबत घडतं. म्हणून तरुणाईने स्वयंरोजगाराकडे वळायला हवं. स्वत:चा व्यवसाय सुरू करायला हवा. न घाबरता पुढे जायला हवं. आज अनेक उद्योग चांगलं उत्पन्न मिळवून देऊ शकतात. उत्पन्नाच्या अशा काही पर्यायांविषयी...



तुमच्या अंगी पाककला असेल, एखादा पदार्थ बनवता येत असेल किंवा व्यवस्थापन कौशल्य असेल तर स्वत:चा कॅफे किंवा छोटेखानी रेस्टॉरंट सुरू करता येईल. चांगले खाद्यपदार्थ मिळणाऱ्या रेस्टॉरंटमध्ये खवय्यांची गर्दी झाल्याचं चित्र नेहमीच पहायला मिळतं. शहर मोठं असो किंवा छोटं, खाण्याचे दर्दी सगळीकडे असतात. त्यामुळे तुम्ही कॅफे सुरू करू शकता. यासाठी लागणारी जागा भाड्याने घेता येईल. न्याहरीचे काही पदार्थ आणि चहा एवढे पदार्थ ठेवले तरी चांगलं उत्पन्न मिळवू शकता. विविध फूड जॉईंट्स फ्रँचायझी देतात. ती घेऊन उद्योगाचा पाया रचू शकता. आईस्क्रीम पार्लर हा सुद्धा चांगला पर्याय आहे. आईस्क्रीम खाणाऱ्यांची कमतरता नाही. त्यामुळे तुमचा व्यवसाय अगदी चांगला चालेल. सध्या विविध कंपन्या वैविध्यपूर्ण आईस्क्रीम्स तयार करतात. या कंपन्यांची फ्रँचायझी घेता येईल. या क्षेत्राचा अनुभव मिळाला की पुढे मोठी भरारी घेता येईल. मात्र यासाठी न घाबरता पाऊल पुढे टाकायला हवं.

खेचाखेची

## सुख

बरेच प्रयत्न करून रामरावांचं लग्न ठरत नव्हतं. अखेर वैतागून ते एक दिवस एका ज्योतिषाकडे गेले आणि म्हणाले, 'महाराज, बरेच प्रयत्न करूनही माझं लग्नचं ठरत नाहीये. काही उपाय सांगाल का?'

**ज्योतिषी** : अहो, कसं ठरेल? पत्रिकेत फक्त सुख आणि सुखचं लिहिलेलं आहे ना!

वेगळे काही

बंगळुरूमध्ये राहणारे रमेश बाबू आपल्या तीन कोटीच्या रोल्स रॉईसमध्ये बसतात आणि केशकर्तनालयात जातात. तिथे प्रवेश केल्यावर अंगावर ॲप्रन चढवतात आणि ग्राहकांचे केस कापायला सुरुवात करतात. पित्याच्या निधनानंतर सलूनची जबाबदारी रमेशबाबूकडे आली. दिवसाकाठी मिळणाऱ्या तुटपुंज्या रकमेवर कशीबशी गुजराण होऊ लागली. पण एक न एक दिवस स्वत:ची गाडी घेण्याचं स्वप्न पाहणाऱ्या रमेशनं सेकंड हँड मारुती घेऊन ती भाड्यानं देण्याचा व्यवसाय सुरु केला. या व्यवसायात चांगला फायदा होऊ लागला. कालांतरानं त्यांच्याकडे मर्सिडीज, बीएमडब्ल्यूसारख्या आलिशान गाड्या आल्या. सध्या त्यांच्याकडे दोनशे गाड्यांचा ताफा आहे.

जाणून घ्या

## वेळेच्या बचतीसाठी...

सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जमान्यात विविध ॲप्सचे लाभ विचारात घेण्याजोगे आहेत. त्याद्वारे अगदी फाईल ट्रान्सफर करण्यापासून डाटा बॅकअप घेण्यापर्यंतची कामं एका क्लिकवर होऊ शकतात. अशा काही ॲप्समुळे तुमची बरीच कामं अगदी झटपट होतील. वेळेची बचत करणाऱ्या या ॲप्सविषयी...



✻ 'इन्स्ट लाईफ' या मोबाईल गेममध्ये शूटिंग किंवा रेसिंगसारखं काही नाही. आयुष्यातल्या कोणत्याही टप्प्यावरील अडचण सोडवण्यासाठी याची मदत होईल.

✻ 'स्नॅपसीड' हे फोटोग्राफी ॲप डाउनलोड केल्यावर फोनमधला कोणताही फोटो एडिट करू शकता. सोशल मीडियावर शेअर करण्यासाठी इमेजचा आकार कमी करता येतो. यात इतर बदल करण्याची सोयही आहे.

✻ ई मेलच्या इनबॉक्समध्ये बरेच प्रमोशनल आणि स्पॅम मेल येऊन पडतात. या मेल्सच्या गर्दीत महत्त्वाचे मेल्स सापडत नाहीत. अशा वेळी 'टेम्प मेल' हे ॲप इनबॉक्समधले नको असणारे मेल्स डिलिट करतं. टेम्प मेल्समुळे इनबॉक्स कायम क्लीन राहील. इतकंच नाही तर हे ॲप फिशिंग ई मेल्स तसंच स्पॅमर्सपासून तुमच्या ई मेलला सुरक्षित ठेवतं.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## महापालिका शाळांतील विद्यार्थी करणार 'आयआयटी', 'नीट'ची तयारी

**पिंपरी-** महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी आणि वैद्यकीय उच्च शिक्षणाची दारे खुली व्हावीत, हे विद्यार्थी अन्य खासगी शाळांच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे पडू नये, या उद्देशाने नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांची 'आयआयटी' 'जेईई' आणि 'नीट' परीक्षांसाठी तयारी करून घेतली जाणार आहे. महापालिकेच्या 2 केंद्रांवर दर आठवड्याला 2 तास याप्रमाणे विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यात येणार आहे. फेब—वारी महिन्यापासून त्याच्या वर्गांना सुरुवात होईल. त्यासाठी महापालिकेने अवंती फेलोज या स्वयंसेवी संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. शाळा सुटल्यानंतर संबंधित परीक्षांचा मुलभूत अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहे. या परीक्षांसाठी नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांची ऑक्टोंबर 2024 मध्ये एक चाचणी देखील घेण्यात आली. महापालिका शाळांतील नववी आणि दहावीचे विद्यार्थी अकरावी आणि बारावीमध्ये गेल्यानंतर देखील त्यांना संबंधित संस्थेकडून या परीक्षांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

**'आयआयटी', 'जेईई' परीक्षा म्हणजे काय ?**

- 'आयआयटी', 'जेईई' ही राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा आहे. ज्यामध्ये दोन टप्पे असतात. जेईई मेन आणि जेईई अ‍ॅडव्हान्स्ड. जेईई मेन ही अ‍ॅडव्हान्ससाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी एक स्क्रीनिंग परीक्षा आहे. जी प्रतिष्ठित आयआयटीमधील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अंतिम परीक्षा म्हणून काम करते.

# आ. शंकर जगताप 'ॲक्शन मोड'वर

## मतदार संघातील विकासकामांना गती देण्यासाठी घेतली बैठक



चिंचवड अडचणींवर चर्चा: चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आणि मूलभूत सुविधांशी संबंधित अडचणींवर चर्चा करण्यासाठी त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत एक महत्त्वाची बैठक घेतली.

**गाजवले पहिलेच अधिवेशन..**
विधानसभा निवडणूक झाल्यानंतर झालेल्या नागपूर अधिवेशनात निळ्या पूररेषेतील बांधकामांसह मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आवाज उठवत आमदार जगताप यांनी अधिवेशन गाजवले. वाहतूक समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन रस्त्यावर उतरत त्यांनी अधिकाऱ्यांना उपाययोजनांच्या आदेश दिले होते. त्या पाठोपाठ आयुक्तांसमवेत बैठक घेत आमदार जगताप यांनी मतदारसंघातील विकासकामांना गती दिली.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : विधानसभेचे नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर भाजपचे शहराध्यक्ष व चिंचवडचे आमदार शंकर जगताप 'ॲक्शन मोड'वर असल्याचे पाहायला मिळत आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आणि मूलभूत सुविधांशी संबंधित अडचणींवर चर्चा करण्यासाठी त्यांनी आज (गुरुवारी) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला चिंचवड मतदारसंघातील माजी नगरसेवक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ॲक्शन मोड

बैठकीला माजी महापौर माई ढोरे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, भाजपचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके तसेच माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, अश्विनी चिंचवडे, चेतन भुजबळ, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, नीता पाडाळे, ज्योती भारती, अभिषेक बारणे, तानाजी बारणे, संदीप गाडे, सिद्धेश्वर बारणे, आरती चोंधे, निर्मला कुटे, सागर अंघोळकर, वैशाली जवळकर, महेश जगताप, हर्षल ढोरे, संतोष कांबळे, शारदा सोनावणे, शेखर चिंचवडे, राहुल जवळकर, हर्षद नढे, हिरेन सोनावणे, संकेत चोंधे, विलास पाडाळे आणि संकेत कुटे आदी उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या प्रलंबित विकासकामांना गती देऊन नागरिकांना मूलभूत व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.


### बैठकीत चर्चा झालेले मुद्दे..

**कचरा व्यवस्थापन व स्वच्छता :**
- शहरातील कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि रस्त्यांची नियमित स्वच्छता.

**पाणीपुरवठा व विद्युत समस्या :**
- कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि वारंवार येणाऱ्या विद्युत समस्यांवर तातडीने उपाययोजना.

**वाहतूक कोंडी व रस्ते सुधारणा:**
- वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नवीन प्रकल्पांना गती.

**फुटपाथवरील अतिक्रमण :**
- पादचाऱ्यांच्या सोयीसाठी अतिक्रमण हटवून फुटपाथची योग्य देखभाल.



### महत्त्वाचे प्रकल्प व निर्णय..

- **बटरफ्लाय ब्रिज :** रखडलेला प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश.
- **पिंपळे सौदागरचा जुना पूल:** काम तातडीने सुरू करण्याची सूचना.
- **वाकड दत्त मंदिर रस्ता :** प्रलंबित रस्त्याचे काम गतीने पूर्ण करणे.
- **शाफ्ट तंत्रज्ञानाचा वापर :** पाणीपुरवठा सुधारण्यासाठी आयआयटीच्या तंत्रज्ञानाचा तातडीने वापर.
- मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना.
- बेकायदेशीर नळ कनेक्शनवर कारवाई.
- स्थापत्य, ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागासाठी पुरेशी बजेट तरतूद.

# पिंपरी चिंचवड शहरात ३२ लाख झाडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी,** : शहरात लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची माहिती मिळावी यासाठी भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे (जीआयएस टॅगिंग) करून वृक्षांची गणना करण्यात आली आहे. या गणनेत शहरात ३२ लाख १६ हजार ७९९ वृक्ष असल्याचे दिसून आल्याचा दावा महापालिकेने केला आहे. दरम्यान, वृक्षछाटणी, तोड करण्याबाबत नागरिकांना ऑनलाइन परवानगी देण्यासाठी उपयोजन (अ‍ॅप) विकसित केले नसल्याने संबंधित ठेकेदाराला महापालिकेने नोटीस बजावली आहे.

**महापालिकेचा दावा**

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियमानुसार रस्त्याच्या कडेने किती वृक्ष असावेत याबाबत मानक ठरले आहे. २४ मीटर व अधिक रुंदीचे रस्ते असल्यास प्रत्येक दहा मीटर अंतरावर एक वृक्ष आवश्यक आहे. १२ ते २४ मीटर रुंदीचे रस्ते असतील, तर रस्त्याच्या दुतर्फा १० मीटर अंतरावर एक वृक्ष, सहा ते १२ मीटर रुंदीच्या रस्त्यावर प्रत्येक २० मीटर अंतरावर एक वृक्ष असला पाहिजे. हे निकष पिंपरी-चिंचवड महापालिका पूर्ण करणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. सन २००७ मध्ये केलेल्या वृक्षगणनेत शहरात १८ लाख ९३ हजार झाडे आढळली होती. २००७ ते २०१७ पर्यंत शहरातील वृक्षगणनाच करण्यात आली नव्हती.

तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी, सन २०१८ मध्ये भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे वृक्षगणनेचा आदेश दिला होता. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून मुंबईतील मे. टेरॅकॉन इकोटेक प्रा. लि. कंपनीला काम देण्यात आले. हे काम सहा कोटी ७६ लाख ४५ हजार २३८ रुपयांचे होते. संबंधित कंपनीला दोन वर्षांसाठी वृक्षगणना व पाच वर्षे देखभालीची मुदत देण्यात आली. कंपनीकडून वृक्षगणनेचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार शहरात ३२ लाख १६ हजार ७९९ वृक्ष आढळून आले आहेत.

वृक्षछाटणी, तोड करण्याबाबत नागरिकांना ऑनलाइन परवानगी देण्यासाठी उपयोजन (अ‍ॅप) विकसित करण्याचेही काम संबंधित कंपनीला दिले होते. मात्र, या कंपनीने कामाची मुदत संपूनही उपयोजन विकसित केले नाही. त्यामुळे महापालिकेच्या उद्यान विभागाने मे. टेरॅकॉन इकोटेक प्रा. लि. कंपनीचे एक कोटी ६९ लाख ११ हजार ४८६ रुपयांचे देयक दिले नाही. या कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.

### संबंधित कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली

शास्त्रोक्त पद्धतीने वृक्षगणना झालेली नाही. वृक्षांची अंदाजे आकडेवारी काढली आहे. शहरात ३० लाख नाही, तर १५ लाखांच्या आसपास वृक्ष आहेत. लागवड केलेल्या वृक्षांपैकी किती जिवंत आहेत याबाबतची माहिती ठेवली जात नसल्याचा आरोप प्राधिकरण नागरी सुरक्षा समितीचे अध्यक्ष विजय पाटील यांनी केला. शहरातील वृक्षगणना पूर्ण झाली आहे. वृक्ष प्राधिकरण कामकाजाच्या अनुषंगाने उपयोजन विकसित केले नसल्याने संबंधित कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली

**— उमेश ढाकणे (सहायक आयुक्त- उद्यान विभाग)**



पिंपरी उद्घाटन: पिंपरी चिंचवड शहर आदिवासी क्रांतिकारक संयुक्त जयंती उत्सव समितीच्या वतीने बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पुणे महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी लक्ष्मण भालचीम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

# आदिवासी समाजाचे संघटन आवश्यक

## डॉ. संजय दाभाडे : नवीन रोजगार निर्मितीकडे लक्ष द्यावे तरच आदिवासिंचा विकास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : आदिवासी समाजाला संविधानात्मक हक्क प्राप्त करून घेण्यासाठी समाजाचे मजबूत संघटन होणे आवश्यक आहे. तसेच समाजातील तरुण-तरुणींनी पारंपरिक उत्पन्नाचे स्त्रोत, आपली संस्कृती याची जपवणूक करून उच्च शिक्षणाचा मार्ग अवलंबून त्यातून नवीन रोजगार निर्मितीकडे लक्ष द्यावे तरच आदिवासींचा विकास होईल असे प्रतिपादन आदिवासी समाजाचे कायदेशीर लढा लढणारे अभ्यासक डॉ. संजय दाभाडे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहर आदिवासी क्रांतिकारक संयुक्त जयंती उत्सव समितीच्या वतीने बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुणे महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी लक्ष्मण भालचीम यांच्या हस्ते आदिवासी भिमाशंकर तरुण मंडळ व सह्याद्री आदिवासी तरुण मंडळ, मुंजाबा वस्ती, धानोरी यांनी आयोजित केलेल्या शोभायात्रेचे उद्घाटन करण्यात आले.

शोभायात्रेत आदिवासी बांधव पारंपरीक वेषभूषेत आणि बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, तंट्या भिल, राणी दुर्गावती अशा अनेक क्रांतीकारकांच्या वेशभूषा परिधान करून मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. यामध्ये पालघर जिल्ह्यातील तारपा नृत्य पथक आणि जुन्नर तालुक्यातील माणिकडोह, राजूर येथील पथकाने आपल्या शैलीतून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

मुख्य कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्ष विठ्ठल कोथेरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अमोल वाघमारे यांनी सांगितले की, समाजाने एकजुटीने लढा उभारला तर यश नक्कीच मिळते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे जुन्नर, आंबेगाव तालुक्यात हिरडा उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्याला योग्य बाजार भाव मिळण्यासाठी व नुकसान भरपाईसाठी सातत्याने जिद्दीने पाठपुरावा केल्याने अनुदान मंजूर झाले.

पान १ वरून

## द्रुतगती मार्ग सलग आठ पदरी होणार

पुणे ते मुंबईचा प्रवास आणखी गतिमान तसेच अंतर कमी करण्यासाठी 'मिसिंग लिंक' प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने कामकाज सुरू आहे. आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) पुणे मुंबई द्रुतगती महामार्गाचे विस्तारीकरणाचा प्रकल्प घेतला असून, त्यानुसार द्रुतगती मार्ग सहाऐवजी आठ पदरी करण्यात येणार आहे. यासाठीचा प्रस्ताव "एमएसआरडीसी'ने राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठवला असून मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर द्रुतगती मार्गाची क्षमता वाढणार असून, वाहतूक कोंडीचा प्रश्न दूर होणार आहे.

महामार्गावरील खोपोली एक्झिट ते कुसगाव या भागातील 13.3 किलोमीटच्या पर्यायी रस्ता अर्थात मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम गतीने सुरू आहे. याप्रकल्पांतर्गत 1.67 किलोमीटर आणि 8.92 किलोमीटर लांबीचे दोन बोगदे असून या दोन्ही बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. तर, आशिया खंडातील सर्वात मोठा उभारण्यात येणारा दरी पुलाचे कामही वेगाने सुरू आहे.

## आता ग्रामसेवकांना बायोमेट्रिक हजेरी लागू होणार... !

ग्रामसेवकांचा मात्र विरोध आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनचे माजी अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांनी सांगितले, की मुळात ग्रामसेवक हे कार्यालयात बसून काम करण्याचे पद नाही. त्याच्याकडे क्षेत्रीय जबाबदाऱ्या आहेत. त्याला पंचनामे, कर वसुली, तपासणी, विविध बैठकांसाठी कार्यालयाबाहेर जावे लागते. त्यामुळे राज्य शासनाने त्याला दैनंदिनी दिलेली असते.

रोजची कामे तो दैनंदिनीत नोंदवितो व गटविकास अधिकाऱ्याला सादर करतो. क्षेत्रीय जबाबदारी असल्यानेच त्याला दीड हजार रुपये मासिक प्रवासभत्तादेखील मिळतो. त्याच्या कामावर विस्तार अधिकाऱ्याची देखरेख असते. तसेच ग्रामसेवक अनुपस्थित राहिल्यास सरपंच व सदस्यांकडून तत्काळ हरकत घेतली जाते. त्यामुळे अशी बंधने असताना पुन्हा बायोमेट्रिकची सक्ती अनावश्यक ठरते.

## अखेर वाहनधारकांना मिळाला दिलासा !

दाखवल्यानंतरही त्यांच्यावर कारवाई केली जात आहे, अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मात्र, यापुढे डिजिलॉकर आणि एमपरिवहन या मोबाईल अ‍ॅपद्वारे दाखवण्यात आलेले चालक परवाना, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, वाहनाचा विमा, पीयुसी ग्राह्य धरण्यात यावे.' यामुळे आता वाहनधारकांची अडचण दूर झाली आहे.

केंद्र सरकारच्या रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांनी कागदपत्रांची डिजीटल कॉपी डिजिटल लॉकर आणि एम परिवहन या मोबाईल अ‍ॅपद्वारे दाखविण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून दिली. डिजिलॉकर आणि एमपरिवहन अ‍ॅपवर उपलब्ध कागदपत्रांची डिजिटल प्रत वैध मानली जाईल. माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ आणि ५ नुसार चालक परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, विमाअशा कागदपत्रांची प्रत्यक्षप्रद दाखवणे बंधनकारक नाही, असे स्पष्ट सांगितले होते. सर्व राज्यांच्या परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांना यासंदर्भात सूचना देखील देण्यात आल्या. मात्र, तरीही डिजिटल कागदपत्रे दाखवणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात होती. याप्रकरणी वाहनधारकांनी वाहतूक पोलिस आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी वाहनधारकांना दिलासा दिला आहे.

## कॉपीमुक्तसाठी शिक्षण विभाग अलर्ट

पेपर संपेपर्यंत हलचाली टिपण्यात येणार आहेत. त्या हालचालींवर वॉच ठेवण्यासाठी शिक्षण विभागात वॉररूम तयार करण्यात येणार आहे.त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त गर्दी केंद्रावर दिसल्यास, परीक्षा केंद्रात पर्यवेक्षकांनी फेऱ्या न मारता एकाच ठिकाणी उभे राहिल्यास, विद्यार्थ्यांनी बैठकव्यवस्थेत बदल केल्यास, गैरप्रकाराच्या हालचाली झाल्यास तत्काळ शिक्षण विभागात तयार करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाला कळणार आहे.

## पंकजा-धनंजय मुंडेंचा पत्ता कट अजित पवार हे बीडचे पालकमंत्री ?



पवारांमध्ये झालेल्या चर्चेनंतर बीडचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादीकडेच देण्यात येणार असल्याचे समोर आले असून अजित पवार स्वत: बीडचे पालकमंत्री होणार असल्याचे सांगितले जात आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचे म्हटले जात होते. वाल्मीकवर खंडणीचे अनेक गुन्हेही नोंद आहेत. देशमुख हत्या प्रकरणानंतर वाल्मिक जवळपास२२दिवस फरार होता. अखेर त्याने खंडणीच्या गुन्ह्यात त्याने पुण्यात सीआयडी पथकासमोर शरणागती पत्करली. या काळात त्याने धार्मिक पर्यटन केल्याचे बोलले जात आहे.

## मी सुद्धा शीशमहल बांधू शकलो असतो !

केजरीवाल यांना लक्ष्य केले. दुसरीकडे आम आदमी पार्टी सत्तेत येण्यापूर्वी सलग १५ वर्षे दिल्लीत राज्य केलेल्या काँग्रेसबरोबर इंडिया आघाडीत असूनही आम आदमी पार्टीने एकत्र निवडणूक लढण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आम आदमी पक्षाला भाजपाबरोबर काँग्रेसही घेरत असल्याचे पाहायला मिळत आहे.

## वारकऱ्यांच्या विचाराने महाराष्ट्र चालवू !

म्हणून इथे आलो आहे. इंद्रायणी स्वच्छतेचे काम सुरू आहे. हे एक दिवसाच काम नाही. गावांचे, शहरांचे आणि उद्योगांचे पाणी हे नदीत सोडले जात. ते शुद्ध करून इंद्रायणीत सोडायच आहे. ते काम सुरू केले आहे. संबंधित गावांना, ग्रामपंचायत, महानगर पालिकांना निधी उपलब्ध करून देत आहोत. ते युद्ध पातळीवर सुरू करू अस आश्वासन ही देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ७३/२०२४-२५**
**पुणे, दिनांक : १६/१२/२०२४ ६९६**

**अर्जदार**
तुलीप होम्स डी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१,गट नं.९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३, गट नं.९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी, ( शिक्रापुर रोड), चाकण, ता.खेड, जि. पुणे - ४१०५०१
तर्फे, अध्यक्ष : श्री. प्रकाश बाळू पाटील, सचिव : श्री. विक्रम रामहरी घनवट
खजिनदार: श्री. महेंद्र अंबादासजी वसुले
**विरुद्ध**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक / जाब देणार नं. १**
१) तुलीप होम्स (संयुक्तीक करारनामा), तर्फे अधिकृत स्वाक्षरीकार,
अ. मे. यश इंटरप्राईज् भागीदारी संस्था ऑफिस पत्ता- ए/८/२,
जलवायु विहार, सेक्टर नं.6, मोशी प्राधिकरण, ता. हवेली जि.पुणे-४१२१०५. तर्फे भागीदार,
ए. श्री. नरेंद्रभाई नारणभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार, सेक्टर नं. ६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ०५.
ब. श्री. सुरेशभाई मावजीभाई पटेल, पत्ता- १३, रेन्बो अपार्टमेंट, सेक्टर नं.६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे- ०५.
क. श्री. दिलीपकुमार रतीभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार,
सेक्टरनं. ६, मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ०५.
२) जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २,
२. नामदेव निवृत्ती खांडेभराड (मयत तर्फे वारस)
ए. सुंदराबाई नामदेव खांडेभराड, बी. गोटुराम नामदेव खांडेभराड
जाब देणार नं. २ ए व बी रा. मेदनकरवाडी, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.
सी. सौ. सुरेखा बळीराम कड, रा. शिक्रापूर, ता. शिरूर जि. पुणे - ४१२२०८.
डी. सौ. सुनंदा उमेश घोलप, जाब देणार नं. २ डी रा. चाकण, ता. खेड जि. पुणे - ४१०५०४
ई. सौ. चंद्रकला पोपट काळे जाब देणार नं. २ ई रा. चांडवली, ता. खेड जि. पुणे- ०१
( स्वतःकरीता व नं. २ ए ते ई तर्फे विकसनकर्ता व कु. मु. धारक म्हणुन )
अक्शा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी, रजि. ऑफिस- सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३, सुखवाणी इंपेरिअल, फेज-III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी, श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी रा. अशियाना', सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं. ६, सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८
३) अवशा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी, रजि. ऑफिस सर्व्हे नं. १५० ते १५३प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज- 111, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी
श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी रा.' अशियाना', सव्र्हे नं. १५०, प्लॉट नं. ६,
सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८
( जा. देणार नं. २ तर्फे कु. मु.धारक म्हणुन जा. देणार नं. १ ) जाबदेणार
इतर संस्था / इतर इमारत / जाब देणार नं. ३
४) तुलीप होम्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ५) तुलीप होम्स डी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ६) तुलीप होम्स ई विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ७) बी इमारत
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१, गट नं. ९३/१९८/१९९/अ/२
व गट नं. ९३/१९८/१९९/अ/३,गट नं. ९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी, (शिक्रापुर रोड), चाकण, ता.खेड, जि. पुणे - ४१०५०१
जाबदेणार

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ०७ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १३/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे..

शिक्का

**सही/-**
**प्रकाश ल. जगताप**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)**



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ७३/२०२४-२५**
**पुणे, दिनांक : १६/१२/२०२४ ६९७**

**अर्जदार**
तुलीप होम्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१,गट नं.९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३, गट नं.९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी,( शिक्रापुर रोड), चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१. तर्फे, अध्यक्ष : श्री. संदीप प्रभाकर पाटील, सचिव : श्री. आनंद प्रल्हाद मोरे
**विरुद्ध**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**विकसक / जाब देणार नं. १**
१) तुलीप होम्स (संयुक्तीक करारनामा), तर्फे अधिकृत स्वाक्षरीकार,
अ. मे. यश इंटरप्राईज् भागीदारी संस्था
ऑफिस पत्ता- ए/८/२, जलवायु विहार, सेक्टर नं.६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली जि. पुणे- ४१२१०५.
तर्फे भागीदार,
ए. श्री. नरेंद्रभाई नारणभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार, सेक्टर नं. ६,
मोशी प्राधिकरण, ता.हवेली, जि. पुणे - ०५.
ब. श्री. सुरेशभाई मावजीभाई पटेल, पत्ता- १३, रेन्बो अपार्टमेंट, सेक्टर नं. ६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ०५.
क. श्री. दिलीपकुमार रतीभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार, सेक्टरनं. ६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे- ०५.
२) जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २,
२. नामदेव निवृत्ती खांडेभराड (मयत तर्फे वारस)
ए. सुंदराबाई नामदेव खांडेभराड, बी. गोटुराम नामदेव खांडेभराड
जाब देणार नं. २ ए व बी रा. मेदनकरवाडी, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.
सी. सौ. सुरेखा बळीराम कड, रा. शिक्रापूर, ता. शिरूर जि. पुणे - ४१२२०८.
डी. सौ. सुनंदा उमेश घोलप, जाब देणार नं. २ डी रा. चाकण, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१ ई. सौ. चंद्रकला पोपट काळे जाब देणार नं. २ ई रा. चांडवली, ता. खेड जि. पुणे - ०१
(स्वतःकरीता व नं.२ ए ते ई तर्फे विकसनकर्ता व कु. मु. धारक म्हणुन ) अक्शा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा. लि. कंपनी कायदा १९५६अन्वये नोंदणीकृत कंपनी, रजि. ऑफिस- सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३, सुखवाणी इंपेरिअल, फेज-III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८. तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी, श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी, रा. अशियाना', सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं. ६, सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८
३) अक्शा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी, रजि. ऑफिस- सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी
जाबदेणार
रा. अशियाना', सव्र्हे नं. १५०, प्लॉट नं. ६, सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८. ( जा. देणार नं. २ तर्फे कु.मु.धारक म्हणुन जा. देणार नं. १ )
इतर संस्था / इतर इमारत / जाब देणार नं. ३
४) तुलीप होम्स ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ५) तुलीप होम्स डी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ६) तुलीप होम्स ई विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या,
७) बी इमारत
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१,गट नं.९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३,
गट नं.९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी, ( शिक्रापुर रोड),
चाकण, ता.खेड, जि. पुणे - ४१०५०१ जाबदेणार

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ०७ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १३/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

**सही/-**
**प्रकाश ल. जगताप**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)**

## At a Glance



### आसाममध्ये तीन नव्या गाड्यांना झेंडा

**गुवाहाटी :** रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आसामच्या दौऱ्यात शुक्रवारी तीन नव्या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. गुवाहाटी रेल्वे स्थानकावरून गुवाहाटी-न्यू लखीमपूर जनशताब्दी एक्स्प्रेस, न्यू बोंगाईगाव-गुवाहाटी पॅसेंजर ट्रेन आणि तिनसुकिया-नाहरलागुन एक्सप्रेस या गाड्यांना वैष्णव यांनी हिरवा झेंडा दाखवला. राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य आणि मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा देखील यावेळी उपस्थित होते.




### बनावट कागदपत्रां प्रकरणी एकाला अटक

**नवी दिल्ली :** रशियाला जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या चार परदेशी नागरिकांच्या बनावट प्रवास ना हरकत प्रमाणपत्राची (एनओसी) व्यवस्था करणाऱ्या एजंटला दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. आयजीआय विमानतळाच्या पोलिस उपायुक्त उषा रंगनानी यांनी सांगितले की, आरोपी दिनेश शर्मा (४४, रा. उत्तमनगर) याला चार नेपाळी नागरिकांना इमिग्रेशन क्लिअरन्स मिळवून देण्यासाठी बनावट कागदपत्रे पुरविल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

# उत्तराखंडमध्ये समान नागरी कायदा

## भारतातील पहिले राज्य, प्रजासत्ताकदिनी घोषणेची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**डेहराडून :** उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी दिलेल्या महिनाभराच्या मुदतीत राज्यात भारतातील पहिला समान नागरी कायदा लागू करण्यासाठी संपूर्ण सरकारी यंत्रणा कंबर कसली आहे. २०२५ हे उत्तराखंडराज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचे वर्ष म्हणून आम्ही साजरे करत आहोत. हे वर्ष मोठ्या यशाचे असणार आहे. आम्ही यूसीसी आणण्याचे आमचे वचन पाळले आहे. जानेवारीत त्याची अंमलबजावणी करू,' असे धामी यांनी १ जानेवारीला नव्या वर्षाची सुरुवात करताना सांगितले होते. अद्याप तारखा देण्यात आल्या नसल्या तरी प्रजासत्ताक दिनी त्याची अंमलबजावणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

यूसीसीच्या अंमलबजावणीसाठी नियमावली तयार करण्यासाठी माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिंह यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने ऑक्टोबर २०२४ मध्ये आपला अंतिम अहवाल राज्य सरकारला सादर केला होता आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे काम गृह विभागाकडे सोपविण्यात आले आहे. कायद्यातील तरतुदी आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करायची, याची माहिती संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना देण्यासाठी प्रबोधन सत्रे घेण्यात येत आहेत. जिल्हा, तालुका आणि तहसील स्तरावरील कर्मचाऱ्यांना त्याची अंमलबजावणी कशी करायची याचे प्रशिक्षण दिले जात आहे, अशी माहिती दून विद्यापीठाच्या कुलगुरू सुरेखा डांगवाल यांनी दिली.

कायद्यातील तरतुदींची माहिती देण्यासाठी एक पोर्टल तयार करण्यात आले असून लोकांना घरबसल्या विवाह किंवा लिव्ह इन रिलेशनशिपची नोंदणी करता यावी, यासाठी एक ॲपही तयार करण्यात येत आहे. विवाह आणि लिव्ह इन रिलेशनशिपच्या अनिवार्य नोंदणीसाठी लोकांना सरकारी कार्यालयांमध्ये भटकंती करावी लागू नये, यासाठी ही प्रक्रिया सोपी करण्यात आली आहे, असे डांगवाल यांनी सांगितले. यूसीसीने सर्व विवाह आणि लिव्ह इन रिलेशनशिपची नोंदणी बंधनकारक केली आहे. एक सोपी आणि वापरकर्त्यास अनुकूल प्रक्रिया केल्यास कायद्यातील तरतुदींचे उच्च प्रमाणात पालन करणे सुलभ होईल, असे डांगवाल म्हणाले.

यूसीसी अनेक वर्षांपासून राष्ट्रीय पातळीवर भाजपच्या अजेंड्यावर आहे. परंतु गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीपूर्वी उत्तराखंडमधील पक्षाच्या सरकारने त्याची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने पहिले ठोस पाऊल उचलले. धामी यांनी स्थापन केलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने फेब्रुवारी २०२४ मध्ये चार खंडांमध्ये सर्वंकष मसुदा राज्य सरकारला सादर केला. या मसुद्यावर कारवाई करत राज्य सरकारने काही दिवसांनी उत्तराखंड समान नागरी कायदा विधेयक विधानसभेत सादर केले आणि ते ७ फेब्रुवारी रोजी मंजूर करण्यात आले.

समान नागरी कायदा (यूसीसी) कायद्याला ११ मार्च रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाली आणि यूसीसी कायदा असलेले हे स्वतंत्र भारतातील पहिले राज्य ठरले. यूसीसीच्या अंमलबजावणी समितीचे नियम ठरविण्यासाठी माजी मुख्य सचिव सिंग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने नेमलेल्या नऊ सदस्यीय समितीने आपला अंतिम अहवाल सादर केला आणि धामी यांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे की यूसीसी जानेवारीमध्ये लागू होईल.

अनुसूचित जमाती वगळता राज्यातील सर्व नागरिकांसाठी विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि वारसा याविषयी एकसमान आणि समान नियम प्रस्थापित करण्याचा यूसीसीचा प्रयत्न आहे. यात सर्व विवाह आणि लिव्ह इन रिलेशनशिपची नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. आसामसह अनेक भाजपशासित राज्यांनी उत्तराखंडच्या यूसीसीला मॉडेल म्हणून स्वीकारण्याची इच्छा यापूर्वीच व्यक्त केली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतेच संसदेत सांगितले की, भाजपचे सरकार असलेल्या प्रत्येक राज्यात उत्तराखंडप्रमाणे यूसीसी आणली जाईल. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी धामी यांनी युसीसी सुरू करणे हे देखील एक मोठे निवडणूकपूर्व आश्वासन होते, जे भाजपने सलग दुसऱ्यांदा राज्यात सत्तेवर आणले, जे २००० मध्ये स्थापन झाल्यापासून राज्यातील कोणत्याही पक्षाने साध्य केले नाही.

### २ लाख ३० हजार सूचना

● सर्व धर्मांमध्ये स्त्री-पुरुष समानता ही यूसीसीची भावना आहे. त्यामुळेच आचारसंहितेच्या मसुद्यावर लोकांच्या सूचना घेण्यासाठी जनसंवाद साधताना यूसीसी मसुदा समितीला सर्व वर्गातील महिलांचा भरघोस पाठिंबा मिळाला. अशा प्रकारचे सुमारे ७२ संवाद विविध घटकांशी करण्यात आले असून या दरम्यान सुमारे २ लाख ३० हजार सूचना प्राप्त झाल्या आहेत.



पुरुष (२१) आणि स्त्रिया (१८) यांचे समान विवाहयोग्य वय, घटस्फोटाची कारणे आणि सर्व धर्मातील कार्यपद्धती, बहुपत्नीत्व आणि हलाला वर बंदी या तरतुदीमुळे अनेक सामाजिक अनिष्टांना आळा बसेल.
**-अश्विनी उपाध्याय,** सर्वोच्च न्यायालयाचे वकील

# पबजीने घेतले तिघांचे बळी; बिहारमधील हृदयद्रावक घटना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बिहारमधून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. बिहारच्या पश्चिम चंपारण जिल्ह्यातील मानसा टोलाजवळ मोबाईल 'पबजी' गेममध्ये मग्न असताना, ट्रेनच्या धडकेत तीन किशोरांना आपला जीव गमवावा लागला. मुफसिल पोलिस स्टेशनच्या हद्दीतील नरकटियागंज-मुझफ्फरपूर रेल्वे सेक्शनवर हा अपघात झाला.

बिहारच्या पश्चिम चंपारण जिल्ह्यात रेल्वेने चिरडलेले तीन तरुण पबजी हा मोबाईल गेम खेळत होते. गुमटी येथील फुरकान आलम, बारी टोला येथील समीर आलम आणि हबीबुल्ला अन्सारी अशी या युवकांची ओळख पटली असून, ते रेल्वे रुळांवर बसले असताना त्यांना ट्रेनचा आवाज ऐकू आला नाही. या दुर्घटनेच्या ठिकाणी शेकडो लोक जमल्याने स्थानिक रहिवाशांना धक्का बसला होता. त्यानंतर पीडित कुटुंबीयांनी अंत्यसंस्कार करण्यासाठी मृतदेह घरी नेले आहेत. अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आहे आणि नेमक्या कोणत्या परिस्थितीमुळे हा अपघात झाला हे शोधण्यासाठी काम करत आहेत.

सदरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक दीप आणि रेल्वे पोलिसांनी या घटनेचा सविस्तर तपास सुरू केला आहे.

# पानसरे हत्येप्रकरणी देखरेखीची गरज नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासावर यापुढे देखरेख करण्याची गरज नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयानं घेतला आहे. या हत्या प्रकरणातील दोन फरार आरोपींचा शोध घेणं अद्याप बाकी आहे. त्यामुळे केवळ त्यासाठी या प्रकरणाच्या तपासावर उच्च न्यायालयाला देखरेख ठेवण्याची गरज नाही, असं मत मुंबई उच्च न्यायालयाचं न्यायमूर्ती ए एस गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खता यांच्या खंडपीठानं व्यक्त केले. गोविंद पानसरे यांच्या कुटुंबीयांनी दाखल केलेली याचिका न्यायालयानं निकाली काढली. या प्रकरणी जलदगतीनं खटला चालवावा, खटल्याच्या सुनावणीमध्ये दैनंदिन सुनावणी घेऊन या प्रकरणी खटला निकाली काढावा, असं निर्देश उच्च न्यायालयानं या प्रकरणाचा खटला सुरु असलेल्या कोल्हापूर सत्र न्यायालयाला दिले आहेत.

फेब्रुवारी २०१५ मध्ये गोविंद पानसरे यांच्यावर त्यांच्या घराजवळ अज्ञात व्यक्तींनी गोळ्या झाडल्या. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते, मात्र उपचारांदरम्यान त्यांचं निधन झालं. या हत्या प्रकरणाच्या तपासाला विलंब होत असल्यानं पानसरे कुटुंबीयांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन या तपासावर देखरेख ठेवण्याची मागणी केली.

# दिल्लीत पंतप्रधान विरोधात केजरीवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा काही दिवसांमध्ये होण्याची शक्यता आहे. तर पुढील महिन्यात मतदान होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी, दिल्लीत विविध विकासाकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी करुन निवडणुकीच्या प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे.

दुसरीकडे आम आदमी पक्षाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात निवडणूक प्रचाराला सुरुवात केली आहे. तर काँग्रेस पक्ष राजधानीत म्हणावा तेवढा मजबूत नाही. त्याबरोबरच काँग्रेसकडे दिल्लीतील स्थानिक प्रभावी चेहरा नाही. त्यामुळे दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी विरुद्ध अरविंद केजरीवाल असा थेट सामना होण्याची शक्यता आहे.

दिल्ली विधानसभा निवडणूक अगदी तोंडावर आली आहे. दरम्यान, शुक्रवारी दिल्ली भाजपने 'एक्स'वर पोस्ट केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, 'दिल्ली चली मोदी के साथ'. तसेच या अगोदरही पक्षाने ही निवडणूक पंतप्रधान मोदी यांच्या चेहऱ्यावर लढण्याचे संकेत दिले होते. आता हे संकेत खरे ठरत असून भाजप ही निवडणूक पंतप्रधान मोदी यांच्या चेहऱ्यावर लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या आम आदमी पक्षाच्या आतिशी दिल्लीच्या मुख्यमंत्री आहेत. मात्र, त्यांच्या पक्ष अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात निवडणूक लढत आहे. आतिशी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर सांगितले होते की, पुन्हा केजरीवाल यांना मुख्यमंत्री करायचे आहे. त्यामुळे 'आप' माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या चेहऱ्यावर निवडणूक लढवणार हे तेव्हाच स्पट झाले होते. त्यावर केजरीवाल यांनी योजनांच्या घोषणा करुन शिक्कामोर्तब लावला. सध्या केजरीवाल आम आदमी पक्षाच्या प्रचाराचे नेतृत्व करत आहेत.

### काँग्रेस मजबूत होणे भाजपसाठी फायद्याचे

● देशभरात काँग्रेस विरुद्ध भाजप अशी लढाई आहे. मात्र, दिल्लीत भाजपचा प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस नसून आम आदमी पक्ष आहे. तर काँग्रेस पक्ष म्हणावा तेवढा मजबूत नाही. काँग्रेसच्या शीला दीक्षीत मुख्यमंत्री होत्या तेव्हा पक्षाला राजधानीत चांगले दिवस होते. मात्र, अलीकडच्या दशकात काँग्रेसची राजधानीतील अवस्था बिकट झाली आहे. सध्याच्या विधानसभेत काँग्रेसचा एकही आमदार नाही. काँग्रेसची मतपेटी आम आदमी पक्षाकडे गेली आहे. त्यामुळे दिल्लीत काँग्रेस मजबूत होणे भाजपच्या फायद्याचे असल्याचे बोलले जाते.



# संजय राऊत यांची एकनाथ शिंदेंवर टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उबाठा खासदार संजय राऊत यांनी गडचिरोली नक्षलवाद प्रकरणावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं. मात्र त्यांनी यावेळी माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. गडचिरोलीत या आधीच्या पालकमंत्र्यांचं काम आम्ही पाहिलं आहे. या जिल्ह्यातून एजंट नेमून खंडण्या गोळा करण्याचं काम काही लोकांनी केलं. यापूर्वी देखील इथं खंडण्या आणि हप्ते गोळा करण्याचं काम झालं. त्यातून नक्षलवाद, गरीबी वाढली, अशी खरपूस टीका संजय राऊत यांनी नाव न घेता एकनाथ शिंदे यांच्यावर केली. त्यामुळे एकाच वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करणाऱ्या संजय राऊतांनी दुसरीकडं एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली.

नक्षलवाद हा गरीबी आणि बेरोजगारीतून निर्माण झालेला राक्षस आहे. नक्षलवाद नष्ट होणार असेल आणि मुख्यमंत्र्यांनी पाऊल उचललं असेल, तर ते विधायक काम आहे. त्यांचं अभिनंदन आणि कौतुक करणं आपल्या सर्वांचं काम आहे. या अगोदरही पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा चांगली कामं केली तेव्हा त्यांचं कौतुक केलं. चांगल्या कामाचं कौतुक करण्याची आमच्या पक्षाची आणि शिवसेना प्रमुखांची भूमिका राहिली आहे. जमशेदपूरनंतर जर गडचिरोली ही पोलाद सिटी म्हणून विकसित करण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर जहाल नक्षलवाद्यांनी शस्त्र खाली ठेवलं आणि आत्मसमर्पण केलं.

# बेटांच्या विकासावर केंद्र सरकारचा भर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दक्षिणेकडील मालदीव मधील तणाव आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात राज्यांच्या सहकार्याने त्यांच्या भौगोलिक हद्दीमध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्रे उघडण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर अंदमान-निकोबार, लक्षद्वीप आणि दमण-दीव बेटांवर रिसॉर्ट उभारण्याच्या योजनेवर केंद्रीय पर्यटन मंत्रालय काम करत आहे.

मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकार एका बेटावर रिसॉर्ट विकसित करण्याच्या मोठ्या योजनेवर काम करत आहे. ऑफशोर भागात भारतीय भौगोलिक क्षेत्रातील सर्व बेटे आणि बेटे ओळखून तेथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील रिसॉर्टआणि पर्यटन केंद्रे सुरू करण्याची सरकारची योजना आहे, जेणेकरून देशी-विदेशी पर्यटक तेथे पोहोचतील आणि सुट्ट्यांचा आनंद घेऊ शकतील. या धोरणाच्या माध्यमातून सागरी क्षेत्रात इको टुरिझमला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भारतात १,३०० पेक्षा जास्त बेटे आहेत, त्यापैकी २८९ खडकाळ बेटे आहेत. इको टुरिझमच्या दृष्टीने विकासाला भरपूर वाव आहे. 'वन आयलंड, वन रिसॉर्ट प्लॅन'च्या माध्यमातून अशा सर्व बेटांचा विकास करण्याची सरकारची योजना आहे. सरकार खासगी संस्थांच्या सहकार्याने निर्जन बेटांचा विकास करण्याचा विचार करीत आहे. जेणेकरून ती सर्व बेटं पर्यटकांसाठी खुली होतील.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बेटांवर रिसॉर्ट बांधण्याबरोबरच नैसर्गिक परिसंस्था आणि समृद्ध जैवविविधतेची देखभाल आणि संवर्धन करण्यावरही भर दिला जात आहे. एका छोट्या बेटाप्रमाणेच मालदीवमध्येही हे रिसॉर्ट विकसित करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर भारतीय बेटांवरही रिसॉर्ट विकसित केले जाणार आहेत. भारतीय बेटांवर असे रिसॉर्ट विकसित झाल्यास मालदीवला धक्का बसू शकतो, कारण मालदीवची अर्थव्यवस्था पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे. भारतासह जगभरातून पर्यटक सुट्ट्या साजरी करण्यासाठी आणि नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी येतात. मालदीवच्या परिसरात अशी पर्यटन केंद्रे विकसित झाल्याने देशी पर्यटक येतील आणि परदेशी पर्यटकही आकर्षित होतील.

# इराणमधून १० हजार पाकिस्तान्यांची हकालपट्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इराणने नुकतीच आपल्या देशातून १० हजारांहून अधिक पाकिस्तानी नागरिकांची हकालपट्टी केली आहे. इराणमधून हद्दपार करण्यात आलेल्या या पाकिस्तानी नागरिकांचे पासपोर्ट ब्लॉक करण्यात आले आहेत. बेकायदेशीररित्या इराणमध्ये घुसून युरोपात पळून जाण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून त्यांना अटक करण्यात आली होती. पाकिस्तानच्या गृह मंत्रालयातील सूत्रांनी १० हजार ४५४ जणांचे पासपोर्ट रद्द करण्यात आल्याची माहिती दिली. बलुचिस्तानच्या सीमेवरून हे लोक इराणमध्ये घुसले. इराणच्या अधिकाऱ्यांनी त्याला अटक करून चागई जिल्ह्यातील ताफ्तान शहरात पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले.

माध्यमातील वृत्तानुसार, जानेवारी ते १५ डिसेंबर २०२३ या कालावधीत झालेल्या या अटकेमुळे अवैध स्थलांतराची वाढती प्रकरणे उघडकीस आली आहेत. बलुचिस्तानमध्ये धोकादायक आणि अनधिकृत मार्गाने युरोपात जाण्याचा प्रयत्न पाकिस्तानी तरुण अनेकदा करतात. २०२० ते २०२४ या कालावधीत ६२ हजारांहून अधिक पाकिस्तानी नागरिकांना इराणमध्ये बेकायदा प्रवेश केल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. यातील बहुतांश जण पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील आहेत.


### जाहीर नोटीस

बारामती पंचक्रोशीतील तमाम लोकांना कळविण्यात येते की, गांव बारामती ता. बारामती जि. पुणे येथील स.नं. २२ / १ / २ / ३ / ४ मधील बिगरशेती प्लॉट नं. ५७ क्षेत्रफळ २.८३.४० चौ. मी. यांसी चतु:सिमा - पुर्वेस - प्लॉट नं. ५६, दक्षिणेस - प्लॉट नं. ५८, पश्चिमेस – अंतर्गत रस्ता, उत्तर - अंतर्गत रस्ता ही मिळकत मूलतः वंदना अनिल गुजर, करिष्मा गणेश शहा, समिर अनिल गुजर व पराग अनिल गुजर यांच्या मालकीची असून मा. उपविभागीय अधिकारी सो. बारामती यांचे आदेशान्वये व तयार असलेला ले-आऊट प्रमाणे टाऊन प्लॅनिंग बारामती यांनी दिनांक २७ / ११ / २००८ रोजी मान्यता देवून दिनांक ०६/०३/२००९ रोजी बिगरशेती परवाना दिल्यानंतर दिनांक २१/०७/२०१२ रोजी रिव्हाईज बिगरशेती परवाना मा. उपविभागीय अधिकारी बारामती यानी दिला. त्याप्रमाणे फेरफार क्र. ३१९३३ अन्वये ७/१२ पत्रकी सर्व प्लॉटची नोंद झाली. त्याप्रमाणे फेरफार क्र. ३७४२२ अन्वये अनिल चिमणलाल गुजर यांच्या मृत्यूपश्चात दिनांक १३/०९/२०१८ रोजी वारस म्हणून वंदना अनिल गुजर व करिष्मा गणेश शहा, पराग अनिल गुंजर व समीर अनिल गुजर यांचे नाव प्लॉट नं. ५७ वर मालक सदरी आले. दिनांक ०७/१२/२०२४. आमचे अशिल यशवंत शंकरराव देशमुख यांचेशी झालेल्या विसारपावतीच्या दस्तान्वये जो हक्क व अधिकार आमचे अशिल यांना प्राप्त झालेला आहे त्या अधिकारान्वये व भविष्यात वर नमूद मिळकतीचे खरेदीखत, आमचे अशिल व वरील इसमांशी झालेल्या ठरोतीप्रमाणे होणार आहे. दरम्यानच्या काळामध्ये वर नमूद मिळकतीबाबत जर कोणी व्यवहार केला असेल किंवा गहाण, दान, लिज, लिन, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, व इतर मार्गाने हस्तांतर केले असेल तर सदर नोटीस मिळालेपासून ९ दिवसांचे आत त्याचा लेखी खुलासा आमचे अशिलांकडे येवून करावा तसे न केल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे आमचे अशिल समजतील व वरील मिळकती संदर्भात होवू घातलेला व्यवहार पुर्णत्वाला नेतील नंतर होणाऱ्या कायदेशीर परिणामांस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही पंचक्रोशीतील तमाम लोकांना जाहिर सूचना असे

अशिलांचा पत्ता :- श्री. यशवंत शंकरराव देशमुख, टी - ६, अश्वमेघ चेंबर्स, ४ यादो गोपाल पेठ, सातारा - ४१५००२

बारामती
दिनांक : ०२ / ०१ / २०२५

**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**श्री. संजय भा. जगताप**
**ऑफिस नं. २९, लॉयर्स चेंबर्स,**
**नवीन कोर्टाशेजारी, बारामती जि. पुणे**
**मो. नं. ९८२२४४६३८५**

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

### जाहीर नोटीस

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ७३/२०२४-२५**
**पुणे, दिनांक : १६/१२/२०२४ ६९५**

**अर्जदार**
तुलीप होम्स डी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१,गट नं.९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३, गट नं.९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी, ( शिक्रापुर रोड), चाकण, ता.खेड, जि. पुणे - ४१०५०१
तर्फे, अध्यक्ष : श्री. प्रकाश बाळू पाटील, सचिव : श्री. विक्रम रामहरी घनवट
खजिनदार: श्री. महेंद्र अंबादासजी वसुले

**विरुद्ध**

**जाब देणार**
१) तुलीप होम्स (संयुक्तीक करारनामा), तर्फे अधिकृत स्वाक्षरीकार,
अ. मे. यश इंटरप्राईज् भागीदारी संस्था
ऑफिस पत्ता- ए/८/२, जलवायु विहार, सेक्टर नं. ६, मोशी प्राधिकरण,
ता. हवेली जि.पुणे-४१२१०५.
तर्फे भागीदार,
ए. श्री. नरेंद्रभाई नारणभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार, सेक्टर नं. ६,
मोशी प्राधिकरण, ता.हवेली, जि. पुणे - ०५.
ब. श्री. सुरेशभाई मावजीभाई पटेल, पत्ता- १३, रेन्बो अपार्टमेंट, सेक्टर नं. ६,
मोशी प्राधिकरण, ता.हवेली, जि. पुणे - ०५.
क. श्री. दिलीपकुमार रतीभाई पटेल, पत्ता- जलवायु विहार, सेक्टरनं. ६,
मोशी प्राधिकरण, ता. हवेली, जि. पुणे - ०५.
२) जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २,
नामदेव निवृत्ती खांडेभराड (मयत तर्फे वारस)
ए. सुंदराबाई नामदेव खांडेभराड, बी. गोटुराम नामदेव खांडेभराड जाब देणार नं. २ ए व बी रा. मेदनकरवाडी, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.
सी. सौ. सुरेखा बळीराम कड, रा. शिक्रापूर, ता. शिरूर जि. पुणे- ४१२२०८.
डी. सौ. सुनंदा उमेश घोलप, जाब देणार नं. २ डी रा. चाकण,
ता. खेड जि. पुणे-४१०५०१ ई. सौ. चंद्रकला पोपट काळे
जाब देणार नं. २ ई रा. चांडवली, ता. खेड जि. पुणे - ०१
(स्वतः करीता व नं. २ ए ते ई तर्फे विकसनकर्ता व कु. मु. धारक म्हणुन ) जाबदेणार
अक्शा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा.लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी,
रजि. ऑफिस- सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज-111, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी, श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी,
रा. अशियाना', सर्व्हे नं. १५०, प्लॉट नं. ६, सुखवाणी इंपेरिअल, फेज- III,
मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८
३) अक्शा प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स प्रा. लि. कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत कंपनी,
रजि. ऑफिस- सर्व्हे नं. १५० ते १५३ प्लॉट नं. १०, शॉप नं. १२ व १३,
सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर / ऑथराईजड सिग्रेटरी श्री. झिकरुल्लाह अब्बास अली चौधरी रा.' अशियाना', सव्हे नं. १५०, प्लॉट नं. ६, सुखवाणी इंपेरिअल, फेज- III, मोरवाडी, पिंपरी, पुणे- ४११०१८.
( जा. देणार नं. २ तर्फे कु. मु.धारक म्हणुन जा. देणार नं. १ ) इतर संस्था / इतर इमारत / जाब देणार नं. ३. ४) तुलीप होम्स ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ५) तुलीप होम्स सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या, ६) तुलीप होम्स ई विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या,
७) बी इमारत
पत्ता: गट नं. ९३/१९८/१९१/अ/१,गट नं.९३/१९८/१९९/अ/२ व गट नं.९३/१९८/१९९/अ/३, गट नं.९३/१९८/१९९/अ/४, मेदनकरवाडी, ( शिक्रापुर रोड), चाकण, ता.खेड, जि. पुणे- ४१०५०२.

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते ०७ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १३/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे..

शिक्का

**सही/-**
**प्रकाश ल. जगताप**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)**

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

### जाहीर नोटीस

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ७४/२०२४-२५**
**पुणे, दिनांक : १६/१२/२०२४ ६९४**

**अर्जदार**
"१३३ ऑरेंज ट्री बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या"
नोंदणी नं. पीएनए / एमएसआय/एचएसजी / (टिसी) / १४३७६/२०२०-२१ दि.३०/०६/२०२०,
पत्ता: स.नं. १३३ + १३४/१/१ + १३४/२, प्लॉट नं. १७ ते २३ आणि १४,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
तर्फे अध्यक्ष : श्री. ज्ञानेश्वर बालाजीराव सूर्यवंशी, सचिषः श्री. कपिल शिरीष मोरे

**विरुद्ध**

**जाब देणार**
१) मे. ब्ल्यू पर्ल ऑरेंज नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
अ) श्री. मनिष अण्णासाहेब आंबरे
वयः सज्ञान धंदा व्यवसाय
ब) सौ. रेखा अण्णासाहेब आंबरे
वय : सज्ञान धंदा व्यवसाय
अ.क्र. अं व ब रा. बंगलो नं ३७, किर्ती नगर, नवी सांगवी, पुणे ४११०२७
(अ.क्र.२ ते ९ तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र.१) विकसक / जाब देणार नं १
२) श्री. किरण गजानन घोडके
वयः सज्ञान धंदा व्यवसाय रा. १३, प्रशांत सोसायटी, पौंड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२७
३) श्री. मनिष अण्णासाहेब आंबरे
वयः सज्ञान धंदा व्यवसाय
४) सौ. रेखा अण्णासाहेब आंबरे
वय : सज्ञान धंदा व्यवसाय अ.क्र. ३ व ४ रा. बंगलो नं ३७,
किर्ती नगर, नवी सांगवी, पुणे ४११०२७
५) श्री. विनय सुदाम घुले
रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं १४,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
६) श्री. कुमुद प्रताप
७) श्री. उदय प्रताप जाबदेणार
अ.क्र.6 व 7 रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
८) आशा गुप्ता
९) किरण गुप्ता अ.क्र. ८ व ९रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १८, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१०) श्री. नितीन साहेबराव देवकर
११) श्री. प्रतिक अनिल एकतपुरे
१२) श्री. महेश विनायक बारगजे अ.क्र. १० ते १२
रा. स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं २२,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१३) श्री. हर्षल उल्हास देव श. स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं २३, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे २१ जागा मालक/संमती देणार / जाब देणार नं २
१४. १३३ ऑरेंज ट्री ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं १७ ते २३ व १४. साईरंग गार्डन,
मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१५) १३३ ऑरेंज ट्री सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ताः स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ ते २३ व १४, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे
१६) १३३ ऑरेंज ट्री डी विंग पत्ता स.नं. १३३ + १३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ ते २३ व १४, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१ जाबदेणार
इतर सहकारी संस्था / इतर इमारत / जाब देणार नं ३.

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम १९ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते १६ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १३/०९/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

**सही/-**
**प्रकाश ल. जगताप**
**सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)**

» Selected

# अनाथ आश्रमात बेकरी प्रकल्पासाठी डॉक्टरांची मदत



**जेजुरी :** स्वर्गीय पद्मश्री डॉ सिंधुताई सपकाळ यांनी सुरू केलेल्या पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण येथील ममता बाल सदन आश्रमात बेकरी उत्पादन तयार करण्यासाठी डॉ संजय रावळ आणि इतर सहकारी डॉक्टर्स मित्र यांच्या कडून एक लाख दहा हजार रुपयांची मदत देण्यात आली.

पुरंदर तालुक्यातील ममता बाल सदन आश्रमात निराधार गरजू,गरीब आणि अनाथ मुलींचे संगोपन व शिक्षण आदी सुविधा दिल्या जातात. या आश्रमात छोट्याश्या स्वरूपात बेकरी उत्पादन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकलपसाठी सासवड चिंतामणी हॉस्पिटल चे डॉ संजय रावळ यांनी त्यांच्या वर्गातील डॉक्टर्स यांची मदत घेवून नववर्षाचे औचित्य साधून एक लाख दहा हजार रुपयांची देणगी दिली. या देणगीतून या आश्रमात बेकरी प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. डॉ संजय रावळ,डॉ निरुपमा मोरे, सुबोध दफ्तरदार, अरूणा माने, राजेंद्र पगारे, रवींद्र सोनवणे, उमा वेंकट, डॉ सैफी, मिलन दीक्षित, अपूर्व देसाई, संजय फर्नांडिस, वीणा सोनवणे, सुदिप्तो दास, सरोज शिवदे, अंजली दाते, सुजाता सोनवणे यांनी या प्रकल्पासाठी योगदान दिले आहे.

# "कोण होणार सभापती" वक्तृत्व स्पर्धा

**सासवड :** येथील सासवड सांस्कृतिक मंडळ आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांच्या



वाढदिवसानिमित्त "कोण होणार सभापती" या जिल्हास्तरीय भव्य वक्तृत्व स्पर्धा संपन्न होणार आहेत. यंदाचे हे आठवे वर्ष असून खुल्या गटासाठी होत असलेल्या या स्पर्धेत पुरंदर हवेलीतील १८ वर्षांपुढील महाविद्यालयीन युवक - युवती तसेच शेती, सहकार, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील व्यावसायिकांसह सर्वसामान्य नागरिकांना सहभागी होता येणार आहे. नाममात्र प्रवेश फी असून प्रथम प्रवेश घेणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहील. दि ११ जानेवारी पर्यंत प्रवेश अर्ज भरून देणे बंधनकारक आहे. दि १२ जानेवारीला सासवड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन ( सेंटर ऑफ एक्सलन्स ) येथे सकाळी १० वा ही स्पर्धा सुरू होणार असल्याची माहिती मंडळाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला "सभापती किताब" व करंडक तसेच प्रशस्तिपत्रक आणि रोख ७ हजारांचे बक्षीस देण्यात येणार असून द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ दोन क्रमांकासाठी अनुक्रमे ५ हजार, ३ हजार, २ हजार आणि १ हजार रोख तसेच ट्रॉफी व प्रशस्तिपत्रक देण्यात येणार असल्याचे सासवड सांस्कृतिक मंडळाच्या वतीने रविंद्रपंत जगताप यांनी सांगितले.

# सराईत मोबाईल चोरट्यांच्या सासवड पोलिसांनी मुसक्या आवळल्या



**सासवड :** लॅपटॉप व मोबाईल संच चोरणारा सराईत चोरटा पोलिसांनी जेरबंद केला आहे. त्याच्याकडून आठ लॅपटॉप व नऊ मोबाईल संच, असा ४ लाख २६ हजारांचा ऐवज जप्त केला आहे. त्याने आणखी लॅपटॉप चोरी केल्याचा संशय असून, पोलिसांकडून त्या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. गणेश मंजाप्पा (रा. घर नं. ५२५ उदयराजा पालायम, ता. तोटाल्लम जिल्हा अंबुर (वेल्लोर) राज्य तामिळनाडू) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव आहे. पोलिसानी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वल्लकोंडा राजानरसिंमा रेडडी ( रा. टी.एन. जी.ओ कॉलनी आंध्र बँकचे बाजुला तालुका हनमकोडा, जिल्हा तेलंगना) हे मगरपट्टामध्ये नोकरीला आहे. हे सासवड येथील संगमेश्वर महादेव मंदिराचे दर्शन घेवुन सकाळी ७.३० वाजता सासवड ते हडपसर पीएमपीएल बसने प्रवास करीत असताना तिकीट काढण्यासाठी बॅग चेक केली असता बगेची चैन कोणीतरी उघडलेली दिसली. बॅगेमध्ये ॲपल कंपनीचे वॉच आणि पाकिट नव्हते. ॲपल वॉच हे त्याचे आयफोन मोबाईलला कनेक्ट असल्याने त्याचे लोकेशन सासवड येथील पीएमपीएल बस स्टॉप समोर येत होते. सासवड पोलीसांनी तातडीने त्या ठिकाणी जावुन परीसराची पाहणी केली. त्यानंतर लोकेशन हे पुरंदर हायस्कुल समोरी असलेल्या साठेनगर मध्ये आले. तेथे जावुन पाहणी केली असता वॉच मोबाईल फोनला कनेक्ट झाले. पोलीसांनी घराचा दरवाजा वाजवीला एक इसम घरातुन बाहेर आला. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे खिशामध्ये सदरचे चोरी झालेले ॲपल कंपनीचे वॉच मिळून आले. तसेच त्याचे जवळ असलेल्या बॅगमध्ये ३ लॅपटॉप मिळून आले. ८ लॅपटॉप, ९ मोबाईल फोन व चोरीस गेलेले ॲपल वॉच असा एकुण ४ लाख २६ हजारांचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला. आरोपीवर पुणे शहर येथे विविध ठिकाणी गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ए.एस. बोरगे हे करत आहेत.

# वीरश्री मालोजीराजे स्मारकाची दुरवस्था

## काटेरी झुडुपे, धुळीचे थर : ठेकेदाराची बेपर्वाई, शासनाची अनास्था

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** वाढलेली वाळलेली काटेरी झुडुपे, धुळीच्या थराने माखलेले तडा गेलेले मावळ्यांचे पुतळे, उड्डाणपुलाच्या कामामुळे खचत चाललेला स्मारकालगतचा एक एक इंच...एकेकाळी आकर्षक व देखण्या दिसणा-या वीरश्री मालोजीराजे भोसले यांच्या स्मारकाची सध्या अशी दुरवस्था झालेली आहे.

स्मारकाची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल अशी हमी घेतलेल्या एन.पी.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. या उड्डाणपुलाचे काम करणा-या कंपनीने दिलेला शब्द गुंडाळून ठेवत, पुलाचे काम रेटून नेण्याचा प्रयत्न चालवल्याने स्मारकाच्या दुरावस्थेत वाढ होत चालल्याने, त्या कंपनी विषयीच्या लोकांच्या नाराजीचे रुपांतर संतापात होत चालल्याचे चित्र दिसत आहे.

सविस्तर वृत्त असे की, पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवराय यांचे आजोबा वीरश्री मालोजीराजे यांच्या नावाचा चौक आहे. मागील काळात शासनाने तेथे मालोजीराजे यांचे आकर्षक स्मारक उभारलेले होते. सुंदर सजवलेला मानदार वर्तुळाकार कट्टा, त्याच्या शेजारी मधोमध मालोजीराजे यांची मुद्रा असणारा लांबरुंद चौथरा त्याच्या सभोवती मावळ्यांच्या प्रतिकृती अशी सजावट असणारे स्मारक व भोवती असणारी फुलझाडे यामुळे पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरुन मुंबई ते हैदराबादपर्यंत जाणा-या लोकांच्या दृष्टीला हे स्मारक सुखावून जात होते.

मध्यंतरीच्या काळात महामार्गाचे विस्तारीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले. स्मारकाच्या दक्षिणेकडून उड्डाणपूल काढण्याचे ठरले. एन.पी. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. या कंपनीकडे उड्डाणपूल उभारणीचे काम देण्यात आले. काम सुरु केल्यानंतर स्मारकाच्या भोवतालच्या जमिनीची खोदाई व इतर कामे सुरु झाली. हळूहळू स्मारकाची जागा कमी होवू लागली. कामात वापरात येणा-या बाबी व जमिनीला बसणारे हादरे यामुळे मावळ्यांच्या पुतळ्यांना तडे जावू लागले. धुळीची पुटे पुतळ्यांवर साठू लागली. स्मारकाचा परिसर धुळीने माखला. हे लक्षात आल्यानंतर सकल मराठा समाजाने ही बाब शासनाच्या लक्षात आणून दिली. शासनाने कंपनीला समज दिल्यानंतर स्मारकाची कसली ही हानी होऊ दिली जाणार नाही अशा पध्दतीने उड्डाणपुलाचे काम करु अशी हमी कंपनीने दिली. मात्र काम बेदरकारपणे जैसे थे तसेच सुरु ठेवले. त्यामुळे दि.१२ डिसेंबर रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने कंपनीच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या पार्श्वभूमीवर स्मारकाची पाहणी केल्यानंतर स्मारकाची दुरावस्था झाल्यानंतर ठेकेदार कंपनीने मनमानी पध्दतीने काम सुरु ठेवल्याचे आढळून आले. ते तसेच चालू राहिले तर स्मारकाची आणखी पडझड होणार आहे. त्यामुळे लोकांच्या नाराजीचे रुपांतर संतापात होण्याची शक्यता बळावली आहे.



पुणे इंदापूर : वीरश्री मालोजीराजे भोसले यांच्या स्मारकाची दिवसेंदिवस दुरवस्था होत चाललेली आहे.



> एका ठेकेदारी कंपनीच्या बेपर्वा वृत्तीमुळे, जगाला आदर्श असणा-या छ.शिवराय यांचे आजोबा वीरश्री मालोजीराजे भोसले यांची दुरवस्था त्यांची जहागिरी असणा-या इंदापूरात होते आहे, ही संतापजनक बाब आहे. या संदर्भात आम्ही शासनाकडे वेळोवेळी निवेदने देत आहोत. आंदोलने करत आहोत, परंतू जैसे थे अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे या स्मारकाच्या संवर्धनासाठी आत्ता आक्रमक व्हावे लागेल. त्यानंतर मात्र संबंधित ठेकेदाराने आम्हाला दोष देवू नये.'
>
> **रोहित पाटील, सकल मराठा समाज, इंदापूर**

# शिवरायांच्या स्वराज्य कधी निर्माण होणार?

## माजी आयुक्त इंद्रजीत देशमुख यांचे सासवड येथे बोलताना परखड प्रतिपादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** संत ज्ञानेश्वर महाराज यांनी अवघाचि संसार सुखाचा करीन आनंदे भरिन तिन्ही लोक असे सांगितले. मात्र काही लोक अवघाचा संसार सुखाचा करीन अनंदे भरीन एकट्याने या वृत्तीने जगत आहेत. स्मशानात सुद्धा गट तट होतात त्यामुळे आपण काय करीत आहोत? एखाद्या झाडाचे पिकलेले पान गळून पडायचे असेल तर त्याला झाडाची मुक संमती घ्यावी लागते. ही संवेदनशिलाता या समाजाकडे आहे का? देश स्वतंत्र झाल्यानंतरही आपण केवळ आपल्या पुरतेच पहात असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजांच्या स्वप्नातील स्वराज्य आणि स्वामी विवेकानंद यांच्या स्वप्नातील भारत कधी निर्माण होणार? असा जळजळीत सवाल राज्याचे माजी आयुक्त इंद्रजीत देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

सासवड येथील तहसील कार्यालयात पुरंदर तालुका ग्राहक कल्याण फौंडेशनच्या वतीने ग्राहक प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, तालुका कृषी अधिकारी सुरज जाधव, ग्राहक कल्याण फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तुकाराम निंबाळकर, रवींद्र ताकवले, संतोष जगताप, एमके गायकवाड, संदीप टिळेकर, महादेव खेंगरे पाटील, विकास महाजन, सतीश साकोरे, बंडूकाका जगताप, प्रा. केशव काकडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जनावराला सुद्धा कळते की पुढच्या पिढीसाठी जगायचे असते. त्यामुळे आपण मरताना पुढील पिढीला चांगले वातावरण निर्माण करून मरायचे असते. चुकीच्या गोष्टीवर प्रहार करणारी माणसे जिवंत असतात. आणि जिवंत मासे नेहमी प्रवाहाच्या विरोधात प्रवाहित होत असतात. त्याप्रमाणे समाज कधी प्रवाहित होणार ? असा प्रश्न उपस्थित करतानाच कायद्याने लोक सुखी समाधानी असती तर खटल्यांची संख्या कमी असती. लोकशाहीत झोपलेल्या माणसांना टोचून टोचून जागे केले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, ग्राहक कल्याण फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तुकाराम निंबाळकर यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. फौंडेशनचे पुरंदर तालुका अध्यक्ष रामदास मेमाणे, हरी ओम झेंडे संतोष मगर, सुभाष काळे, संतोष काकडे, शिवाजी सुळके, बाळासाहेब मगर, राजाभाऊ क्षीरसागर, रामदास रांजणे, बबन काळे, सोमेश्वर काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

# कागद वाचवा, पर्यावरण वाचवा मोहीम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तात्काळ वीज बिलात एक रकमी १२० रुपयाची सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे. महावितरण कडून "कागद वाचवा, पर्यावरण वाचवा"या संकल्पनेनुसार गो ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे, अशी माहिती महावितरण कंपनीचे मंचर विभागाचे कार्यकारी अभियंता शांताराम बांगर यांनी आपटाळे तालुका जुन्नर येथे कृषी व वीज ग्राहक मेळाव्यात दिली.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन तहसील कार्यालय जुन्नर व अखिल भारतीय ग्राहक पंचायत जुन्नर तालुका यांच्या विद्यमाने, शेतकरी व वीज ग्राहक मेळाव्याचे आयोजन आपटाळे येथे करण्यात आले होते यावेळी बांगर बोलत होते . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले, ना तहसीलदार प्रसन्न केदारी, ग्राहक पंचायत जुन्नर तालुका अध्यक्ष जगन्नाथ खोकराळे, जुन्नर तालुका उपाध्यक्ष सिताराम चव्हाण, ग्राहक पंचायत महिला अध्यक्ष मंदाताई उत्तरडे, उपकार्यकारी अभियंता संतोष तळपे, तालुका समन्वयेक नंदाराम भोर सरपंच गुलाब साबळे, प्रकाश कचरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले, प्रसन्न केदारी, प्रकाश कचरे आदींनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगन्नाथ खोकराळे यांनी, व सूत्रसंचालन महेंद्र पवार यांनी केले.

# अष्टविनायक मार्गावरील अपघातात दोघे ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातून जाणाऱ्या अष्टविनायक महामार्गावर आज दुपारी सुमारे १२ ते साडे बाराच्या दरम्यान चारचाकी व दुचाकींचा भीषण अपघात झाला असून या अपघातात विनोद राजकरण यादव (वय ३२ वर्ष) लाला धरमपाल यादव (वय २५ वर्षे) हे दोघे जण जागीच ठार झाले असून लालमल चुक्कीमल यादव ( सर्व रा. शिव ता. बभेरु जि.बांदा, उत्तर प्रदेश ) हा गंभीर जखमी झाल्याची माहिती टाकळी हाजी पोलीस दूरक्षेत्राचे पोलीस जमादार देवीदास खेडकर यांनी दिली आहे.

अपघात

याबाबत टाकळी हाजी पोलीस खेडकर यांच्याकडून मिळालेल्या माहिती नुसार आज दुपारी साडेबाराच्या आसपास अष्टविनायक महामार्गावरून ३ जण दुचाकीवरून कवठे येमाई बाजूकडे चाललेले असताना ईचकेवाडी जवळ खार ओढ्याच्या वळणावर समोरून आलेल्या चार चाकी वाहन व दुचाकीची जोरदार धडक झाली. या अपघातात २ जण ठार झाले असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

या अपघातातील जखमीला पुढील उपचारासाठी व ठार झालेल्या दोघांना शवविच्छेदनासाठी शिरूर येथे हलविण्यात आले. ओढ्याच्या दोन्ही बाजूस तात्काळ गतिरोधक करण्याची मागणी ग्रामस्थ व प्रवाशांकडून केली जात आहे.

# जुन्नरमध्ये चोरट्यांनी ५ तोळे सोने लांबवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील विघ्नहर साखर कारखान्याच्या कर्मचारी वसाहती मधील एका राहत्या घराचा मागील दरवाजा तोडून अनोळखी चोरट्यानी घरातील सुमारे ५ तोळे वजनाचे सोन्याचे विविध दागिने, सात आठ साड्या महत्वाची कागदपत्रे चोरून नेले आहेत.

विष्णू चतुर यांनी या चोरीची फिर्याद नोंद केली आहे. कारखान्याच्या वसाहती मधील त्यांच्या घराचा मागील दरवाजा तोडून घरातील कपाटातील सोन्याचे मंगळसूत्र, चैन, अंगठी, नथ, कुड्या असे दागिने तसेच लोखंडी पेटीत ठेवलेल्या सात आठ साड्या आणि महत्वाची कागदपत्रे अनोळखी चोरट्यांनी चोरून नेली आहेत. या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक फौजदार भरत मुठे पुढील तपास करीत आहेत.

# यशदा प्रशिक्षणार्थींची विद्या प्रतिष्ठानला भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** यशदा ही संस्था नेहमीच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या अधिकारी वर्गाला प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत असते. या संस्थेमार्फत उच्च व तंत्र शिक्षण विभागातील संवर्ग अ मधील प्रशिक्षण घेणाऱ्या सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक अशा जवळपास ४३ प्रशिक्षणार्थींनी या सेंटरला भेट दिली. या सेंटरच्या प्रभारी प्रा. प्राची काळे, डॉ. पी. आर. चित्रगार, यांनी या आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थी अधिकारी वर्गाला सखोल मार्गदर्शन केले. तसेच सिम्युसॉफ्ट कंपनीचे संचालक सुनील चोरे यांनी या भेटीबद्दल महत्त्वाची भूमिका बजावली. सिम्युसॉफ्ट कंपनीचे तंत्रज्ञ स्वप्निल कारभारी व इतरांनी वेगवेगळ्या ऑटोमॅटिक मशीनची इत्यंभूत माहिती त्यांना दिली. प्रशिक्षणाचे प्रशिक्षण समन्वयक प्रमुख श्री. विजय चव्हाण यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुधीर लांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# अभिवादनास आलेल्या अनुयायांची कार चोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे संभाजीनगरहून अभिवादन साठी आलेल्या अनुयायांनी शिक्रापूर येथील पोलीस बंदोबस्तात असलेल्या पार्किंग मध्ये लावून ठेवलेली कार चोरीला गेल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलिसांत अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे संभाजीनगर हून पद्माकर हिवराळे, गौरव हिवाळे, विकी शेजोळे, आदित्य शेजोळे हे याची कार शिक्रापूर येथील जित हॉटेल समोरील पार्किंग मध्ये लावून ठेवलेली होती. अज्ञात इसमाने कारची चोरी केल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत पद्माकर नामदेव हिवराळे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल केला आहे.

# वाहतूक कोंडीबाबत निवेदन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** सासवड शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत असून सासवड शहर भाजपच्या वतीने सासवड पोलिसांना याबाबत तात्काळ उपाययोजना राबवण्यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात असे म्हटले आहे की, तालुक्यांतील पर्यटन स्थळे व धार्मिक ठिकाणे यामुळे सासवड शहर व परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असून त्याचा सर्वसामान्य जनतेला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही दिवसांपूर्वी आपले खाते व सासवड नगर पालिका यांनी काही ग्रामस्थांच्या मदतीने एक मीटिंग नगर पालिकेच्या कार्यालयात आयोजीत केली होती पण तो केवळ देखावाच ठरला आहे. सर्वसामान्य नागरिकांची या त्रासातून सुटका करण्यासाठी आपण युद्धपातळीवर काम करण्याची गरज आहे. शहरातील काही प्रमुख चौकात सिग्नल यंत्रणा बसवणे, सर्व मुख्य रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे पालिकेच्या सहकार्याने जमीनदोस्त करणे, भाजी व फळ विक्रेत्यांचा बेसुमार वावर यावर बंधनं घालने व पर्याप्त कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन प्रभावी काम व्हावे यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

या पत्राद्वारे आम्ही आपणास सुचित करू इच्छीतो की या बाबत आपण गांभीर्यपूर्वक विचार करून कार्यवाही करावी अन्यथा पुढील काळात होउ घातलेल्या अप्रिय घटनेस आपणास जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी. नव्या वर्षात आपणाकडून या बाबत प्रभावी अंमलबजावणी व्हावी अशी अपेक्षा आहे.या सासवड भाजपा शहराध्यक्ष संतोष जगताप, तालुका कार्याध्यक्ष मयूर जगताप, जवळार्जुनचे सरपंच सोमनाथ कणसे, सरचिटणीस शलील महाराज, केतन खळदकर, उपाध्यक्ष सचिन राऊत, जयेंद्र निकम. युवा मोर्चा अध्यक्ष मंदार टिळेकर, युवती सिद्धी शेलार, इ उपस्थित होते.

## नीरा खोऱ्यातील धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस

# नीरा खोऱ्यांतील धरणांत गतवर्षापेक्षा जास्त पाणीसाठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** नीरा खोऱ्यातील नीरा देवघर, भाटघर, वीर आणि गुंजवणी धरणांत गुरूवारी (दि. २) सकाळी सहा वाजता ४०.१६६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. गत वर्षी यादिवशी चारही धरणांत ३३.३३३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होता. परिणामी नीरा खो-यांतील धरणांत गतवर्षापेक्षा यंदा सुमारे सात टीएमसीने अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे.दरम्यान, नीरा खो-यात यंदा समाधानकारक पाऊस पडल्यामुळे तसेच परतीचा पाऊसही जोरदार झाल्याने सद्या नीरा खो-यातील धरणांच्या पाणी साठ्यात गतवर्षापेक्षा कमालीची वाढ दिसत आहे.



गुरूवारी (दि.२) सकाळी सहा वाजता नीरा खो-यातील पुणे, सातारा, सोलापुर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या नीरा देवघर धरणांत १०.३६९ टी.एम.सी उपयुक्त पाणीसाठा असून ८८.४० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.पुरंदर, खंडाळा, फलटण, बारामती, इंदापूर, माळशिरस व सांगोला तालुक्यांना वरदान ठरलेल्या ब्रिटीशकाशीन भाटघर धरणांत २१.१० टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून ८९.७८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

वीर धरणांत ५.४१५ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून ५७.५६ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर गुंजवणी धरणांत ३.२८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा असून ८८.९० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

नीरा खो-यांतील चारही धरणांमध्ये गुरूवारी ( दि.२) सकाळी सहा वाजता ४०.१६६ टीएमसी एवढा उपयुक्त पाणी साठा उपलब्ध आहे. या चारही धरणांमध्ये गतवर्षी आजच्या दिवशी (दि.२) ३३.३३३ टीएमसी म्हणजे ६८.९७ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता . म्हणजेच गत वर्षापेक्षा यंदा सात टीएमसी म्हणजे १४ टक्के पाणी साठा जादा आहे.

दरम्यान, नीरा खो-यातील धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडल्याने व सद्या चारही धरणातील ४०.१६६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. सद्या रब्बी हंगामातील सिंचनासाठी नीरा उजव्या कालव्यातून १ हजार ४०० क्युसेक्सने व नीरा डाव्या कालव्यातून ४०० क्युसेक्सने आवर्तन सुरू असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या वतीने देण्यात आली.

#रा

» Selected

## टीसी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप



**बारामती :** येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युथ फॉर माय भारत,डिजिटल लिटरसी,विशेष श्रमसंस्कार शिबीर रविवार दि.२२ ते २८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले होते. या निवासी शिबिरात एकूण १६० स्वयंसेवक सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा को-ओर्डीनेटर डॉ.विलास कर्डीले, कार्यक्रम अधिकारी डॉ.निरंजन शहा, प्रा.महारुद्र दुधे यांनी ग्रामस्वच्छता अभियान, कॅशलेस इंडिया, युथ फॉर माय भारत, पथनाट्यातून जनजागृती, सेंद्रिय शेती या विषयावर शेतकऱ्यांचे मार्गदर्शन, अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचे महत्व, वृक्षारोपण या कामांवर भर दिला. विद्यार्थ्यांसाठी तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने, ग्रामस्थांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी स्मार्ट सुनबाई अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोप कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, अंजनगावचे सरपंच प्रतिभा परकाळे, उपसरपंच नामदेव परकाळे,जालिंदर वायसे,सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक दादासाहेब मोरे, उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन

# शेतात शेळ्या-मेंढ्या सोडण्याची वेळ

## फ्लॉवरच्या बाजारभावातील घसरणीमुळे शेतकरी अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** फ्लॉवरच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने फ्लॉवर उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात फ्लॉवर पिकात शेळ्या मेंढ्या जनावरे सोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये नगदी पीक म्हणून फ्लॉवर पिक मोठ्या प्रमाणावर शेतकरी घेतात. दोन महिन्यांपूर्वी फ्लॉवरला उच्चांकी बाजारभाव मिळाला होता. ऑक्टोबर महिन्यात फ्लॉवरला दहा किलोला तीनशे रुपयांवर बाजारभाव मिळाला होता. यातून शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळाले होते. सलग दोन महिने बाजारभावाची साथ शेतकऱ्यांना मिळाली. आता गेली काही दिवसांपासून फ्लॉवरच्या बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. सध्या दहा किलो फ्लॉवरला



पुणे | रांजणी : फ्लॉवरला कवडीमोल बाजारभाव मिळत असल्याने खडकी फाटा (ता. आंबेगाव) येथे शेळ्या मेंढ्यांसाठी आणून टाकलेले फ्लॉवरचे गड्डे . (छाया: रोहीत खुडे )

२० ते ५० रुपये असा कवडीमोल बाजारभाव मिळत आहे. या बाजारभावातून शेतकऱ्यांना वाहतूक भाडे, मजुरी देखिल वसूल होत नाही.

शेतकऱ्यांनी फ्लॉवर पिकासाठी अधिकचे भांडवल गुंतवले आहे. परंतु आता बाजारभावातील घसरणीमुळे गुंतवलेले भांडवल शेतकऱ्यांच्या अंगावर येण्याची वेळ आली आहे. अनेक शेतकऱ्यांनी फ्लॉवर पिकाची काढणी थांबवली आहे. तर काही शेतकऱ्यांनी फ्लॉवर पीक जनावरांसाठी सोडून दिले आहे. खडकी फाटा येथील शेतकऱ्यांनी दिलेले फ्लॉवरचे गड्डे मेंढपाळांनी गोळा करून मोकळ्या जागेत शेळ्या मेंढ्यांसाठी टाकले असल्याचे दिसत आहे.

> सध्या बाजारपेठांमध्ये फ्लॉवरची आवक वाढली आहे. हिवाळ्याच्या दिवसांमध्ये फ्लॉवर पिकावर रोगराई येत नाही. सप्टेंबर, ऑक्टोबर फ्लॉवरला बाजारभाव चांगले मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांनी फ्लॉवरचे पिक मोठ्या प्रमाणावर घेतले. परंतु आता फ्लॉवरची बाजारपेठांमध्ये आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. कवडीमोल बाजारभाव सध्या फ्लॉवरला मिळत आहे. यातून गुंतवलेले भांडवल देखील वसूल होणार नाही.
> — **प्रकाश वाघ,** फ्लॉवर उत्पादक शेतकरी, रांजणी

## पुलावरून रिक्षा कोसळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून खंडोबाचे देवदर्शनासाठी जाताना सासवड-कोंढवा महामार्गावर सासवडजवळ रिक्षा पुलावरून खाली कोसळली. ही घटना बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास सासवड हद्दीत घडली. यामध्ये एक महिला गंभीर जखमी झाली तर रिक्षाचालकासह तीन जण यातून बचावले आहेत.

रिक्षाचालक अमित डबेरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून जेजुरीला खंडोबाचे देवदर्शन करण्यासाठी उमेश चव्हाण, अमित डबेरा, प्रमिला चव्हाण, जया चव्हाण आणि शारदा डबेरा (रा. वडगाव बुद्रुक, पुणे) हे रिक्षाने निघाले होती. पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी आलेली रिक्षा ही सासवड येथील शितोळे गॅरेजनजीक रस्त्याच्या कडेला पुलावरून पडली. जखमींना तातडीने खासगी सासवड येथील रुग्णालयात करण्यात आले.

## गुंडाळवाडी शाळा हॅकेथॉनमध्ये द्वितीय; सर्वत्र अभिनंदन !



**खेड :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण विभाग , जिल्हा परिषद शिक्षण विभाग, ॲमेझॉन फ्युचर इंजिनियर्स , लीडर शिप फॉर एकविटी, कोड टू इंहॅन्स लर्निंग यांच्या सौजन्याने अनप्लग्ड ॲक्टिव्हिटी आयोजित करण्यात आली होती.त्यात जिल्ह्यातील ४४६८ विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला.यात १० शिक्षकांची व ३० विद्यार्थ्यांची प्लग्ड ॲक्टिव्हिटीसाठी निवड झाली होती.

या ॲक्टिव्हिटीमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्याला निर्माण झालेली समस्या व त्यावरील उपाय यावर आधारित आपापले स्क्रॅच प्रोजेक्ट सादर केले. यात सिद्धी संजय शिंदे, दिशा संजय जैद, अमृता मुरलीधर भोर या गुंडाळवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी १० शाळांमधून द्वितीय क्रमांक मिळविला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पदवीधर शिक्षिका सुरेखा ठोके (निकुंभ) व मुख्याध्यापक मिरा मिंडे यांनी मार्गदर्शन केले.

प्रकल्प निवड करणाऱ्या मूल्यांकन समितीचे सदस्य डायट संस्थेचे प्राचार्य महेश शेंडकर , कोड टू इंहांस लर्निंगचे मुख्याधिकारी इरफान लालानी, एलएफईचे सीनिअर मॅनेजर तुषार झा यांच्या हस्ते शाळेला १ स्मार्ट टीव्ही, तीन टॅब, एक अलेक्सा मॉडेल फिजीकल किट, प्रमाणपत्र, मेडल, दोन संदर्भ पुस्तके व ५०० रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

# एकरात १०९ टन ऊस



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** माळेगाव बुद्रुक येथील ऊस उत्पादक शेतकरी विजय निवृत्ती तावरे यांनी एक एकर क्षेत्रामध्ये उसाचे तब्बल १०९ टन उत्पादन घेतले. हा परिसरातील उच्चांक आहे. तावरे यांना एकरी १०९ टनाचे उत्पादन मिळाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रयोगशील शेती केली तर शेती तोट्यात जात नाही, हेच तावरे यांनी सिद्ध केले आहे. त्यांनी आपल्या शेतात उसाचे उत्पादन घेतले आहे. हा ऊस ५४ ते ५५ कांड्यांचा आहे. काही उसाला तब्बल ५८ कांड्या आहेत. एकरी १०९ टन उसाचे उत्पन्न त्यांनी घेतले आहे. त्यांनी ४० गुंठ्यांत १०९ टन उसाचे उत्पादन घेतले आहे. ते ५४ ते ५५ कांड्यांचा ऊस असून त्याची उंची ४० ते -४२ फुटांहून अधिक आहे.

माळेगाव बुद्रुक येथील गट नंबर ६४१ या क्षेत्रात विजय तावरे यांनी १५ जुलै २०२३ रोजी फुले २६५ या जातीच्या उसाची लागवड केली. यासाठी त्यांनी चार फुटी पट्टा पद्धत अशी सरी सोडली होती. शेणखतावर भर दिला. माळेगाव बुद्रुक येथील अजित कोंढाळकर आणि प्रवीण चव्हाण यांच्या नर्मदा ॲग्रोटेक कंपनीच्या मार्गदर्शनाखाली नर्मदा मॅग्नेशियम सल्फे, नर्मदा फेरस सल्फेट, नर्मदा झिंक सल्फेट, नर्मदा रूट झाईम+ व नर्मदा निम संपत्ती व विद्राव्य खतांचा वापर केला. ड्रीपचा वापर केला होता. त्यामुळे पाणी पुरसे दिले गेले. नर्मदा ॲग्रोटेक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्राव्य खताची योग्य मात्रा उसाला देता आली. वेळेवर पाणी, उत्तम मेहनत व नियोजन यामुळे १८ महिन्यांतच या उसाची मोठ्या पेऱ्यांसह लांबलचक ५४ कांड्यांपर्यंत वाढ झाली.

ऊस उत्पादनातून त्यांना चालू बाजारभावानुसार जवळपास एकरी ३.५० लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. या यशाबद्दल माळेगाव सहकारी साखर कारखान्याची चेअरमन ॲड. केशवराव जगताप, व्हाईस चेअरमन तानाजीराव देवकाते, कार्यकारी संचालक अशोक पाटील, शेतकी अधिकारी सुरेश काळे, शेतकरी, सभासदांनी विजय तावरे व त्यांच्या कुटुंबाचे कौतुक केले आहे

## कारेगावात युवकाची आत्महत्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कारेगाव येथील करडे रोड लगत राहणारे सोनोने कुटुंब निघोज येथे देवदर्शनासाठी चाललेले असताना त्यांनी संकेत सोनोने यास देवदर्शनाला चल असे म्हटले असता, संकेत याने मी कामाला जाऊन नंतर येतो असे म्हणून घरीच थांबला. त्यानंतर सायंकाळी सोनोने कुटुंब पुन्हा घरी आले असता, त्यांना घरात संकेत याने गळफास घेतल्याचे दिसून आले. सदर घटनेत संकेत एकनाथ सोनोने (वय २१, रा. करडे रोड, कारेगाव ता. शिरुर) याचा मृत्यू झाला असून, याबाबत पांडुरंग रमेश सोनोने यांनी याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे खबर दिली आहे.

# साहेबराव बुट्टेपाटील स्मृतिदिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, माजी आमदार स्व साहेबराव बुट्टे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (दि ३) विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनाचे उदघाटन राष्ट्रवादी पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

पुरोगामी महाराष्ट्र आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी विज्ञानाधिष्ठित तरुणाई घडवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांनी प्रयोगांमागील भूमिका जाणून घेतली. विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन समृद्ध होतो असे त्या म्हणाल्या.

या विज्ञान प्रदर्शनात ११६ प्रयोग मांडण्यात आले. या प्रदर्शनाचा २ हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. स्मृतिदिन कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रीडाज्योत, एनसीसी



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ॲड. राजमाला बुट्टेपाटील .

पथकाकडून मानवंदना, सर्वधर्मीय प्रार्थना, पुस्तक प्रदर्शन, सरस्वती पूत्र या भीत्तिपत्रकाचे अनावरण, हस्ताक्षर स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी आमदार बाबाजी काळे, ज्येष्ठ विधिज्ञ सर्जेराव पानसरे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, डॉ. प्रकाश चौधरी, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ.एच. एम.जरे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सर्जेराव पानसरे यांनी साहेबराव बुट्टे पाटील यांच्या जीवन कर्तृत्वाची माहिती दिली. काजल वाळुंज, दिव्या पिंगळे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. प्रा. नंदकुमार गायकवाड यांनी विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन केले. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक अरूण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुरेश सावंत, ममता राठोड सहभागी झाले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले.

## सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी



**सासवड :** वसंतदादा पाटील प्रतिष्ठानच्या गुरुवर्य नारायण महाराज माध्यमिक विद्यालय हिवरे येथे थोर समाजसेविका महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी जालींदर कामठे अध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र भाजपा, शब्बीर भाई शेख माजी अध्यक्ष तंटामुक्ती हिवरे, शंकर नाना कुदळे माजी पोलीस पाटील हिवरे, रमेश शेठ कुदळे माजी उपसरपंच हिवरे, मुख्याध्यापिका सुनीता रायुडू, रोहिणी गायकवाड, चंद्रशेखर गुरव, दत्तात्रय गायकवाड, विकास भोसले, संदीप चाचर, वैशाली पवार, मेघा गायकवाड, स्वाती बोरकर, स्मिता बोराटे आदी उपस्थित होते.

## कंपनीतील लोखंडी प्लेटांची चोरी

**शिक्रापूर :** कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील पिनेकल मोबिलिटी सोल्युशन प्रायवेट लिमिटेड कंपनीमध्ये कंपनीसाठी लागणाऱ्या लोखंडी प्लेटा ठेवलेल्या होत्या. कंपनीतील कामगार सदर प्लेटा घेण्यासाठी गेले असता त्यांना कंपनीमध्ये प्लेटा मिळून आल्या नसल्याने त्यांनी कंपनी व्यवस्थापकांना याबाबत माहिती दिली असता, त्यांनी कंपनीत पाहणी केली, तेव्हा कंपनीतील लोखंडी प्लेटा अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याचे समोर आले. याबाबत सतीश विद्याप्रसाद पांडे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल केला आहे.

# आळंदीत राज्यस्तरीय शिवबाल, किशोर व युवा साहित्य संमेलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

सामाजिक

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर महाराज ७५० व्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव व आदिशक्ती संत मुक्ताई यांच्या ७४५ व्या जन्मोत्सवानिमित्त,आळंदीमध्ये तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन होत आहे. याच निमित्ताने आळंदी येथे बुधवारी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई व शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर, जळगाव,यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज ७५० व्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव व आदिशक्ती संत मुक्ताई यांच्या ७४५ व्या जन्मोत्सवानिमित्त, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई व शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आणि श्री ज्ञानेश्वर चरित्र



समिती व श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, आळंदी देवाची यांच्या सहकार्याने शनिवारी ( दि. ४) सकाळी आठ ते रात्री दहा या वेळेत एक दिवशीय तिसरे राज्यस्तरीय शिवबाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन आळंदी येथील मोरया मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती संमेलन स्वागताध्यक्ष सुरेंद्र हेरकळ, उजैनकर फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवशरण उजैनकर यांनी दिली.

या संमेलनाचे उद्घाटन साहित्यिक सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते होत आहे. संमेलनास ह. भ. प. मारुती महाराज कुरेकर, व डॉ. नारायण महाराज जाधव यांचे आशीर्वाद लाभणार आहेत. संमेलनाध्यक्षपदी प्रा. सुमतीताई पवार या आहेत. या संमेलनाच्या कार्यकारणीत फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती अध्यक्ष संमेलन संयोजक प्रकाश काळे, अजित वडगावकर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संमेलन कार्याध्यक्ष सुरेश वडगावकर, सहकार्याध्यक्ष रामचंद्र कुऱ्हाडे पाटील, निमंत्रक पदी रूपालीताई चिंचोलीकर, सहनिमंत्रकपदी डॉ. ज्ञानेश्वर पाटील, स्वागताध्यक्षपदी प्रा. डॉ. सुरेंद्र हेरकळ, प्रसिद्धी प्रमुख व कार्यवाह



अर्जुन मेदनकर आदी पदाधिकारी कार्यरत आहेत. संमेलनात आधिशक्ती संत मुक्ताई कडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांना ७५० व्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सवी वर्ष निमित्त ७५० फूट लांब व ७५ किलो वजनाची (जगातील सर्वात वजनदार) राखी बांधून या संमेलनाचे त्यानंतर उद्घाटन ४ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता ग्रंथ दिंडी माऊली मंदिर परिसरामध्ये निघणार आहे. या राखीमध्ये २१ किलो टाळ, २१ किलो रुद्राक्ष, ११ किलो चिपळ्या, ५ किलो तुलसीमाळ, ११ किलो कापड रेशीमदोरा, माउलीचे नाणे, ६ किलो प्रतीक चिन्ह वापरण्यात आली असल्याचे स्वागताध्यक्ष हेरकळ यांनी सांगितले.

जगातील सर्वात वजनदार राखी माईर्स, एमआयटी संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेज, आळंदी यांच्या तर्फे तयार करून सुपूर्द करण्यात येणार आहे. राखी एमआयटी संस्थेच्या महासचिव प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते माऊलींना अर्पण करून ग्रंथ दिंडी निघेल. या अनोख्या अध्यात्मिक साहित्य संमेलनात रक्षाबंधन सोहळ्यास संत निवृत्तीनाथ देवस्थान, संत सोपानकाका देवस्थान, संत तुकाराम देवस्थान, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे पदाधिकारी निमंत्रित आहेत. ज्ञानेश्वर शिक्षण संस्थाच्या श्री ज्ञानेश्वर शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांचे तर्फे ग्रंथ दिंडी आयोजित करण्यात आली आहे.

उद्घाटन सोहळ्यास सुरेश वारे, वारकरी शिक्षण संस्थेचे सचिव नाना महाराज चंदिले, आळंदी संस्थांचे प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप, मुख्याधिकारी कैलास केंद्रे, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त निरंजन योगी नाथसाहेन, डॉ. अजय कुमार लोळगे, विलास सिंदगीकर डॉ. राजेश गायकवाड ,डॉ. सतीश तराळ , डॉ. सुभाष बागल, सर्जेराव साळवे, जगन्नाथ बुदुखले उजैनकर फाऊंडेशनचे विविध पदाधिकारी, आळंदीकर नागरिक, पदाधिकारी, रसिक, काही, लेखक,साहित्यिक उपस्थित रहाणार असल्याचे अध्यक्ष शिवशरण उजैनकर यांनी सांगितले. विविध सत्रात संमेलन होत आहे. यात परिसंवाद, सांस्कृतिक साहित्यिक मेजवानी, कवी संमेलन आणि पुरस्कार वाटप देखील होणार असल्याचे त्यांनी सांगितले. आभार अर्जुन मेदनकर यांनी मानले.

# वजन काट्यात हेरफार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसीतील एका कंपनीमध्ये अनधिकृतपणे प्रवेश करून कंपनीतील वजन काट्यामध्ये बनावट इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस बसवून फेरफार करणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यासंदर्भात रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेजेल प्रोजेक्ट लिमिटेड या कंपनीमध्ये अनधिकृतपणे प्रवेश करून कंपनीतील वजन काट्यामध्ये फेरफार करण्याच्या उद्देशाने वजन काटा ऑफिसमधील डिस्प्ले स्क्रीनला रिमोटद्वारे ऑपरेट होणारे बनावट इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस बसविताना मिळून आले आहेत. बनावट इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस हे त्यांनी कंपनीचे डिसेंबर २०२४ मधील स्क्रॅपचे कॉन्ट्रॅक्ट घेतलेले सोनाक्षी इंटरप्राईजेस अहमदाबाद, गुजरातचे रोहित पटानी (रा. गुजरात) यांच्या सांगण्यावरून आरोपींनी हे काम केले.कंपनीमधून बाहेर पडणाऱ्या स्क्रॅपचे वजन हे डिस्प्ले स्क्रीनमध्ये फेरफार करून वजन कमी दाखवून सोनाक्षी एंटरप्राईजेसचा आर्थिक फायदा व्हावा यासाठी आरोपी सौरभ सतीश यादव (वय २३, रा. वाडेगव्हाण ता. पारनेर जि. अहिल्यानगर), सुमंत मंजुनाथ गौडा (वय २३, रा. हाऊसिंगीफारम तालुका जि. शिमोगा), रोहित पटाने रा. गुजरात. (पाहिजे आरोपी) यांनी हे फेरफार केले.



त्यावेळी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी सौरभ व सुमंत या दोन आरोपींना अटक केली आहे. याप्रकरणी रघुनाथ विद्याधर (वय ५५, रा. गिरीकुंज हाउसिंग सोसायटी, तुळशीबाग वाले कॉलनी सहकारनगर, पर्वती) यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम कलमांद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पोलीस उप अधीक्षक प्रशांत ढोले, रांजणगाव एमआयडीसी पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तात्रय शिंदे, अभिमान कोळेकर, विलास आंबेकर, प्रविण पिठले, राजू ढगे, विलास सरजिने यांनी केली असून पुढील तपास सहाय्यक फौजदार दत्तात्रय शिंदे करत आहेत.

## मी परत उभारी घेईन, जिथं चुकले ते दुरुस्त करेन

# अपयश पचवण्याची हिम्मत आहे : दिलीप मोहिते पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** मी हरलेलो नाही, मी पुन्हा ताठ मानेने उभा राहील, राजकारणातील यश आणि अपयश हे पचवण्याची हिम्मत दिलीप मोहितेंमध्ये आहे. मी परत उभारी घेईन. जिथं चुकले ते दुरुस्त करील, असे प्रतिपादन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी राजगुरुनगर येथे मंगळवारी (दि ३१) नागरिकांना व कार्यकर्त्यांना दिला. सरत्या २०२४ ला निरोप आणि २०२५ चे स्वागत करण्यासाठी राजगुरूनगर शहरात माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून बालजत्रा



व खाऊ गल्ली जत्रेचे आयोजन करण्यात आले होते. या जत्रेचे उद्घाटन केल्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना मोहिते पाटील बोलत होते.

जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य सुरेखाताई मोहिते पाटील, अनिलबाबा राक्षे, जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, मंगलताई चांभारे, तहसिलदार ज्योती देवरे, भाजप चे तालुका अध्यक्ष शांताराम भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका युवक अध्यक्ष वैभव घुमटकर, शहराध्यक्ष सागर सातकर, विद्यार्थी संघटनेचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संतोष भांगे, पप्पू बनसोडे, हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशन चे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, माजी अध्यक्ष ॲड मनिषा टाकळकर,ॲड सुनील वाळुंज, बाजार समितीचे माजी उपसभापती विठ्ठल वनघरे यांच्यासह मोठ्या संख्येने शहरातील नागरिक, महिला, मुले उपस्थित होते.

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील म्हणाले, नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपल्याला अपयश आले. अनेक कार्यकर्त्यांच्या मनात काही भावना होत्या. असे कार्यक्रम होतील कि नाही याबाबत शंका होत्या. मात्र जेजे आपण करणार आहोत ते नक्की केले जाणार आहे. असा कार्यकर्त्यांना शब्द देत दिलीप मोहिते पाटील पुढे म्हणाले, राजकारणातील यश आणि अपयश हे पचवण्याची हिम्मत दिलीप मोहिते यांच्यात आहे. मी परत उभारी घेईन. जिथं चुकले ते दुरुस्त करील. खंत एकच आहे, तालुक्याला मंत्री पदाची संधी होती. ७५ वर्षांनी मंत्रिपदाची तालुक्याला संधी मिळणार होती. त्यातून तालुक्याचा अधिकचा विकास करता आला असता. ज्यावेळी सत्तेतपासून तालुका दूर राहतो त्यावेळी १० वर्षे आपण मागे जातो. माझ्या मनात अनेक कल्पना होत्या, कार्यकर्त्यांच्या संकल्पना होत्या, मात्र त्या कल्पना साकार करण्याची संधी आपण गमावली अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात वन संरक्षणासाठी काम करणाऱ्या राजगुरुनगर येथील सपना राठोड याना विशेष पुरस्कार देऊन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. राजगुरुनगर मध्ये नुकतीच दोन लहान चिमुकल्या मुलींवर अत्याचार करून त्यांची हत्या झाली. त्या दोन्ही चिमुकल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव घुमटकर यांनी केले. सूत्रसंचालन योगिता पाचारणे यांनी केले.

#रा

# अनोखी नृत्यपरंपरा

छोट्यांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? तुम्ही वाढदिवसाच्या पार्टीत किंवा गणपती उत्सवात थिरकत असाल. नृत्याचेही विविध प्रकार आहेत. भारतातले कथक, भरतनाट्यम, मोहिनीअट्टमसारखे शास्त्रीय नृत्यप्रकार जगभरात प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे विविध देशांमध्ये अनोखी नृत्य सादर केली जातात. अशाच काही नृत्यप्रकारांवर नजर टाकू या.

✻ ब्राझील हा फुटबॉलप्रेमी देश. पण इथे नृत्यांचीही अनोखी परंपरा पहायला मिळते. 'कॅपोइरा' हा या देशातला भन्नाट नृत्यप्रकार आहे. नृत्य आणि मार्शल आर्ट यांच्या मिश्रणातून हा डान्स तयार झाला आहे. समूहात किंवा एकट्यानेही हे नृत्य करता येतं.



रंजक

✻ स्पेनमध्ये 'फंडान्गो' नावाचं नृत्य केलं जातं. या नृत्याचा उगम स्पेनमध्ये झाला असला तरी ते या देशाचा शेजारी पोर्तुगालमध्ये खूप लोकप्रिय झालं. या नृत्यप्रकारात वेगवान हालचाली कराव्या लागतात. पावलं जमिनीवर आपटत नाचावं लागतं.

✻ 'यांग्को' हा चीनमधला पारंपरिक नृत्यप्रकार आहे. या नृत्याला एक हजार वर्षांची परंपरा असून विशिष्ट तालात शारीरिक हालचाली कराव्या लागतात.


✻ 'कैबुकी' हा जपानमधला नृत्यप्रकार. यातल्या कलाकारांना विशिष्ट मेक अप केला जातो. या नृत्यात खास वेशभूषाही केली जाते.

✻ कंबोडियात 'सेलिस्टिअल' हा नृत्यप्रकार खूप प्रसिद्ध आहे. यात नृत्याच्या माध्यमातून पौराणिक कथांचं सादरीकरण होतं. यातले कलाकार खूप आकर्षक वेशभूषा करतात.

# समुद्रकिनाऱ्यांनी नटलेला 'गांबिया'

सफर देशांची

'गांबिया' या उत्तर-पश्चिम आफ्रिकेतल्या देशाच्या सीमा सेनेगलशी जोडलेल्या आहेत. गांबिया हा आफ्रिका खंडातल्या सर्वात लहान देशांपैकी एक. या देशात फार कमी प्रमाणात धान्य पिकवलं जातं. शेंगदाणे हे इथलं महत्त्वाचं पीक. गांबिया हा शेंगदाण्याची निर्यात करणारा प्रमुख देश आहे. १९६५ मध्ये गांबिया स्वतंत्र झाला. या देशावर ब्रिटिशांचं राज्य होतं. 'बँजूल' ही या देशाची राजधानी. 'सेरेकुंदा' आणि 'ब्रिकामा' ही इथली प्रमुख शहरं. ब्रिटिशांनी राज्य केल्यामुळे इंग्रजी ही गांबियाची प्रमुख भाषा बनली. इतरही काही भाषा इथे बोलल्या जातात.




गांबिया हा खूप छोटा आणि अरूंद असा देश आहे. इथून वाहणारी 'गांबिया' ही नदी आफ्रिका खंडातली प्रमुख नदी आहे. या देशात छोटी बेटंही आहेत. सुंदर समुद्रकिनारे हे गांबियातलं खास आकर्षण. या देशाला ८० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. इथले समुद्रकिनारे कमी गर्दीचे आणि स्वच्छ असतात. गांबियात येणारे पर्यटक या समुद्रकिनाऱ्यांना भेट दिल्याशिवाय जात नाहीत. गांबियामध्ये बरीच पर्यटन स्थळं आहेत. नैसर्गिक साधनसंपत्ती तसंच वन्यजीवांचं या देशात संरक्षण करण्यात आलं आहे. खास मगरींसाठी इथे स्वतंत्र तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. या देशातल्या दोन ठिकाणांना युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे.


# संधी रूरल मॅनेजमेंटमधल्या

कोण होणार?

आपल्या देशात ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र तिथे म्हणावा तितका विकास झालेला नाही. त्यामुळे तुम्ही रूरल मॅनेजमेंट करून ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न करू शकता. सध्या रूरल मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम बराच चर्चेत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सरकारही अनेक योजना राबवत असतं. गावांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे प्रयत्न होत असतात. रूरल मॅनेजमेंट करून तुम्ही या कामात मदत करू शकता.

रूरल मॅनेजमेंट हे खूप मोठं क्षेत्र आहे. ग्रामीण भागाचा विविध पातळीवर विकास होत असतो. त्यामुळे रूरल प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट, नॅचरल रिसोर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट, रूरल मार्केटिंग अँड मॅनेजमेंट, रूरल कम्युनिटिज फॅसिलिटी अँड सर्व्हिसेस, सोशल सिक्युरिटी अँड प्रॉब्लेम्स, पॉलिसीज अँड प्रोग्राम अशा रूरल मॅनेजमेंटच्या विविध शाखा आहेत. तुम्ही तुमच्या आवडीनुसार अभ्यासक्रमाची निवड करू शकता. बारावीनंतर रूरल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा करता येईल. सहा महिने तसंच एक वर्षाचा हा अभ्यासक्रम असतो. या विषयात पदवीही मिळवता येईल. पुढे पीएचडी करण्याचीही संधी आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेल्स अँड बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर, बिझनेस डेव्हलपमेंट एक्सिक्युटिव्ह, सेल्स ऑफिसर अशा पदांवर काम करता येईल. विविध सरकारी संस्थांमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. ग्रामीण भागात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थाही रूरल मॅनेजर्सच्या शोधात असतात.





# प्लास्टिक बाटलीचं बनवा फूल

करून तर पहा

घराबाहेर पडल्यावर शुद्ध पाणी मिळणं अवघड असतं. अशा वेळी कुठलंही पाणी पिण्याचा धोका न पत्करता बाटलीबंद पाणी विकत घेतलं जातं. पण मित्रांनो, तुम्हाला माहीत आहे, प्लास्टिक बाटल्यांच्या या कचऱ्यामुळे पर्यावरणविषयक मोठ्यासमस्या जन्म घेतात. म्हणूनच या बाटल्याटाकून न देता त्यांचा वापर करायला हवा. चला तर, आज प्लास्टिकच्या बाटल्यांपासून छानशी कलाकृती कशी साकारायची ते पाहू.

**साहित्य** : प्लास्टिकची बाटली, गम, कात्री, माती किंवा वाळू, गोट्या किंवा गुळगुळीत दगड, स्ट्रॉ इत्यादी.

**कृती** : सर्वप्रथम बाटलीवरील लेबल आणि झाकणं काढा. पण ती टाकून देऊ नका. आता ती मधोमध कापा. अर्धा भाग ठेऊन द्या. बाटलीच्या वरच्या अर्ध्या भागावर एक इंच रूंदीच्या चिरा द्या. साधारण आठ पाकळ्या होतील अशा पद्धतीने बाटली कापा. या पाकळ्या बाहेरच्या बाजूने वाकवा. बाटलीचं झाकण लावा. आता या झाकणात आतल्या बाजूला पांढरा गम लावा. यात स्ट्रॉ अडकवा. बाटलीचं झाकण घट्ट बंद करा. त्यावर लेबल गुंडाळता येईल. यामुळे स्ट्रॉ स्थिर राहील. आता बाटलीचा उरलेला अर्धा भाग घ्या. त्यात माती किंवा वाळू भरा. साधारण दीड ते दोन इंचांपर्यंत वाळू भरा. आता स्ट्रॉचा खालचा भाग या वाळूत रुतवा. वर दगड किंवा गोट्या ठेवा. यामुळे स्ट्रॉ हलणार नाही. पाकळ्या सजवण्यासाठी रंगांचा किंवा गिफ्ट पेपरचा वापर करता येईल. कात्रीने कापून पाकळ्यांना गोल आकार देता येईल. कल्पनाशक्तीला वाव देऊन पाकळ्यांना वेगवेगळे आकारही देता येतील. या पाकळ्या मनपसंत रंगात रंगवता येतील.



दोस्त हे मस्त

## सर्वात छोटा सरडा

'ब्रुकेशिया मायक्रा' नावाचा एक सरडा आहे. अवघ्या ३० मिलीमीटर लांबीचा मायक्रा जगातला सर्वात लहान सरडा आहे. मादागास्कारमधल्या एका छोट्याशा बेटावर शास्त्रज्ञांना हा सरडा सापडला. या सरड्याचे नर आणि मादी फक्त ३० मिलीमीटरपर्यंत वाढतात. हे छोटेसे सरडे तुमच्या मुठीतही आरामात सामावतील.



दोस्त हे मस्त

## कोकनट क्रॅबविषयी...

दोस्तांनो, खेकड्याच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. त्यापैकी एक म्हणजे कोकोनट क्रॅब. हा खेकडा पॅसिफिक बेटांवर आढळतो. त्याचं दिसणं आणि खाणं-पिणं यावरून त्याला कोकोनट क्रॅब म्हटलं जातं. कोकनट क्रॅबची त्वचा राखाडी आणि हिरव्या रंगाची असते. खोबरं खाण्यासाठी तो नारळाच्या झाडावर चढतो. हे खेकडे दिवसा झोपतात आणि रात्री जागतात.



लाईफस्टाईल

## यांनाही असते एक्सपायरी डेट


अन्नपदार्थ, औषधं, मेकअप प्रोडक्ट्स आदींची एक्सपायरी डेट असते. म्हणजे विशिष्ट काळानंतर ही उत्पादनं वापरायोग्य रहात नाहीत. पण नॅपकिन टॉवेलसारख्या वस्तू आपण वर्षानुवर्षं वापरतो. हे चुकीचं आहे. लक्षात ठेवा, टूथब्रश दर तीन महिन्यांनी बदलायचा असतो. कंगवा एक वर्षापेक्षा जास्त वापरायचा नसतो. टॉवेलमध्ये बॅक्टेरियांची वाढ होते. त्यामुळे तो वारंवार धुवायला हवा. शिवाय तो कितीही चांगला असला अथवा डिझाईन तुम्हाला कितीही आवडत असलं तरी दर तीन वर्षांनी टॉवेल बदलायला हवा. आरोग्यासाठी हे नियम पाळायलाच हवेत.



योगा टाईम

## अशी आहे ज्ञानमुद्रा

मुलांनो, एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही ज्ञानमुद्रा करू शकता. यासाठी गुडघे दुमडून बसा. हाताचं पहिलं बोट आणि करंगळी जोडून 'ओ' सारखा आकार करा आणि डोळ्यांजवळ न्या. या गोलातून तुम्हाला बाहेर बघायचं आहे. ही मुद्रा नियमित केल्यामुळे अभ्यास करताना तुमचं मन एकाग्र होईल.



# वर्ष नवे संकल्प नवे

नवीन काही

काय मित्रांनो, नववर्षाची पार्टी कशी झाली? काय काय मजा केली या पार्टीत? नवीन वर्षाचे काही संकल्पही सोडले असतील. आपण दरवर्षी एखादे चांगले काम हाती घेण्याचं ठरवतो. पण काही दिवसांतच निग्रह गळून पडतात आणि आपण नेहमीच्या रुटीनमध्ये परततो. पण मित्रांनो, या वर्षीतरी असं वागायचं नाही. नवीन वर्षात पहिला संकल्प करु या तो व्यायामाचा. आपण शाळेत, क्लासमध्ये अभ्यास करतो, घरी असल्यावर टीव्ही बघतो, गेम्स खेळतो. पण या सगळ्यात व्यायाम करणं मात्र सोयीस्कर विसरतो. पण मित्रांनो, आरोग्य राखायचं असेल आणि शरीर बळकट बनवायचं असेल तर व्यायामाला पर्याय नाही. तेव्हा आपणही लवकर उठून जॉगिंगला जाऊ या, दोरीवरच्या उड्या मारू या, लोंबकाळण्याचा व्यायाम करु या, सूर्यनमस्कार घालू या आणि एखादा खेळही खेळू या. या सर्व गोष्टी आपल्याला शारीरिक स्वास्थ्य देतीलच त्याचबरोबर संयम शिकवतील आणि स्पर्धात्मक वातावरणात खंबीरपणे उभं राहण्यासाठी तयारही करतील. दुसरा संकल्प हवा डायरी लिहिण्याचा. आपण दुसऱ्यांशी बोलतो त्यापेक्षा जास्त स्वत:ची गप्पा मारतो. अनेक विषयांवर सखोल विचार करतो. आपल्या मनात काही शंका येतात. हे सगळे विचार डायरीत लिहून ठेवा आणि संबंधित व्यक्तीचे मार्गदर्शन घेऊन उत्तरं शोधा. यामुळेही ज्ञानात भर पडेल. सगळ्यांशी गोड बोलण्याचा आणि चांगलं वागण्याचा निश्चयही महत्त्वाचा आहे बरं... यामुळे तुम्हाला बरेच मित्र मिळतील आणि त्यांची मदतही मिळेल.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध सर्वात पहिल्यांदा लावणारा शास्त्रज्ञ कोण?
२) 'असोसिएटेड' प्रेस ही कोणत्या देशातली वृत्तसंस्था आहे?
३) 'नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्टस' कोणत्या शहरात आहे?
४) तिरूचिरापल्ली हे शहर कोणत्या नदीकिनारी आहे?
५) टायगर वूड्स कोणता खेळ खेळतो?
६) युनेस्कोची स्थापना कधी झाली?
७) भारताचं सर्वात जुनं निमलष्करी दल कोणतं?
८) शेक्सपिअरचा जन्म कोणत्या वर्षी झाला?
९) आसाममधला प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
१०) राजस्थानातलं 'झवार' कशासाठी प्रसिद्ध आहे?


उत्तर : १) कोपर्निकस २) अमेरिका ३) पतियाळा ४) कावेरी ५) गोल्फ ६) १९४५ ७) आसाम रायफल्स ८) १५६४ ९) बिहू १०) जस्ताच्या खाणी




# निळकंठाची निळाई

वेचक वेधक

आज आपण माहिती घेऊ या एका सुंदर पक्ष्याची. याचं नाव आहे निलकंठ. याला ब्लु जे किंवा इंडियन रोलर या नावानंही ओळखतात. निळकंठ उडताना तर खूपच छान दिसतो. उडताना पंखांमधली निळाई याचं रुप शतपटीनं आकर्षक बनवते. निलकंठाचा आकार कबुतराएवढा असतो. निळे पंख असल्यानं आणि कंठावरही निळी झाक असल्यानं याचं नाव पडलंय निळकंठ. याच्या पाठीवर आणि मानेवर हलका भूरा रंग असतो तर पोट आणि शेपटीपाशी पिवळसर निळा रंग असतो. उडताना पंखांमध्ये लपलेल्या या सगळ्या छटा समोर येतात. हा पक्षी एकटं राहणं जास्त पसंत करतो. संपूर्ण भारतात त्याचं वास्तव्य आढळतो. विशेषत: शहरं आणि गावांजवळच्या विरळ जंगलात हे पक्षी मोठ्या संख्येने आढळतात. या पक्ष्याचं अन्न म्हणजे मोठे किडे, पाली आणि बेडूक. शिकार दिसताच ते एकदम झडप घालतात आणि फांदीवर बसून एका झटक्यात गिळून टाकतात. कीटक हे मुख्य अन्न असल्यामुळे निलकंठ शेतकऱ्यांचा मित्र आहे. विविध प्रकारचे कीटक धान्याची नासधूस करतात हे आपण जाणतोच. ते दाणे फस्त करतात, पानं खातात. पण निलकंठासारखे पक्षी हे किडे खातात आणि त्यांची संख्या मर्यादीत राहून पिकांना संरक्षण मिळतं. मग काय मंडळी, आता बाहेर पडाल तेव्हा निलकंठ दिसतोय ते पहाणार का? तीव्र आवाजात कलकलाट करत उडणारा निळ्या पंखांचा निलकंठ मित्रांनाही अवश्य दाखवा.




ठिपके जुळवा




# करू या गणिताशी दोस्ती!

स्टडी टिप्स

मित्रांनो, परीक्षा अजून लांब आहेत म्हणून अभ्यासाला सुट्टी दिली नाहीत ना? नाहीतर शाळेत अभ्यासाचा ताण नसला म्हणून तुम्हीही अभ्यासाला सुट्टी दिली असे व्हायचे. पण हा आळस नंतर महागात पडतो ना! परीक्षा जवळ आल्यावर एकच धांदल उडते आणि पुरेसा अभ्यास न झाल्यामुळे परीक्षेत कमी गुण मिळतात. हे टाळण्यासाठी आत्तापासूनच थोडी थोडी तयारी करू या. आम्हाला माहितीये, तुमच्यापैकी अनेकांना गणिताचा अभ्यास करायला अजिबात आवडत नाही. त्यातील आकडेमोड आणि गुंतागुंत डोक्याला मुंग्या आणते. पण हा अभ्यास वाटतो तेवढा अवघड नाहीच मुळी. तुम्ही योग्य त्या पद्धतीनं गणिताचा अभ्यास केला तर आपोआप गणितं सुटत जातील आणि उत्तर मिळत जातील. यासाठी शिक्षक, मोठी भावंडं आणि मित्रांची मदत घ्या. तुम्हाला माहिती आहेच गणितातले सगळे टॉपिक्स आणि चॅप्टर्स एकमेकांशी संबंधित असतात. जर तुम्ही आधीचा धडा व्यवस्थित अभ्यासला नाही तर पुढचं काहीच कळणार नाही आणि गणिताप्रती अरुची वाढत जाईल. तेव्हा पहिली पायरी म्हणजे प्रत्येक धडा काळजीपूर्वक अभ्यासा. शाळेतल्या पुस्तकांव्यतिरिक्त सरावासाठी आणखी दोन-तीन पुस्तकांची मदत घ्या. गणित हा विषय लॉजिकवर अवलंबून आहे. इथे पाठांतराचा काही उपयोग नाही. पहिली स्टेप विसरली की पुढचं सगळंच गाडं गडगडणार. तेव्हा भरपूर गणितं सोडवा. सराव करताना आकडेमोड करण्यासाठी कॅल्क्युलेटर वापरु नका. त्याऐवजी वेगवान आकडेमोड करण्याच्या काही ट्रिक्स शिकून घ्या. अलिकडे या ट्रिक्स शिकवणारे क्लासेस सगळीकडे घेतले जातात. वैदिक मॅथ्समध्ये कितीही मोठ्या संख्यांचा गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी झटपट करण्याच्या टिप्स आहेत. पाढे पाठ केलेत तरी तुमचं बरचसं काम हलकं होईल. यासाठी घरामध्ये तक्ते लावून ठेवा. तुमचा सतत वावर असेल अशा ठिकाणी हे तक्ते असतील अशी खात्री करा. सतत त्यावर नजर फिरवा. शक्य तेवढं लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. मग बघा तुमचे गणितातले गुण वाढतात की नाही!





'रोहित शर्मा विचार करतोय की फलंदाजी चांगली होत नाहीये. फलंदाजाला कळून जाते की तो केव्हा लढू शकत नाहीये. त्यापेक्षा सोडून देणे चांगले, हेच रोहितने केले. रोहितने संघासाठीही विचार केला की शुभमन गिल चांगला खेळत आहे. — इरफान पठाण

सामना हरल्याचे दुःख खूप मोठे असते. बॅटरची कामगिरी सतत वर-खाली होत राहते, परंतु तुमच्या बाजूने नसलेले परिणाम सहन करणे अधिक वाईट वाटते. गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही क्षेत्रांत मिळालेल्या संधींचा फायदा करून घेतला पाहिजे. — रोहित शर्मा



# भारत गंभीर परिस्थितीत

## भारत १८५ वर सर्वबाद : ऋषभ पंतच्या सर्वाधिक ४० धावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सिडनी :** भारतीय क्रिकेट संघासाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यात सुरुवातीपासून फलंदाजांच्या कामगिरीत सातत्य नसणे ही कमजोरी दिसून आली आहे. हेच चित्र सिडनीमध्ये होत असलेल्या पाचव्या आणि मालिकेतील अखेरच्या कसोटी सामन्यातही दिसून आले आहे. भारताने नियमित अंतराने विकेट्स गमावल्या. भारतीय संघाने या सामन्यात पहिल्या डावात ७२.२ षटकात सर्वबाद १८५ धावा केल्या आहेत. त्यामुळे आता ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या डावातील फलंदाजीसाठी उतरेल.

भारताकडून प्रमुख फलंदाज मोठ्या धावा करण्यात अपयशी ठरलेले असताना अखेरीस कर्णधर जसप्रीत बुमराहने १० व्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत २२ धावांची खेळी केली. विशेष म्हणजे सध्या चालू मालिकेत भारताकडून कर्णधाराने एका डावात केलेली ही सर्वोच्च धावांची खेळी ठरली.

या सामन्यात भारताचा रोहित शर्माने न खेळण्याचा निर्णय घेतल्याने जसप्रीत बुमराह नेतृत्वाची जबाबदारी सांभाळत आहे. त्याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी नियमित अंतराने भारतीय फलंदाजांना चूका करण्यास भाग पाडले.

केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांची सलामी जोडी पहिल्या डावात काही विशेष करू शकली नाही. केएल राहुलला ४ धावांवर मिचेल स्टार्कने बाद केले, तर जैस्वालला १० धावांवर स्कॉट बोलंडने माघारी धाडले.

यानंतर शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी ४० धावांची भागीदारी करत संघाचा डाव पुढे नेलेला. परंतु, गिलला लंचब्रेकपूर्वी नॅथन लायनने बाद केले. दुसऱ्या सत्रात विराट कोहलीने ऋषभ पंतला साथीला घेतले होते.

पण विराटही पुन्हा एकदा त्याचा मोह आवरू शकला नाही आणि बाहेर जाणाऱ्या चेंडूवर शॉट खेळण्याच्या प्रयत्नात बियू वेबस्टरकडे १७ धावांवर झेल देत बाद झाला. त्यानंतर पंत आणि रवींद्र जडेजा यांनी खूप संयमी खेळ केला. त्यांनी टी ब्रेकपर्यंत विकेट जाऊ दिली नव्हती. तिसऱ्या सत्रातही त्यांनी चांगली सुरूवात केली. पण त्यांची भागीदारी बोलंडनेच तोडली. त्याने ऋषभ पंतला ४० धावांवर बाद केले.

### स्मिथ म्हणतो कॅच घेतलेला, अम्पायरने विराटला दिले नाबाद

- विराट कोहली चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला. पण बोलंडने या षटकातील टाकलेला पाचवा चेंडू विराटच्या बॅटला लागून मागे गेला. स्मिथने चांगले क्षेत्ररक्षण करताना जमिनीलगत तो चेंडू पकडला देखील.
- मात्र मैदानावरील पंचांनी हा निर्णय थर्ड अम्पायरवर सोपवला. थर्ड अम्पायर जोएल विल्सन यांनी बराचवेळ रिप्ले पाहिले, वेगवेगळ्या अँगलने रिप्ले पाहिल्यानंतर त्यांना चेंडूचा स्पर्श जमिनीला झाल्याचे जाणवले. त्यामुळे त्यांनी विराटला नाबाद दिले. त्यामुळे विराटला पहिल्याच चेंडूवर जीवदान मिळाले. मात्र, या निर्णयावर स्टीव्ह स्मिथ निराश दिसला, त्याने असेही म्हटले की त्याची बोटं चेंडूच्या खाली होती आणि हा योग्य झेल होता.

### घोटाळ्याप्रकरणी शुभमन गिलला सीआयडी चे समन्स

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचे दिग्गज खेळाडू एका मोठ्या घोटाळ्याच्या चौकशीत अडकले आहेत. गुजरात सीआयडीने ४५० कोटी रुपयांच्या चिटफंड घोटाळ्याप्रकरणी भारतीय क्रिकेटपटू शुभमन गिल, राहुल तेवतिया, मोहित शर्मा आणि बी साई सुदर्शन यांना समन्स बजावले आहे. अहमदाबाद मिररच्या रिपोर्टनुसार, आयपीएल टीम गुजरात टायटन्सचा कर्णधार गिल याने या योजनेत १.९५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती, तर इतर खेळाडूंनीही अल्प प्रमाणात गुंतवणूक केली होती. मात्र या खेळाडूंनी गुंतवलेले पैसे परत मिळाले नसल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी योजनेचा मास्टरमाइंड भूपेंद्र सिंग जाला याची चौकशी केली. आता पुढे क्रिकेटपटूंची चौकशी होणार असल्याचे समोर आले आहे.

बीझेड ग्रुपने गुंतवणूकदारांना बँकांपेक्षा जास्त व्याजदर देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, तसे न झाल्याने गुंतवणूकदारांनी पोलिसांत तक्रार केली. अहमदाबाद मिररच्या रिपोर्टनुसार, गुजरात टायटन्सच्या खेळाडूंनीही पॉन्झी स्कीममध्ये पैसे गुंतवले आहेत.

## किवींनी मालिका २-१ ने जिंकली, कुसल परेराचे शतक




**नेल्सन :** श्रीलंकेने न्यूझीलंडविरुद्धच्या ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात ७ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला आहे. या विजयासह श्रीलंकेच्या संघाने क्लीन स्वीपपासून स्वत:ला वाचवले आहे. तथापि, चरित असलंकाच्या नेतृत्वाखालील संघाने मालिका २-१ ने गमावली आहे. गुरुवारी नेल्सनमध्ये न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. श्रीलंकेने २० षटकांत ५ विकेट गमावत २१८ धावा केल्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संघ २० षटकांत ७ गडी गमावून २११ धावाच करू शकला. कुसल परेरा सामनावीर ठरला. त्याने ४६ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. तर जेकब डफीला प्लेअर ऑफ द सिरीज म्हणून निवडण्यात आले. डफीने ८ विकेट घेतल्या आहेत. श्रीलंकेची खराब सुरुवात, पॉवरप्लेमध्ये २ गडी गमावले नाणेफेक हरल्यानंतर फलंदाजीला आलेल्या श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. पॉवरप्लेच्या ६ षटकात ४९ धावा करताना संघाने २ विकेट गमावल्या होत्या.

## श्रेयस अय्यरचे शतक, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ठोकली दावेदारी

**नवी दिल्ली :** कसोटीत भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा फॉर्माशी झगडत असताना दुसरीकडे ट्वेंटी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवही संघर्ष करतोय. मुंबई विरुद्ध पुद्दुचेरी या विजय हजारे ट्रॉफीच्या सामन्यात सूर्या गोल्डन डकवर माघारी परतला. पण, कर्णधार श्रेयस अय्यरने ( Shreyas Iyer) शतकी खेळी करून मुंबईला सावरले. श्रेयसचे हे या हंगामातील दुसरे शतक आहे आणि चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ तून टीम इंडियात पुनरागमनासाठी प्रयत्नशील आहे. प्रथम फलंदाजीला आलेल्या मुंबईला पुद्दुचेरीच्या सागर उदेशी व गौरव यादव या गोलंदाजांनी सुरुवातीला धक्के दिले. अंगकृष रघुवंशीला गोल्डन डकवर माघारी जावे लागले, तर आयुष म्हात्रे १ धाव करून माघारी परतला. मागील सामन्यात आयुषने विक्रमी शतक झळकावताना यशस्वी जैस्वालचा विक्रम मोडला होता. सिद्धेश लाड ( ३४) व हार्दिक तामोरे ( ११) यांनी काही काळ किल्ला लढवला, परंतु अंकित शर्मा व यादव यांनी त्यांना बाद केले. सूर्यकुमार आला तसा माघारी परतला. अंकितने त्याला पहिल्याच चेंडूवर झेलबाद केले. सूर्या सलग दुसऱ्या सामन्यात शून्यावर बाद झाला. त्यानंतर श्रेयस अय्यरने एकहाती खिंड लढवली. त्याला अथर्व अंकोलेकरची साथ मिळाली. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी जवळपास ८० धावा जोडल्या. अथर्व ४७ चेंडूंत २ चौकार व ३ षटकारांसह ४३ धावांवर माघारी परतला. सूर्यांश शेडगे ( १०) व शार्दूल ठाकूर ( १६) आज फेल गेले.



'पीडीएफए लीग' फुटबॉल स्पर्धा !

## सिटी एफसी पुणे, दुर्गा एफसी संघांची विजयी कामगिरी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने (पीडीएफए) तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात सिटी एफसी पुणे आणि दुर्गा एफसी या संघांनी अनुक्रमे एफसी शिवनेरी आणि लिजंड्स युनायटेड या संघांचा पराभव केला.

कात्रज येथील भारती विद्यापीठच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सिटी एफसी पुणे संघाने एफसी शिवनेरीचा ६-० असा सहज धुव्वा उडविला. सामन्यामध्ये सात्विक नायक याने गोलांची हॅट्रीक साधली. सात्विक याने ३१ व्या, ३३ व्या आणि ३७ व्या मिनिटाला गोल करून संघाकडून तीन गोल नोंदविले. यासह रायथम मालविया, ललित पाटील आणि अर्थव रेवाळकर यांनी प्रत्येकी एकेक गोल करून संघाची आघाडी ६-० अशी वाढवली.



दुसऱ्या सामन्यामध्ये दुर्गा एफसी संघाने लिजंड्स युनायटेड संघाचा ३-० असा सहज पराभव केला. या सामन्यात मयुर वाघिरे याने सलग तीन गोल नोंदवून हॅट्रीक साधली. साई एफए आणि खडकी ब्ल्युज् यांच्यातील तिसरा सामना १-१ अशी बरोबरी समाप्त झाला. साई संघाकडून हर्ष परीहार याने चौथ्या मिनिटाला गोल करून १-० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात खडकी ब्ल्युज्कडून अर्थव कौसाळकर याने ५० व्या मिनिटाला गोल करून बरोबरी साधली.

### विराट कोहलीचा लाजिरवाणा विक्रम!

**सिडनी :** टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीसाठी २०२४ हे वर्ष खूप वाईट होते. वर्षभर तो आपल्या खराब फॉर्मशी झुंजत राहिला. २०२५ मध्ये विराट चांगली सुरुवात करेल अशी चाहत्यांना आशा होती, पण जुन्या कमकुवतपणामुळे नवीन वर्षातही त्याने विकेट गमावली. सिडनीमध्ये खेळल्या जात असलेल्या शेवटच्या कसोटीत विराट ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर आऊट झाला आणि यासोबतच त्याने एक लज्जास्पद विक्रमही नोंदवला. विराटची ही खेळी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील एकही चौकार नसलेली सर्वात मोठी खेळी ठरली आहे.

सिडनी कसोटीत विराट कोहलीने ६९ चेंडूंचा सामना करत केवळ १७ धावा केल्या. ६९ चेंडूत विराटने एकही चौकार मारला नाही आणि एकही षटकार त्याच्या बॅटमधून आला नाही. ही खेळी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील एकही चौकार नसलेली सर्वात मोठी खेळी ठरली. यापूर्वी २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध ४८ चेंडू खेळताना विराटने एकही चौकार मारला नव्हता.

युबीएस संघाचा सुपर ओव्हरमध्ये विजय

## ऑरस संघाची विजयी सलामी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टीआरपीएस मॅनेजमेंट, अतुल ट्युटोरीयल्स् आणि लायन्स् क्लब पुणे रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तर्फे पहिल्या 'टीआरपीएस कॉर्पोरेट करंडक' टी-२० क्रिकेट स्पर्धेत युबीएस संघाने एस.एस.अँड सी. संघाचा सुपरओव्हरमध्ये रोमहर्षक पराभव करून स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला. ऑरस संघाने आपल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून विजयी सलामी दिली.

हिंजेवाडी येथील फोरस्टार मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये पहिल्यांदा खेळणाऱ्या युबीएस संघाने १२७ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये संदीप देओल याने ६० चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांसह ७२ धावांची खेळी केली आणि संघाला समाधानकारक धावसंख्या गाठून दिली. याला उत्तर देताना एस.एस.





अँड सी. संघाच्या राहुल कृष्णन याने ४१ धावा आणि अभिषेक राय याने ३९ धावा करून विजयाच्या समीप नेले होते. एसएसडी संघाला (७ गडी बाद १२१ धावा) अखेरच्या दोन षटकांमध्ये ७ धावांची आवश्यकता होती. युबीएस संघाच्या संदीप देओल याने १९ वे षटक टाकताना केवळ ४ धावा दिल्या आणि एक गडी बाद केला. निर्णायक षटक हरप्रीत सिंग याने टाकताना केवळ ३ धावा दिल्या आणि सामना टाय झाला. सुपरओव्हरमध्ये एस.एस. अँड सी. संघाने ६ धावा केल्या तर, युबीएस संघाने हे लक्ष्य ४ चेंडूत पूर्ण करून सामना खिशात घातला.

रोहन फाटे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर ऑरस टेक संघाने हनीवेल संघाचा २९ धावांनी सहज पराभव केला. ऑरस संघाने १६८ धावा केल्या होत्या. याला उत्तर देताना हनीवेल संघाचा डाव १३९ धावांवर मर्यादित राहीला. रोहन याने १८ धावांमध्ये ४ गडी टिपले.

## महिला मल्लखांबपटूला डावलले : पंचांचा एकतर्फी निर्णय

**अहिल्यानगर :** आंतर महाविद्यालयीन विभागीय मल्लखांब स्पर्धेत महिला खेळाडूवर अन्याय झाला असून, पंचांनी एकतर्फी निर्णय देऊन खेलो इंडियातील सांघिक पदक विजेत्या मल्लखांबपटूला डावलल्याची तक्रार या खेळाडूने केली आहे. आपल्यावरील अन्याय दूर करून न्याय देण्याची मागणीही करण्यात आली आहे. मल्लखांबपटू गौरी गौड हिने आपला तक्रार अर्ज प्राचार्यांच्या नावे दिला आहे. तक्रारीत म्हटले की, शनिवारी आंतर महाविद्यालयीन विभागीय मल्लखांब स्पर्धा पेमराज सारडा महाविद्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत निवड समिती विद्यापीठाकडून गठित करण्यात आली, त्यामध्ये ठरावीक एकाच शहरातील व्यक्तींची नियुक्ती केली होती, तर भारतीय मल्लखांब महासंघाच्या नियमावलीनुसार निवड समिती सदस्य स्पर्धेत पंच म्हणून कामकाज करू शकत नसताना या स्पर्धेमध्ये निवड समितीतील सदस्य पंच म्हणून पंच मंडळामध्ये काम करत होते. जिल्ह्यातील आमंत्रित राष्ट्रीय पंचांना पंच मंडळात डावलण्यात आले.




## बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अग्रिमा राणा, ह्रिदान पाडवे यांना दुहेरी मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुधांशु बॅडमिंटन अकादमी यांच्या वतीने आयोजित डेक्कन जिमखाना पुरस्कृत योनेक्स सनराईज एसबीए कप जिल्हास्तरीय सुपर १०० मानांकन बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अग्रिमा राणा, ह्रिदान पाडवे यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला.

डेक्कन जिमखाना बॅडमिंटन कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत ९ वर्षांखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित शौनक केळकरने अजिंक्य चव्हाणचा १५-१३, १५-११ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. शौनकने अजिंक्यचे आव्हान १८ मिनिटात मोडीत काढले. याच मुलींच्या गटात चौथ्या मानांकित कियारा साखरेने विहा गुरवचा १५-१७, १५-२, १५-६ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. हा सामना २२ मिनिटे चालला. ११ वर्षाखालील मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित अर्चित खान्देशेने अव्वल मानांकित अद्वैत फेरेचा १३-१५, १५-४, १५-९ असा तर, मुलींच्या गटात अव्वल मानांकित अग्रिमा राणाने दुसऱ्या मानांकित निधी गायकवाडचा ११-१५, १५-१०, १५-७ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.



१३ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित ह्रिदान पाडवेने तिसऱ्या मानांकित विहान कोल्हाडेला १५-११, १५-१३ असे नमवून विजेतेपदाचा मान पटकावला. मुलींच्या गटात अव्वल मानांकित ख्याती कत्रे हिने चौथ्या मानांकित स्वरा मोरयेचा १५-८, १५-८ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. १५ वर्षांखालील मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित चिन्मय फणसेने अव्वल मानांकित कपिल जगदाळेचा १५-१०, १९-१७ असा तर, मुलींच्या गटात तिसऱ्या मानांकित मनीषा तिरुकोंडा विष्णू कुमारने दुसऱ्या मानांकित ख्याती कत्रेचा १५-८, १६-१८, १५-८ असा पराभव करून विजेतेपदावर आपले नाव कोरले. हा सामना ३६ मिनिटे चालला.

## निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत एकूण २७८ खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या आयोजित पीडीसीसी ७,९,११ वर्षाखालील मुले व मुली निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत एकूण २७८ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हॉल, पुणे सातारा रोड येथे ४ व ५ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे.

स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे यांनी सांगितले की, हि स्पर्धा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए)यांच्या मान्यतेखाली होत आहे. तसेच, हि स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात अथवा आठ फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेला ट्रूस्पेस यांचे मुख्य प्रायोजकत्व लाभले असून रविक्टोरी प्लास्टिक प्रायव्हेट लिमिटेड यांचे सह प्रायोजकत्व लाभले आहे.

स्पर्धेत २७८ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा ७, ९, ११ वर्षाखालील अशा एकूण ३ गटात होणार आहे. यामध्ये सारा पाटील (१४४३, ७ वर्षाखालील), आयुष जगताप (१५६९, ९ वर्षाखालील), विहान शाह (१६१२, ९ वर्षाखालील), गोरांक्ष खंडेलवाल (१४१५, ९ वर्षाखालील), क्षितिज प्रसाद (१५९३, ११ वर्षाखालील), प्रद्योत मिश्रा (१५४६, ११ वर्षाखालील) यांचा समावेश आहे. स्पर्धेत एकूण २४,०००/-रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी अथर्व गोडबोले हे चीफ आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत.

## आयुषा इंगवलेला राष्ट्रीय सॉफ्टटेनिस स्पर्धेत २ कांस्य

**पुणे :** पंजाबमधील १९ व्या जुनिअर राष्ट्रीय सॉफ्टटेनिस स्पर्धेत पुण्याच्या आयुषा प्रमोद इंगवलेने २ कांस्य पदकांची कमाई केली आहे. चंदीगढमधील पंजाब युनिव्हर्सिटच्या एमडीसि टेनिस कोर्टवर संपलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत आयुषा प्रमोद इंगवलेने आपली पदकांची परंपरा कायम राखली. सलग सहा वर्षे राष्ट्रीय स्पर्धेत ती पदकांची मानकरी ठरली आहे. महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना आयुषा इंगवलेने सांघिक व दुहेरीत खेळताना २ कांस्य पदके पटकावली. स्पर्धेत देशातील २५ राज्यांतील खेळाडूंनी भाग घेतला होता. सांघिक स्पर्धेत महाराष्ट्र संघाने तेलंगणा संघाला ३-०,उत्तरप्रदेश संघाला ३-१ व आंध्रप्रदेश संघाला ३-१ ने पराभूत करून कांस्य पदक जिंकले. दुहेरीत खेळताना आयुषा इंगवले व रितिका मोरे या जोडीने पहिला बाय मिळाला. हरियाणाला ३-०, मधयप्रदेशरा व गुजरातला टाय ब्रेकमध्ये ८-६ असा विजय मिळवत कांस्य पदक खेचून आणले.



## रॉयल्स् इलेव्हन टीमचे विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ए-स्क्वेअर स्पोटर्स अॅकॅडमी तर्फे आयोजित दुसऱ्या 'ए-स्क्वेअर प्रीमिअर लीग' १२ मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत रॉयल्स् इलेव्हन टीम ने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आपल्या गटाचे विजेतेपद मिळवले.

वडगांवशेरी येथील सेंट अरनॉल्ड सेंट्रल स्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या १२ वर्षाखालील गटाच्या अंतिम सामन्यामध्ये आदित्य दिघे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर रॉयल्स् इलेव्हन संघाने चॅलेंजर्स इलेव्हनचा २ धावांनी निसटता पराभव करून विजेतेपद मिळवले. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या रॉयल्स् इलेव्हनने २५ षटकामध्ये १५७ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये रणवीर बालघरे याने



३२ धावांची खेळी केली. चॅलेंजर्सकडून गोलंदाजीमध्ये आदित्य चव्हाण आणि दक्श पवार यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. या लक्ष्याचा पाठलाग करताना चॅलेंजर्स इलेव्हनने २४.३ षटकामध्ये १५५ धावा करू शकला. हर्ष बेंडभर याने ३९ धावा आणि शौर्य तावरे याने ३७ धावांची खेळी केली. रॉयल्स्कडून आदित्य दिघे याने १९ धावांमध्ये ४ गडी बाद करून संघाच्या विजयामध्ये मोलाचा वाटा उचलला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण इन्सीया इंडस्ट्रीजचे संचालक इनामदार आणि सौ. इनामदार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू भाविका अहीरे आणि तिचे पालक तसेच ज्युडीशिअल क्रिकेट क्लबचे अध्यक्ष दिपक शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या टॅलेंट हंटचे स्काऊट अभिजीत सुद्रिक उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे संचालक ए-स्क्वेअर स्पोटर्स अॅकॅडमीचे अध्यक्ष अजय तायडे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि सेंट अरनॉल्ड स्कूलचे फादर फ्रँक्लिन यांचे मैदान उपलब्ध करून दिल्याबद्दल विशेष आभार मानले.

३७ व्या ९ वर्षाखालील खुल्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत

## निधिश श्यामल, कियाना परिहार यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या वतीने आयोजित व जागतिक बुद्धिबळ महासंघ(फिडे), भारतीय बुद्धिबळ महासंघ(एआयसीए) यांच्या मान्यतेने होत असलेल्या ३७व्या ९वर्षाखालील खुल्या व मुलींच्या राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात तेलंगणाच्या निधिश श्यामल याने, तर मुलींच्या गटात राजस्थानच्या कियाना परिहार यांनी विजेतेपद संपादन केले.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील



बॉक्सिंग हॉलमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत मुलींच्या गटात अकराव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत राजस्थानच्या कियाना परिहारने गुजरातच्या आश्वी सिंगचा पराभव करून १० गुणांसह विजेतेपद पटकावले. कियाना हीने इंडीयन पद्धतीने डावास सुरुवात करताना ६६ चालीमध्ये आश्वीवर विजय मिळवला. कियाना ही एमडीएस सिनियर सेकंडरी शाळेत चौथी इयत्तेत शिकत आहे. याआधी तिने २०२३ मध्ये यूएई येथील आशियाई युथ स्पर्धेत विजेतेपद पटकावले होते. केरळच्या दिवी बिजेशने आंध्रप्रदेशच्या अनन्या चिंताचा पराभव करून ९.५ गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. दिल्लीच्या वंशिका रावतने तामिळनाडूच्या मार्कसिम श्रीयुक्ताचा पराभव करून ९ गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला. खुल्या गटात तेलंगणाच्या निधिश श्यामलने पश्चिम बंगालच्या ओशिक मोंडलचा पराभव करून ९.५ गुण (८०.५ बुकोल्स सरासरी) मिळवले व प्रथम क्रमांक पटकावला. निधिशने क्वीन्स इंडीयन पद्धतीने आपल्या डावास सुरुवात केली व ६३ चाली मध्ये ओशिकवर मात केली.

#रा